म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणे.
विषय व्या. वा
दा. क्र. १६८३०

BVBK-0401630

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
बाल वाङ्मय विभाग
वा. क्र. ९६३
विषय क्र.

# साहसी वार्ताहर!

[ कुमारकथा ]

बा.वा.
१६३०
28/7/84

मालती दांडेकर

BVBK-0401630

मॅजेस्टिक प्रकाशन

पहिली आवृत्ती :
फेब्रुवारी १९८४

© प्रकाशकाच्या स्वाधीन

प्रकाशक :
अशोक केशव कोठावळे,
मॅजेस्टिक प्रकाशन,
३१६ प्रसाद चेंबर्स
गिरगाव, मुंबई–४.

मुद्रक :
अ. के. कोठावळे,
ॐ मुद्रणालय,
२५० अ, शनिवार पेठ,
पुणे–३०.

मुखपृष्ठ :
चि. ग. मनोहर

आतील कथाचित्रे :
शि. दि. कांबळे

किंमत बारा रुपये

# काटेचा थोडा परिचय

करवंदीचा काटे हा 'आज' पत्राचा बातमीदार व साहसकथा लिहिणारा एक १६–१७ वर्षांचा कुमार. नुसताच काल्पनिक साहसकथा लिहिणारा नव्हे, तर गुन्ह्यांचा अगर गूढ रहस्यमय दुर्घटनांचा शोध करून त्यात अपराधी माणसे कोण, याचा तपास लावून नंतर त्यावर चुरचुरीत रहस्यकथा लिहिणारा एक चतुर गुप्तचर पण होता हा काटे!

आणि त्याच्याच या कथा. वरील गुणांचा या कथांतून प्रत्यय येईलच. कुमार वाचकांना या गुप्तचर-कथा आवडल्या तर आणखीही काही कथा मी सांगेन. त्याही कथांत, काटेचा सहाय्यक मित्र बापू हा असणारच आहे, बरं का!

बी–९, स्टाफ कॉलनी
M. R. E. कॉलेज
जयपूर ३०२ ०१७

—मालती दांडेकर

# अनुक्रम


| | | |
|---|---|---|
| १. | करवंदीचा काटे | १ |
| २. | हिरव्या हवेलीचे रहस्य | २१ |
| ३. | म्यूझियममधील चोरीचे गुपित | ४१ |
| ४. | बातमीदाराची बहादुरी | ६० |
| ५. | मगरानं गिळलेली माणके ! | ७९ |

बाल वाङ्मय विभाग.
वा. क्र. १६५३० दिनांक २७/७/८३
विषय

१

# करवंदीचा काटे

'तुमचं नाव?'

'किसन काटे.'

'कोठून आलात? गाव?'

'गाव करवंदी–'

हे उत्तर ऐकताच वर्गात स्टँपिंग सुरू झाले व काही मुलांनी एका स्वरात एका जुन्या गीताच्या ओळी मोठमोठ्याने म्हणायला सुरुवात केली—

> 'अंजनकांचन,
> करवंदीच्या, काटेरी देशा ॥
> कणखर देशा,
> तुला प्रभाती प्रणाम परमेशा ॥'

त्या पाठोपाठ हसण्याच्या लाटाही फुटू लागल्या, विद्यार्थीवर्गात. किसन काटे याने मागे वळून आपल्या वर्गबंधूंकडे पाहिले. त्याचा बांधा खरेच कणखर होता. वर्ण काळासावळा. नजर धारदार. तो मनात रुष्टतेने म्हणाला,

'काय? याच वर्गात आपल्याला एस्. एस्. सी. चा अभ्यास करायचा आहे या वर्षी? केवळ माझं नाव-गाव ऐकून एवढी कुचेष्टा?' त्याच्या कपाळावर आठ्या उमटल्या. हेडमास्तरांनी त्याच्या जवळचे प्रमाणपत्र पाहिले. मात्र त्यांच्या डोळ्यांतली काळी बुबुळे गर्रकन फिरली, नवलाने. भाषा विषयात काटे याला शेकडा ९५ मार्क होते! इंग्रजी, संस्कृत, हिंदी-

सगळ्यांत असेच ए वन् मार्कस्. मार्व्हलस् ! 'हा मुलगा माझ्या गडकरी स्कूलचं नाव उजळ करील खात्रीनं !' त्यांचाही चेहरा उजळला. ते म्हणाले,

'तुमचे मार्कस् ए वन् आहेत. अशा मुलांना गडकरी स्कूल कधी नाकारत नाही. बसा त्या बाकावर. थांबा. मास्टर करवंदे, काटेरीच्या स्कूलचं नाव ?'

पुन्हा वर्गात स्टँपिंगचा धडधडाट सुरू ! कुणीतरी चावट मुलगा गुणगुणू लागला, गोविंदाग्रजांच्या त्या कवितेतल्या तुटक ओळी—

**'अंजन कांचन करवंदीच्या काटेरी देशा।**
**कणखर देशा। काटेरी देशा !**
**तुला प्रभाती प्रणाम परमेशा !'**

अन् मग वर्गातल्या अनेक मुलांनी हातही जोडले. हास्य खदखदू लागले परत वर्गात. त्याने आपल्या धारदार, तीव्र नजरेने वर्गाकडे वळून पाहिले व ओठ घट्ट मिटले. मनात मात्र तो म्हणाला—

'बेट्यांनो, थट्टा करता काय ? करा, थोड्याच दिवसांत नावाजायला लागाल.'

त्याचा हा अंदाज खोटा ठरला नाही. शाळेच्या वार्षिकासाठी त्याने इतकी सुंदर कथा लिहिली की, हेडसरांनी त्याला बोलावून सगळ्या मासिकाचे संपादन त्याच्याकडे सोपविले. काय सफाईदार इंग्रजी बोलायचा ! कार्यपरत्वे समारंभात भाषण करावे लागले तर पट्टीच्या वक्त्याप्रमाणे त्याची भाषा विनोदी, प्रभावी व विषयाचे योग्य विवेचन करणारी असे.... शिवाय वर्गात अभ्यास उत्तम. लौकरच या 'काटेरी देशाच' स्वागत वर्गबंधू कौतुकाने करू लागले यात नवल थोडेच ? किसन लेखक होऊ पाहात होता. पाचवीत असल्यापासूनच छोट्यामोठ्या गोष्टी बाल मासिकांत येऊ लागल्या होत्या त्याच्या. असेच दिवस उलटत होते.... आता तो मोठ्या



‘ अरे, भुतं चहा पितात वाटतं ! काय गंमत आहे ! ’

कथाही लिहून पाठवत होता कुठे कुठे. त्याचे घर....घर कसले ? बारीकसे खोपटेच म्हणाना ! पाच रुपये भाड्यात आणखी कसले मोठे घर मिळत असते ? तेथे किसनचा बाप अन् किसन राहात होते. किसनने आज

शाळेतून घराकडे पावले वळविली. मनात थंड वायुलहरीसारखे सुखदायक विचार येत होते–

परवा आपण, येथे जी लहान मूल किडनॅप्ड केल्याची केस झाली; त्याची सगळी हकीकत जमवून एक सुरेख कथा तयार केली. ती 'आज पत्राने स्वीकारलीच असणार ! 'काय भाषा छान होती त्याची ! ' बाबा-सुद्धा म्हणाले. ही गोष्टतरी स्वीकारतील का ते संपादक ? सगळ्या कथा परत करताहेत. मी लहान म्हणून का ही उपेक्षा ? पण ही घेतील. टॉप जमली आहे. आठ-दहा रुपये आले, तर बाबांना शर्टाचे कापड आणू.

तो घरात येताच संधिवाताने आजारी असलेला त्याचा बाप अंथरुणा-वर उठून बसला व म्हणाला–

'तुझं टपाल आलं आहे बेटा ! '

टपाल कसले ते ? तो परत आलेला बाण होता जसा– त्याचाच लेख ! त्याचे ओठ घट्ट आवळले गेले. 'साभार परत' या छापील अक्षरांकडे तो टक लावून पाहात राहिला.

किसनचा बाप तुकाराम, तो पूर्वी करवंदीच्या एका वर्तमानपत्राच्या कचेरीत जुळारी ऊर्फ कंपॉझिटर होता. तो म्हणाला–

'कृष्णा, येऊ दे लेख परत. त्याचं एवढं वाईट वाटून घ्यायचं नसतं. मी स्वतः हातानं असली नकार पत्रं अन् 'साभार परत' पत्रं कितीतरी टाईप केली आहेत, कचेरीत मालकांच्या हुकमावरून. नव्या कोवळ्या लेखकांनी याला तयारी ठेवावीच मनाची, पण ह्यातून पुढं जायचं... माहीत आहे ना उन्हाळा सोसावा, तेव्हा पावसाचं पीक हाती येतं ते !'

'आणि ह्यालाही मनाची तयारी ठेवावी का बाबा ? '

त्याने रागाने विचारले व लेखाची आतली दोन चिकटविलेली पाने बापाला दाखवीत म्हटले– 'पाहिलंत ? हे लेख 'आज' च्या ऑफिसात पुरते वाचलेही जात नाहीत, असा मला संशय होताच, त्याची ही साक्ष.

ही पानं अशी मी चिकटवून पाठवली, ती तशीच परत आलीत. ही चिकटलेली टोकं सोडवून गोष्ट वाचलीच नाही त्यांनी–'

'बरं असूदे. ये, भाकरी करून ठेवल्या आहेत मी. बापू आला होता, त्यानं कोरड्यास केलं आहे. रानची करवंदं अन् मध आणून दिला आहे, तो घे, राजू, खा थोडं. उशीर झाला आहे आधीच.'

रानची करवंदे? शाळेतल्या पहिल्या दिवसाची आठवण आली. करवंदीचा काटेरी देश! मुले हसली होती पण त्याला आपल्या करवंदी गावाची ओढ अतिशय होती. करवंदाच्या काळ्या, जांभळ्या टप्पोर घोसाप्रमाणे त्याचे गाव रसरशीत व मधुर वाटायचे त्याला. तेथला गोपू हा त्याचा जिवलग बालमित्र. कशाला आपण करवंदी सोडली अन् या दूरच्या शहरी आलो? त्याने सुस्कारा टाकला.

करवंदीची शाळा— ती होती नववीपर्यंतच व तुकारामाने तर ठरविले होते की, पोराला पुढे शिकवायचे! तो म्हणायचा, 'किशा, तुझी बुद्धी म्हणजे कट्यारीच्या धारेवाणी तेज न् लखलखीत. शिक्षणावाचून या बुद्धीला तेज न्हाई रं. निदान तुला एस्. एस्. सी. करू, शहराला जाऊन! मग पुढचं पुढं.'

अन् मग सातपुड्याच्या डोंगरकुशीत आराम करणारी ती करवंदी सोडून ते इथे आले होते. आणि आता एस्. एसी. सी. परीक्षाही संपत आली होती. बापू जेवायला आला. येताना त्याने थोडे लोणचे पण आणले होते. तो म्हणाला–

'आईनं दिलंय, किसन. ती म्हणाली, तुकादादांना ताकद नाही अन् किशाला लई अभ्यास म्हून करून धाडलंया.' मग त्यांचे त्या लोणच्याच्या फोडीसारखेच चवीचवीने जेवण सुरू झाले. किसन म्हणाला, 'हं, काय म्हणतेय् आमची करवंदी?'

'म्हणतेय् आमचा किशा हवा होता इथं या वेळी म्हणून! अरे,

करवंदीत काय नवंच सेन्शेशन झालंय् बघ आताशा. ज्याच्या त्याच्या तोंडी तेच, तेच–'

'तेच म्हणजे काय? झटपट सांग बाप्या. पाटीभर पाचोळ्यात वाटीभर धान्य असं नको करूस. कसलं सेन्सेशन?'

'एक तर. अरे, आपण डोंगरदऱ्यात फिरतो ना नेहमी? तर ती जागा आता पार ओस झालीय्. म्हणे, एक प्रचंड राक्षस किंवा भूत कुणीतरी डोंगरात राहातं. ही एवढी दोन पुरुष उंची! कपडे ज्वाळांचेच असतील असं लोक बोलतात. ते मागं–पुढं जाताना दिसतं. ढगांतूनही दिसतं अन् उतरतं म्हणे रात्री! कुण्णी फिरकत नाहीय् सध्या तिथं–'

'असं? मला आता तिथं फिरकावंसं वाटतंय्. दिवसाही कुणी जात नाही का तिथं?'

'तसं शेरडांना चारायला धनगर मम्मू जातो. पण त्याला कसला तरी जबरदस्त तडाखा बसला अन् तो बेसुद सापडला. कसला तडाखा तेपण सांगता येत नाही. त्याची दातखीळ बसलीय्.'

'असं का? आता तर कधी येऊन तिथं हिंडतो असं झालंय् बा आपल्याला. जवळजवळ आता परीक्षा झालीच आहे. रविवारी येऊन जाईन!'

'पण भुताच्या तडाख्यात जायचं अडलंय् का तुझं आता किसन? अरे, राहू दे. करवंदी सुटली, आता तिथल्या कटकटीत मन नको घालू वा!' तुका म्हणाला.

'वा! बाबा, लहानपणाचं आपलं गाव. ते सुटलं तरी मनातली आपुलकी तुटत नाही अशी. जाणारच मी. बाप्पा, आपल्या त्या शिवगुहेत जाऊन येऊ आपण. या रविवारी येतो मी सकाळचा. थाळीलाच येतो.'

'काय? त्या....त्या गुहेत? नको नको. तिथंच तर भूत दिसतं कीरे–'

‘तर मग त्या भुताला आपण पराभूत करू. भित्र्या, मी आहे ना तुझ्याबरोबर एवढा ताकदवान्? तुला यावंच लागेल.’

‘हां, मामूनंतर बेसुद पडण्यात नंबर लागणार आमचाच बहुतेक–’

‘गप बैस. भुतं खरी नसतात, असं घोकत बैस. मग भीती जाईल.’ बापू खरा-भित्रा नव्हताच. तो हसला व त्याने निरोप घेतला.

शनिवारी परीक्षेतून मोकळा होताच किसनने आपला त्यातल्या त्यात स्वच्छ, उत्तम पोशाख केला व हसत तो एका नियोजित कामासाठी बाहेर पडला.

‘युवर टी इज रेडी, सर. मे आय कमिन?’

काय? हॉटेलातल्या चहा आणणाऱ्या पोऱ्याचेच हे शब्द? दचकून मॅनेजर देशमुखांनी वर पाहिले. एक नीट–नेटका, स्वच्छ कपड्यांचा, सोळासतरा वर्षांचा मुलगा. केस नीट विंचरलेले. हातात ट्रे. त्यात दोन कपांची स्वच्छ किटली. साखर–दुधाची वेगळी भांडी. वर एक शुभ्र टॉवेल झाकलेला. ते अगदी चकित झाले. म्हणाले–

‘तू...तू त्या सुखधाम हॉटेलातून आलास? रोजचा तो सोम्या कुठं आहे? कळकट कपडे, पिंजारलेले केस, विडीचे थोटुक, असा?’

‘सर, सोम्याऐवजी हा गोम्या आला. एक्स्यूज मी सर...’

‘अन् रोज रद्दी कप असतात त्याऐवजी हे कसं काय?’

‘या छोट्याशा गोष्टीतही स्वच्छता, नीटनेटकेपणा असला तर चहा अधिक आवडेल आपल्याला असं वाटून मी हा बदल केला आहे, साहेब.’

साहेबांनी परत एकवार निरखून पाहिले. त्या भेदक नजरेने त्यांच्या नजरेचा वेध घेतला. दुसरे, यातले बहुतेक भाषण ह्या ‘पोऱ्या’ने इंग्रजीतून– तेही हायक्लास इंग्रजीतून केले होते. किती नवल! ते म्हणाले, ‘मुला, तू खरा चहा देणारा हॉटेलचा पोऱ्या नाहीस. मी ओळखलं, कोण तू? खरं नाव काय अन् हे सोंग का?’

‘राजमार्गानं येता आलं नाही की चोरवाट हुडकावी लागते, साहेब तसाच ह्या माझ्या सोंगाचा प्रकार! किती प्रयत्न केले तुमची गाठच कुणी पडू देईना. दारावरचा भय्या, पट्टेवाला, कारकून, सेक्रेटरी सगळ्यांनीच मला हाकलून लावलं. शेवटी या युक्तीनं आज मी गाठलं आपणाला–’

‘ठीक. बसा त्या खुर्चीवर अन् माझ्याबरोबर थोडा चहा घ्या. आता बोला कशासाठी भेट हवी होती अन् कोण आहा तुम्ही?’

‘मी किसन काटे. तुमच्या साप्ताहिक रविवारसाठी सनसनाटी, पण सत्य वातम्यांवर गोष्टी लिहून पाठविणारा. त्या गोष्टी सगळ्या बूमरँगसारख्या जेथून निघाल्या तिथं—म्हणजे माझ्याकडं परत! का ते विचारायला—’

‘अन् हे विचारायला आलात? एक्स्प्लनेशन देण्याची आमची पद्धत नाही आणि मला वेळ नाही आता, तेव्हा—’

‘जाणतो. वशिला लावून गोष्टी खपविण्याची माझीही रीत नाही. मी फक्त हे दाखवायला आलो. दोन मिनिटांत जाईन.’

त्याने पाने चिकटवलेली गोष्ट दाखविली व अर्जांना आलेले नकारही दर्शविले. तो म्हणाला–

‘साहेब, साहित्य न वाचताच परत करण्याची ‘आज’ची पद्धत आहे काय? ते प्लीज सांगावं. दाद लावून घ्यायला आलो तो त्यासाठी....’

दोन तलवारींची टोके एकमेकींना भिडावी तशा दोघांच्याही तिखट, भेदक नजरेची भेट घडली. ‘मला टाइम नाही’ म्हणणारे देशमुखसाहेब थोडे हसलेसुद्धा. मग म्हणाले— ‘ही एखाद्या नव्या क्लार्कची चूक असणार! असं इथं नेहमी घडत नाही. ठीक आहे. तुम्हाला गोष्ट छापून यायला हवी आहे काय?’

'तसं नाही. गोष्ट योग्य वाटली तर तुम्हीच ते ठरवाल. साहित्यातले गुण जाणण्याची दृष्टी तुम्हाला असणारच. फक्त ती सर्व गोष्ट वाचली जावी, एवढंच!'

'एवढंच! बस्?'

'एवढंच नाही. मला बातमीदाराची नोकरी हवी आहे 'आज'मध्ये 'उमेदवार...बातमीदार घेण्यासंबंधी' आपलं निवेदन वाचल्यावर मी चारदा अर्ज पाठविले. पण–'

'काटे, नोकऱ्या इतक्या सुलभतेनं मिळतात अशी तुमची कल्पना आहे?'

'सर, मी काटे असलो तरी भलत्याच काटेरी कल्पना करत बसत नाही! पण 'आज'च्या संपादकीय खात्यात मात्र 'लायक' माणसांनाच नोकरी मिळू शकते, ही कल्पनाच नव्हे, तर खात्री आहे–'

साहेबांचे ओठ उघडले. प्रसन्नतेचे स्मित उमटले. ते म्हणाले,

'पोरा, तुझी पारख करावी लागेल आधी! करवंदी गावात एका राक्षसानं अगर भुतानं प्रलय मांडला असल्याच्या बातम्या येताहेत. एक हत्याही करण्याचा अयशस्वी प्रयत्न झाला म्हणतात. हिंमत असेल तर या प्रकारांचा तपास करून खरीखुरी बातमी लौकर घेऊन ये अन् मगच मला भेट. अच्छा. नमस्ते!'

ते खाली मान घालून लिहू लागले. तो वर मान करून बाहेर पडला.

शेतावर काम करून बापू आपल्या झोपड्यात परतला तर दारात किसन उभा! त्यांची फार जिवलग मैत्री होती. बापूने एकदम धाव घेऊन त्याच्या पाठीवर थाप देत विचारले,

'काय पावणं! रविवारी थाळीला येनार हुता त्ये शनिवारीच कडूसं पडल्यावर, जलदी येनं क्येलं जी? पर लई ब्येस झालं. तुझं आवडतं भाजणीचं थालिपीठ लावाया सांगतो आईला. बसूया जरा बोलत, चल.'

अंगणातल्या खाटल्यावर टेकत किसन म्हणाला– ' लई उपकार जालं जी. पर दोन घास मागनं घेऊ. तू दमला नसशील तर करवंदी गावात फेरी करूया आधी. वडाच्या पारावर लोकं बसतात ना अजून ? जाऊ जरासं. '

' हो हो, तर ! ' वटमंडळ ' नाव दिलं होतंस तू त्या शिळूप्याच्या गप्पांना, नव्हे ? पण तिथं कशाला जायचं आहे ? गावाच्या सगळ्या पंचाइती करीत बसतात ती म्हातारी माणसं उगीच ! ह्यांचं ह्य झालं, त्येंचं त्ये झालं–बस. '

' त्येंचं त्ये झालं ' ऐकायला जायचं गड्या. फार दीस झाले. वटवृक्ष क्लबाला हजर नाही मी, चल. '

तो वडाचा पार मोठा होता. कुणी धर्मात्म्यानं तो नीट बांधून गुळ-गुळीत फरशा घालून मजबूत चुनेगच्चीचा केला होता. वडाच्या बुंध्यात एक शिवलिंग होते. लोक दर्शनाला येत व गप्पांना तिथेच बसत. हिवाळ्यात लहानशी शेकोटीही करायची मंडळी. हुर्डा पार्टीचाही कार्यक्रम वडाच्या छायेतच व्हायचा. ते करवंदीचे एक मस्त आकर्षणच म्हणाना !

लोकांच्या गप्पा रंगल्या होत्या. तेवढ्यात किसनने दोन नारळ आणून देवासमोर फोडले. नारळाच्या पाण्याचा अभिषेक पिंडीवर केला व खडी-साखरेचा नैवेद्य दाखवून सगळ्यांना प्रसाद वाटला. मग ते दोघे तिथेच जरासे बसले. एक म्हातारा म्हणाला.

' आँ ! किशा काय रं तू ? गुलामा, ह्यो देवाला परसाद कशापाई रं ? '

' परीक्षा दिलीया. नवस क्येला हुता, पेपर सोपं येऊ देत म्हून ! तसं आलं जी, त्या पायी निवेद. नवसाचा हाय नारळ. घ्या आजोबा. '

तो म्हातारा उद्गारला– ' आॅ ! आंधी परीक्षेत पास तरी व्हायचं हुतंस नवस फ्येडाया ? नुस्ती पेपरं दिली म्हून नवसाचा नारळ ? लई झालं बा ! '

सगळे हसले. मग गप्पा रंगत चालल्या. गावात, डोंगरातल्या भुताची चर्चा चालली होती. त्याचे साद-पडसाद घुमू लागले. कुणी विचारले–
'वैदुबुवा, तो मामू कसा हाय ? अजून दातखीळ उघडली का न्हाई ? पांढऱ्या भुतानं थोबाडात दिली ठेवून, म्हून ऐकलं.'

'तसा बरा हाय् आता मम्या. पर डोंगराचं निस्तं नाव काढलं की त्येच्या अंगात भूत येतं. काय इच्चारू नगा! थरथराया लागतंया त्ये पोर.'

'पर कसलं हुतं भूत?'

'लई सफेद रंग. जसं कागदावाणी अन् त्यो कागदबी जसा काय प्येटलेलाच! असा चमकतो म्हनत्यात रातधरनं. मामू म्हनला हुता, भूत लई उंचाडं. दीड पुरुष उंच!' त्येनं दुरून पघिटलं. गपगारच झाला.'

'रोज येत असंल?'

'न्हाय, कंदीमंदी येतं. घरघरघर आवाजबी हुत्यात. जसं काय ढगच दुरून वरडत्यात. अन् कसला मोठ्ठा आवाज? कानांवर आला की कापरं भरतंय्.'

'ह्ये काय नवं संकट आलंया गावावर द्येव जानं! कुन्नी जात न्हाई जी ततं.'

'त्यो एक कुनी मनुक्ष चुकून दऱ्याडोंगरात फिरत न्हायला आपला, म्हंजी सहजपनीच. तर काय वं? काल सकाळच्यान् त्यो बेसुद होऊन कडेकपारीत पडलेला सापडला.'

'पन कोन व्हता त्यो? गाववाला म्हनता? राव, नीट बोलाकी जरा.'

'न्हाय पत्त्या. पर जाऊ द्या. त्ये, पोलीस काढत्याल शोधून. तुम्ही कुन्नी जाऊ नका ततं.'

यानंतर मग हलकेच दोघे उठून निघाले घरी.

परतताना बापू म्हणाला,

'आँ? वाट विसरला जणू पावणं? घरचा रस्ता हा नव्हं!'

'अरे, आपण घरी जायपूर्वी मामूची तबियत बघायला जात आहोत. तो आपल्या त्या डोंगरपथकातला मित्र होता मागं. तुमीबी इसरला राव? मंग ब्येस.'

बापू हसला. त्याला वाटले, किसन म्हणजे कुठेही हाती धरून न्यावा असा हातकंदील थोडाच? वीज होती जशी. मनात येईल तिथेच लकाकणार!

मामू अंथरुणावरच होता. जुने मित्र भेटायला आले. त्याला खूप आनंद झाला. किसन प्रेमाने म्हणाला,

'माम्या! आपण कशाला भिणारी मुलं नाही. मग तुला कसं इतकं रे भीतीनं दुखणं आलं?'

'त्ये बोलू नागा! अजूनबी कापरं भरतंया—'

'मी तेच बोलणार. मी ते भूत हुडकणार आहे जाऊन. तू काय काय पाहिलंस ते सांग. मुळीच भ्यायचं नाही. भूत नसतं अन् असलं तरी आपल्या शिवगुहेत शंकराची पिंडी आहे. आमचा हा शंकरदेव म्हणजे सगळी भुतं तर त्याची नोकर! नोकरांना काय भ्यावं? बरं सांग, काय बघितलंस?'

'सांगतू. अंधार मिट्ट झाला हुता सांजधरून. माझी ती दोडाची शेरडी उंच डोंगर चढता चढता ग्येली की कड्याच्या टोकाजवळ! आत्ता? ही कड्यावरून पडणार, म्हून धावत मीबी ततं उंच कड्याच्या टोकापत्तुर गेलो; अन् वाकून त्या बेवकूब शेरडीला पकडाया लागलो, तर काय... त्या कड्याखाली योक मनुक्ष पालथा पडलेला! जिवाचा लई घबराट झाला परत फिरतो तो, आभाळातून काळ्या काळ्या ढगांतून सफेत कायतरी खाली आलं. भूतच त्ये! माझ्याकडं आलं. कपड्यातून उजेडबी

चमकत हुता. त्ये वाघावाणी वराडलं. लई गर्जना–गडगटावानी ! या अल्ला !'

'मामू, नीट सांग. वाघावाणी ओरडला ? शब्द नव्हतेच ? नीट आठवून सांग दोस्ता. फारच महत्त्वाचं आहे हे मित्रा–'

'खरं म्हंजी, मी भीतीनं मराया झालो हुतो. पोलिसांनी विचारलं की मला घ्येरी यावी असं झालं ! नको त्यो बोलनं. घ्येरी येते–'

'ए, पुरे झालं. काही नाही घेरी येत. भुताला आपण घाबरायचं, डोंगरपथकातल्या शूर पोरांनी ? भलतंच. आठवून सांग. नीट आठव. तू कड्याच्या टोकाला गेला होतास तेव्हा तिथं पांढऱ्या कपड्यांचं कुणी आलं. ते वाघावाणी ओरडलं पण शब्द ऐकू आले का काही ?'

'हां, जी हां. तू यवढं इच्यारतोस तर याद याया लागलीया जराजरा. त्या गर्जनेत शबुद होतं. मराठी शब्द आमच्या या बोलण्यावानी–'

'असं ? शाब्बास ! मामू कोणते बरं शब्द ? भूत काय म्हणत होतं ?'

'घ्या ! त्ये आठावलं गड्या, इकल्यात. भूत म्हनलं, 'हरामखोरा, मर इथं ! गधड्या, या सांजच्या पारी, इथं तू तडफडलास तरी कसा अन् कशापाई ?' अन् त्यानं मला कशानं तरी चटकाच दिला अन् दिलं ढकलून मी उतरणीवरनं घसरलो. पुढं ? पुढचं न्हाई आठवत.'

'मामू, शाब्बास ! भूत बोललं तुझ्याशी ? आता बघून घेतो आम्ही ! पण आणखी काही पाहिलंस कायरे ? बघ, वर्तमानपत्रात तुझा फोटो येईल असं करीन मी.'

मामू खुलून हसला अन् म्हणाला,

'हं, कड्याच्या टोकावर ग्येलो तवा शेरडीनं गवताबरोबर एक कागूद बी चरायला सुरुवात केली. लई दोड ! म्या कागूद घेतला वढून. ह्यो बग. पर मला लिहा-वाचाया येत नाही. तू वाच. लई महत्त्वाचं चिटोरं न्हाई दिसत.'

तो कागद म्हणजे चुरगळलेले एक पाकिट होते. आत पत्र होते. वर एक पत्ता होता. मामूला फळे देऊन त्याने काढता पाय घेतला.

घरी येताच त्याने पत्र काढून वाचले. आनंदाने त्याचे डोळे लकाकले. तो म्हणाला, 'हा जगन्नाथ ऐनापुरे कोण आहे, कोण जाणे! त्याला शिवगुहेत ये म्हणून पत्र आहे. सही आहे–कमळाच्या फुलाचं चित्र!'

बापूची आई एकदम म्हणाली,

'ऐनापुरे? त्या दूधवाली गंगाचा तर कुणी नाही ना? तिचं आडनाव ऐनापुरेच आहे.'

'असं? वा, मावशी. आम्ही आताच जातो त्या ऐनापुरेकडं. मग जेवण.'

'आता वं? अरं बाबा, ती घरी न्हाय भेटायची. दूध घालाया जाते, गावभर. रतीब हाईती तिचं. अन् पोरा, वणवण बस् झाली. आल्यापुन पायावर चक्कर पडल्यावानी फिरतंया पोरगं. आता ज्येवन आंदी. मग सगळं. त्या गंगाबाई ऐनापुरेची भेट ऐन पहाटं घ्या. धारा काढायच्य वक्ताला. तर भेटंल. आणि ऐक बरंका, बाप्या! ह्यो तुझा मित्र वारा हाय वारा. जरा थीर बसत न्हाई. संभाळ त्येला. थोडं आता गरम थालिपीठ लावत्ये. बसा उगच खिनभर.'

खरे म्हणजे तो दमलाच होता. ते ऊनऊन चविष्ट जेवण त्याला इतके छान लागले, की काय सांगावे! मग गाढ झोप, अगदी गाढ!

पहाटे हातात एक कडीचा डबा घेऊन त्यांनी गंगाबाईचे घर गाठले.

'मावशी, शेरभर दूध हवं इकात. आईनं सांगितलंया.' बापू म्हणाला.

'घेतु घेतु. रामपारी न्हाई कसं म्हनात्र? बसा थोडं–'

'मावशी, जगूकाका कधी आले होते ममईहून?' बापूने विचारले.

'का रं बाबा? तुला का रिकामी पंच्याईत पोरा?'

'मला ते एक छान घड्याळ आणणार होते. स्वस्त देणार होते म्हून–'

‘ त्ये व्हय ? परवाच तर चार दिवसांमागं येऊन गेले. परत इक्त्यात नाही येनार.’

‘ इथंच आले हुते मावशी ? अरारारा ! भेट झाली असती तर माजं घड्याळ मिळालं असतं. बरं, त्येंचा पत्ता तरी द्या, एक कार्ड टाकीन म्हणतो.’

‘ घ्या ! इथं कुनाला त्येंचा पत्त्या ? तो फिरता व्यापारी मनुक्ष ! आज हथं तर उद्या तथं. पर गोव्यामंदी जाये करतात आमचं ह्ये दीर. लई मंजी लईच शिरीमंत झाल्याती. घड्याळं इकत्यात. गान्याच्या लहान पेट्याबी इकत्यात– ’

‘ सख्खे काका सोनीचे ते ? ’

‘ न्हाई रं. दोन चुली मधे हाईती. चुलत चुलत भाऊ धन्यांचं.’

‘ तरी तुमच्याजवळ पत्त्या न्हाई ? ’

‘ तू तरी लई चवकशा करतोस. अरं, धनी मरून ग्येलं. मी गरीब, त्ये श्रीमंत ! मजजवळ त्ये काय आपला ठावठिकाना सांगनार ?’ जरा थांबून गंगाबाई म्हणाली—

‘ बाबा, त्ये उतरतातदिखील आपल्या मित्राकडं– राजीव बाबूकडं. परवा घरी येऊन इथं च्या घेऊन ग्येल इतकंच काय ते.’

‘ कोण ? राजीवबाबू ? आपल्या गावात तर कुणी नाही राजीव-बिजीव !’

‘ अरं, सरदेशमुखांचं भाचं न्हायका ? कुठं पल्टणीत हाईत त्ये ! हे आपलं इक्तंसं, पाव किलोच्या मापावानी गाव. तुला ह्यातली समदी मानसं माहितीच हायती. त्ये रं ? राजाभाऊ राजाभाऊ ? त्येच राजीव. घ्या दूध बापूजी.’

तिथून परतताना किसन हळूच म्हणाला, ‘ तुझ्या ध्यानात आलं ? राजीव म्हणजे कमळ–! खूप कळलं. बघ, बघ– घड्याळं, लहान

ट्रांझिस्टर्स– गोव्यातून ये-जा. सगळं एकत्र कर मनात.'

'माझ्या नाही बा काही ध्यानात येत–'

'बरं बरं. घरी न्याहरी करू अन् मग शिवगुहेवर स्वारी, चढाई समजलं ना? मी तुला जाताना सांगतो. मला पुष्कळ कल्पना आली आहे मित्रा, ह्या प्रकाराची–'

करवंदी हे गाव सातपुड्याच्या पायथ्याशी वसलेले. सातपुडा डोंगराच्या लहान-मोठ्या, उंच-सखल, कडेकपारीच्या किंवा सरळसोट टेकड्यात आकाशातून कुणी एखादे हिरवेगार चाफ्याचे फूल टाकावे तसे गाव दिसायचे. ताजेपणाने, हिरवेपणाने नटलेलेच. ते मागे टाकून सकाळच्या कोवळ्या उन्हात ते दोघे तत्परतेने डोंगरकड्यात चढू लागले. खरे तर सातपुड्याचे बच्चेच! बरोबर भिल्ल आदिवासी अन् खेडूत पोरे घेऊन ते नेहमीच या दऱ्या-कड्यांतून लपाछपी व घसरणीचा खेळ खेळायचे. मग करवंदांचा, आणि जांभळांचा रानमेवा, बोरे पाडलेली, घेऊन शिवगुहेत 'फलाहार' व्हायचा त्यांचा. हे लहानपणापासून त्यांच्या सवयीचेच काम. फार बरे वाटले किसनला. आज वर्षाने परत तो आपल्या लाडक्या डोंगरात निघाला होता. बरोबर बापूच्या वडिलांचा एक मस्त कॅमेराही त्यांनी घेतला होता. चढणीचे श्रम काय होणार मोठे त्यांना? भारी चपळ पोरे होती ती!

शिवगुहेत शिरताच तो नवलाने म्हणाला– 'बाप्या, बघ! भूत अद्ययावत अन् सुशिक्षित आहे. हा कालचा 'आज' वर्तमानपत्राचा चुरगळलेला कागद अन् आतमध्ये ही तीन धोंडे मांडून केलेली चूल. अरे, चहाचा चोथा पण आहे का? छान. भुतं चहा पितात? केवढी गम्मत!'

ते दोघे खूप हसले व त्यांनी शिवगुहेच्या अंतर्भागात प्रवेश केला. जवळचा टॉर्च काढून त्यांनी त्या अंधाऱ्या जागी पाहिले. अरे पाच-सात

पेटारे नुक्ते आणून ठेवल्याप्रमाणे, आणि दुसऱ्या कोपऱ्यात काही पांढरे-पांढरे...

तावडतोब किसनने फ्लॅशबल्बने त्या वस्तूंचे फोटो घेतले. तो म्हणाला, 'हा पांढरा बुरखा म्हणजे भूत – या शिवगुहेतलं भूत बरका! कपडे चकचकीत कशानं दिसतात? बहुतेक ते एखादं निराळंच म्हणा, रसायनच असावं. ते पोलीस शोधून काढतील.' बापू चकित होऊन बघत होता. त्याचा हा साहसी मित्र किसन. ह्याला भयभीतीचा स्पर्शही झाला नव्हता. तो म्हणालासुद्धा —

'किसन! अरे, तुला भीती कशी नाही वाटत? मामूशी बोलणं झालं तरी?' तो हसून म्हणाला—

'वा! त्यामुळंच माझी जी नखभर भीती होती ती गेली हद्दपार. ते भूत बोललं....तेही रांगडी मराठी भाषेत खेडुतांच्या! नक्की तो माणूस असणार अन् बघ हं. 'हरामखोरा मम्या!' म्हणालं भूत! भुताला शेरडीवाल्या पोराचं नाव, तेही या गावच्या–कसं माहीत? कारण तो इथलाच असणार. अन् हे बघ, गुहेत काय सापडलं मला!'

ती एक सिगरेट-केस होती. चंदनाची. वर अक्षरे होती–आर. एस्.

'त्याचं काय करणार तू?' बापूने प्रश्न केला.

'सांगतो मग सगळं. आता घर गाठू आधी. ऊन किती झालंय्!' ते उतरू लागले.

पायथ्याशी त्यांना एक फॅशनेबल माणूस दिसला. बहुधा लष्करात असावा. बापू हलकेच पुटपुटला, 'हेच राजाभाऊ सरदेशमुख. पलटणीत आहेत.' राजाभाऊ गोड बोलणारे होते. हसत म्हणाले-

'काय बाप्या, इकडं भुताखेतांचं काही नवं खूळ पिकलंय म्हणून ऐकतो. मी काल सकाळी आलो तर गावभर तेच. पोरांनो, तुम्हीही भूत हुडकायला गेला होतात की काय? पाव्हणं, कुण्या गावचं? भुताच्या

डोंगरात का हिंडता ?'

बापू सांगणार तोवर त्याचा हात घट्ट दाबीत किसन कापत म्हणाला,

'बब...ब–भू....भूत ! कुई जी ? काय रं बाप्या ? आँ ? बाला निर्गुडीचा पाला आवशदाला होवा म्हटलं तर, हतं भूतडोंगरावर घ्येऊन येतुयास ? देऊ का रङ्ं ? सांगा. सांगा.. कसलं भूत ! कदीपासून हाय ? कुई ? नगं रं बा. चल, पळ बाप्या...मला नगं पाला-बिला. भूत. बापरेऽऽ भूऽऽत !'

राजाभाऊ हसला अन् म्हणाला–

'पावणं फार शूर दिसतात ! कुठून ह्ये ध्यान आणलंस बाप्या ? मी गेले पाच–सहा वर्षं बाहेर आहे. ह्याला बघितलेलं नाही आठवत. अरे, हा तर भीतीनं थरारतोय्. बाप्या, ने संभाळून या मित्राला.'

खरेच किसनचे अंग कापत होते ! बापूने त्याला संभाळत घरी आणले. तशी तो खदखदून हसला अन् म्हणाला—

'काय ? जमलं का नाटक बापूराव मला ?'

'अगदी बेस्ट जमलं राव. तू नाटकात काम कर.'

दोघेही हसले.

त्या सायंकाळी बापू अन् किसन यांनी सायकलीवर टांग मारली व ते करवंदीच्या एका सरकारी ऑफिसात येऊन दाखल झाले. पोलीस इन्स्पे--क्टर राजे अशा पोरांचे नेहमीच चांगल्या तऱ्हने स्वागत करीत. कारण पुष्कळदा अशा मंडळींकडूनच पोलिसांना महत्त्वाच्या बातम्यांचे धागेदोरे मिळतात, असा त्यांचा अनुभव होता. किसनची सगळी हकीकत ऐकून त्यांनी त्या फोटोंच्या निगेटिव्हज् पाहिल्या व कौतुकाने त्याच्या पाठीवर शाबासकी देत ते म्हणाले,

'शाबास किसन काटे ! किती दिवस या गुन्ह्याच्या तपासात आहोत. पण या बित्तंबातम्या तू आणून दिल्यास. आता पुढची कारवाई मी

ताबडतोब करीत आहे. काळजी सोड. फार झकास मुलगा आहेस. येतोस आमच्या गुप्तचर विभागात ?'

'नाही साहेब. मी बित्तंबातम्या दिल्या, म्हणालात ना ? तेच माझं आवडीचं काम. मी बातमीदार होणार आहे पुढं.'

'शाबास, तुला काय बक्षीस देऊसं झाल आहे. काय हवं ?'

'काही नाही. उद्याच्या 'आज'च्या अंकात मी एक सनसनाटी ताजी बातमी म्हणून ही देतो. आजच्या अंकात हे फोटो वगैरे घालून कथा देणार म्हणतो. त्याला परवानगी ? अन् बेशुद्ध ऐनापुरेचा एक फोटो तुमच्या जवळचा. तेवढा मला द्यावा. बस्स् !'

'जरुर देऊ. शिवाय आम्हीही एक नवी बातमी देतो तुम्हांला. राजीव सरदेशमुख हा लबाड माणूस, कुठही लष्करात नोकरीला नाही. विमानातून जा-ये बिनबोभाट करण्यासाठी ही गप्प उठविलेली होती त्यानं. खरा तो स्मगलर टोळीचा एक एजंट अन् हा बेशुद्ध माणूसही तसाच– पण लहानसा विक्रेता. बाकी काटे, तुझंच मला आश्चर्य वाटतं. जो माणूस शुद्धीवरही आलेला नाही, त्याची ओळखही लागत नाही. तिथ तू मिसरूडही न फुटलेला कोवळा पोर सगळी माहिती सांगतोस ? छान छान ! बातमीदार, आज रात्री इथंच थांबा. उद्या पहाटेला पूर्ण माहिती हाती येईल. मी ट्रंक लावलेला आहे मुंबईला. सकाळी फोटो अन् माहिती, सारी पूर्ण बातमी घेऊनच चला ना !' किसनला ते पटलं. रात्री जागून त्याने बातमीबद्दल बरेच लिहिलेही–

आणि दुसरे दिवशी सकाळी किसन मॅनेजरांच्या समोर उभा राहिला. साहेब हेटाळणीने म्हणाले, 'काय काटे ? बातमीदार होणं सोपं नव्हे, कळलं ना ? आलात ना हात हालवीत, दिवे मालवीत परत ?'

'असं ? मग घ्या ही बातमी अन् पाहा मी दिवे मालवीत आलोय् की आशा पालवीत आलो आहे ते, साहेब.'

त्याने ताडकन् उत्तर दिले व लिहिलेले कागद टेबलावर टाकले. साहेबांची नजर बातमीवरून फिरताच ते नवलाने थक्क होऊन बातमी वाचू लागले. बातमी–फोटोसह अशी होती–‘ हा करवंदाच्या कड्याखाली ढकलून दिलेला व अजूनही बेशुद्ध असलेला माणूस जगन्नाथ ऐनापुरे. मुंबईचा एक फिरता व्यापारी. मृत्यूमुखात कोणी ढकलले याला ? अन् का ? या पाठीमागे एक मोठे लपलेले रहस्य ! हा स्मगलिंगचा मामला ! ‘ पांढऱ्या भुताचे सोंग ’ घेऊन विमानातून शिवगुहेत उतरणाऱ्या एका सभ्य दिसणाऱ्या ठगाची जबानी आणि पोलिसांनी याला कसे चतुराईने गाव्यातल्या चोरट्या मालासह पकडले ती दिलखेचक हकीकत आजच ‘ आज ’च्या सायंकालीन खास अंकात वाचा ! ’

अन् मग सर्व छोटी कहाणी . राजीव सरदेशमुख प्रमुख स्मगलर, तो ऐनापुरे फिरता व्यापारी, गावोगाव हिंडून माल विकणारा यांची, फोटोसह ! साहेब ताड्कन उठून उभे राहिले व ओरडले–

‘ अहो काटे ! उभे काय इथं तुम्ही ? जा चालते व्हा एकदम–’

‘ म्हणजे ? साहेब, बातमी पसंत नाही ? आपला अभिप्राय ? मला नोकरी नाही मिळणार ? ’

‘ ते सगळं मग ! आधी ऑफिसात खास बातमीदाराच्या केबिनमध्ये जाऊन बसा अन् लागा कामाला. अशा छान कथा, सत्यकथा देत चला नेहमी. जा. वन मिनिट, करवंदीच्या काटेरी मुला, हा चहा आला आहे, तो माझ्याबरोबर घे. तू आमचा खास बातमीदार झाल्याबद्दल ! आम्हांलाही रत्नाची पारख असते म्हटलं, काटे ! ’

‘ करवंदीचा काटेरी मुलगा ! ’ ते शब्द ऐकून तो धन्यतेने हसला. त्याला वाटले, अखेर गुणांचा सन्मान हा होतोच. फक्त योग्य समय यावा लागतो, ती संधी साधावी लागते, इतकेच–

म. ग्रं. सं. ठाणें. ...... शाखा.
१६३०
विषय

२

# हिरव्या हवेलीचे रहस्य

कुठे करवंदी आणि कुठे कोल्हापुरापलीकडे असणारे शाहूपूर शहर? किती दूर! चोवीस तासांचा रेल्वे-प्रवास. माणूस कंटाळून जाईल नाही तर काय! तरी पण बापू अन् किसन हे दोन जिवलग मित्र तसे कंटाळले नव्हते फारसे. एक तर ते सोळा-सतरा वर्षांचे उत्साही मुलगे होते अन् दुसरे बापू फार दिवसांनी नाना आजोबांकडे जाणार म्हणून आईने काय काय अन् किती किती फराळाचे दिले होते बरोबर. लाडू. चकल्या, खमंग सांजोऱ्या, अनारसे! तरी बापूने आठवण करून दिली होती—


'आई, कागलसारखी इचलकरंजीही कोल्हापुराजवळ आहे ना?'

'आहेरे, पण इचकरंजीची आठवण का? कुणी नाही आपलं तिथं.'

'नसूदे. आठवण अशासाठी, मोठं गमतीचं नाव. फक्त एक अक्षराचं इजिन जोडलं की सार्थ! आई चल. करंजी, करंज्या दे बरोबर! त्याची आठवण दिली आपली.'

'बरं बरं, देते हं! आई गेल्यापासून नानांना दिवाळीत कुणी फराळाचं नीटपणे करून देत नसेल. खरंच, करज्या त्यांना आवडतात. घेऊन जा डब्बाभर. दुपारी करीन ओल्या नारळाच्या. नरम होतात. नानांना बऱ्या.'

तर असे झकास फराळाचे मधून मधून खायला असल्यामुळे बापू खूष अन् आपला करवंदाचा काटेरी किसन?



तोही आनंदात होता; कारण 'आज'चे संपादक देशमुखसाहेब त्याला दिवाळीतसुद्धा रजेवर जाऊ देण्यास तयार नव्हते. आधी म्हणाले होते,

'अरे, दिवाळीतही ऑफीस चालू असतं. 'आज' कधी थांबत नाही. अशा वेळी आमचा साहसी बातमीदार बाहेर कसा जाऊ द्यावा ?'



फळीच्या भोकातून ते आत पाहत राहिले.

' साहेब, ' आज ' च्या दिवाळी अंकासाठी मी केवढी मोठी सत्यावर आधारित कथा लिहून दिली नाही का ? बातमीदार झाला, तरी त्यालाही विश्रांतीची गरज असते. मला फक्त चार दिवसांची बिनपगारी रजा द्या.

मी विनंती करतो–' कंटाळल्या आवाजात काटे म्हणाला होता. मग साहेब हसले होते व म्हणाले होते—

'असं! बरं तर जा. जा, काटे! दिवाळी बाहेरगावी करून फ्रेश होऊन या. असं करा, ऑफिसचा पॉवरफुल कॅमेरा व दुर्बीण बरोबर न्या. न जाणो, शहापूर गावी तुम्हाला जर 'आज' साठी एखदं सनसनाटी कथानक आढळलं तर त्याची गोष्ट लिहू शकाल आणि मग तुमच्या ट्रिपचा सर्व खर्च 'आज' च्या ऑफिसातून मिळेल.' किसन काटे मनापासून हसला होता. तो झकास कॅमेरा व दुर्बीण घेऊन निघाला होता बापूच्या आजोळच्या गावी दिवाळीला आणि तुकारामाने आनंदाने त्याला परवानगी दिलेली होती. बापूचे किसनवर मोठ्या भावासारखे प्रेम आहे हे त्याला माहित होते. ती जोडी राम-लक्ष्मणासारखीच वाटे तुकारामाला. सायंकाळ होत आली. बापूला किसनने विचारले,

'कसे आहेत रे तुझे हे नानाआजोबा?'

'स्वभावानं म्हणशील तर फारच प्रेमळ, पण दिसायला कसे म्हणशील तर ते मला नीटसं आठवत नाही. अरे, सारा सात वर्षांचा होतो मी मागं इकडं आलो होतो आईबरोबर तेव्हा. पण ते एका पायानं लंगडतात व दुसरं म्हणजे आवाज फारच गोड आहे. भजनं रोज म्हणतात देवाची नाना, एवढं ध्यानात आहे.'

'बरं, घर कसं आहे?'

'अगदी छोट्या किल्ल्यासारखं. त्याचं नाव हिरवी हवेली.'

'किल्ल्यासारखं घर? या दिवसात असं कुणी बांधीत नाही सहसा—'

'आता महागाईत नसेल कुणी बांधत अशी घरं. पण आई सांगते ना, शाहू महाराजांच्या वेळेलाच नानांच्या वाडवडिलांनी ती मजबूत हवेली बांधून घेतली. त्यावेळी असे छोटे किल्ले सरदार लोक बांधीत असत म्हणे.'

'सरदार लोक? कोण सरदार? नाना?'

बापू हसत म्हणाला, 'काट्या ! तुला अगदी बित्तंबातमी हवी आहे वाटतं त्या घराची अन् नानांची? 'आज' चा बातमीदार शोभतोस बाबा !'

'प्रथम माहिती ! जिथं राहायला जायचं, तिथली शक्यती माहिती हाती हवी असं मला वाटतं, बाप्या.'

'तर मग तुमची निराशा होणार, बातमीदार. मला एवढंच माहीत आहे की, नानांचे कुणी आजोबा–पणजोबा मोठे लढवय्ये सरदार होते व त्याची साक्ष म्हणून त्या हिरव्या हवेलीत काही पुतळे व काही चिलखतं व शस्त्रं ठेवलेली आहेत. ते फार पुसट आठवतं मला. पण दुसरी गम्मत छान आठवतेय. अगदी मस्त आहे ती—'

'सांग सांग. ही घे केळी पोटभर, म्हणजे नीट सांगता येईल मित्रा, तुला —'

'किसन ! अरे, आठवते ती एक चोरजिन्यांची गम्मत. एकदा वरती एका लहानशा खोलीत खेळत होतो मी. सहज एक कोपऱ्यातलं कपाट उघडलं तर अंधेरा जिना ! मी भीत भीत गेलो तर तळघरात आजी अन् आई काही बोलताहेत तिथं पोचलो. अजून आठवतं. पण ते बघ आपलं गाव आलं —'

'घे तर ते फराळाचं नीट उतरून. आजोबांचं नाव सांगून करून घेतलेल्या त्या करंज्यांचा डबा आधी घे आठवणीनं. विसरशील.'

'अन् तुम्हीही तुमची आयुधं–कॅमेरा-दुर्बिणीचं जोडपं संभाळा म्हटलं.'

स्टेशनवर ते उतरले पण कुणीच स्टेशनवर आलेले नाही हे काय? गाव स्टेशनपासून तीन मैलांवर अन् त्या खेडवळ स्टेशनात बस तर राहू द्या, पण टॅक्सी वगैरेही नव्हती. आता काय, बैलगाडीतून जायचे या अंधेराच्या वेळी ?

नशीब त्यांचे, एक मोडकळलेला टांगा त्यांना मिळाला.

'कुठं जायचं साब शाहूपुरात ?' टांगेवाल्याने विचारले.

'हिरव्या हवेलीत! चला लौकर, अंधार पडू लागलाय्–'

टांगेवाला दचकून म्हणाला, 'काय? हिरव्या हवेलीत? नाय बा. आपुन् शाप येत न्हाई. या वक्ताला ततं थोरल्या शितोळ्यांचं पत्र्याचं भूत हिडतंय रोज म्हनं! पोरांनो, कशाला त्या इचित्र घरी निघाला?'

किसनने म्हटले, 'टांगेवाले, आम्ही त्या घरचेच. जायलाच हवं. भूत कसलं आहे सांगून ठेवा–'

'अवं, पत्र्याचं. जुन्या लढाईत सरदार लोक घालत हुते तसलं चिलखत घातल्यालं! डुईवर पत्र्याचा टोप, पायांतनी लोखंडांचंच चढाव. नको बाबा, मी येत नाही –'

'अहो, असं काय? चला, दुसरा टांगापण नाहीये–'

'बरं, पर मी भाईर दूर रस्त्यावर सोडनार. बागेच्या फाटकाशी येनार न्हाई.'

त्यांना मग त्या घराशी रस्त्यावर सोडून टांगेवाला म्हणाला, 'त्यो एक बुरुज दिसतो ना? तीच हिरवी हवेली. संभाळून जावा पोरांनु!' तो निघून गेला. हिरवी हवेली गुडुप् अंधारतच होती. व्हरांड्यात फाटकावर अगर खिडकीतसुद्धा दिवा दिसेना. मुलांनाही आश्चर्य वाटले. बापूची तारही मिळाली नव्हती का आजोबांना? किसनला मागल्या बुरुजात थोडा मिणमिणता उजेड दिसला. तो म्हणाला–

'बापू, बुरुजात दिवा आहे तिकडं जाऊया? अरे, अशा घरांना दोन बुरुज असतात. इथं एकच कसा?'

'दुसरा पडला असेल. विचारूया नानांनाच. पण या बुरुजात आजोबांची फार मोठी लायब्ररी आहे. तिथं ते नेहमी बसायचे, असं आठवतं खरं–'

'मग जाऊया तिकडं?'

'नको किसन. वाट अंधारी आहे. आपण आता घरातच जाऊ. तो

बघ, समोरचा मोठा दरवाजा. ठोठावून पाहू. आजोबा इतक्या लौकर झोपले की काय? आठच तर वाजताहेत आत्ता.'

बापू स्वतःशी बडबडत पुढे गेला व त्याने दारावरची कॉलबेल दाबली. खणखणून आवाज झाला. एका नोकराने दार उघडले व आतला दिवा लागला. नोकराने विचारले-

'कोण पाहिजे? कोण आपण? इतक्या रात्रीचं काय काम काढलं?'

'मी बापू- करवंदीचा-'

'ऑं? करवंदी? कुठंशी आहे बुवा हे गाव! आणि इथं कुणाला भेटायला आला?'

'नानासाहेब शितोळे यांना. त्यांचा मी नातू. हा माझा मित्र. आहेत ना ते इथं? माझी तार पोचली नाही का?'

तो नोकरही दचकल्यासारखा झाला. दोघाही चलाख पोरांच्या डोळ्यांतून ते निसटले नाही. नोकर मग म्हणाला,

'म्हणजे? तार केली होती तुम्ही? भले शाबास! इथं या गावी तारेपेक्षा पत्रच लौकर पोचतं. या. आत या. नानासाबांना बोलावून आणतो मी. बसा इथं.' सामान घेऊन ते आत आले व नोकराने दर्शविल्याजागी बसले. कोपऱ्यामध्ये एक दार होते लहानसे. त्याला फट होती. सहज चौकस किसन तेथे गेला व त्याने डोकावून पाहिले अन् तोही दचकलाच-

आत अगदी अंधुक उजेडात चिलखत व शिरस्त्राण घातलेला एक लोखंडी पुतळा हळूहळू फिरत होता. आजूबाजूला आपले लोखंडी डोके वळवीत फेऱ्या घालीत होता तो.

ऑं? ही काय भानगड? किसनने नीट पाहिले. तो एक लांबट दिवाणखाना होता. तेथे भिंतीवर टांगलेली ढाल, तरवार, जंबिये इत्यादि हत्यारे होती व लहान-मोठे दोन ओतीव पुतळेही होते. चिलखत न

घातलेले. हे शस्त्रागार तर नव्हे बापूने सांगितलेले ?

किसनची दृष्टी अतिशय तीव्र होती. त्याने निरखून पाहिले. पुतळे लोखंडी पत्र्याचे होते. अगदी संपूर्ण. फार काय, पायातही लोखंडीच पण कोल्हापुरी पद्धतीचे चढाव त्याला दिसले. या पत्र्यांच्या पुतळ्यांत हा एकच फिरणारा पुतळा आहे ? कळीचा तर नसेल ? त्याची नजर चटकन् त्या मंद फिरणाऱ्या पुतळ्याच्या पायांकडे गेली अन् फिरून तो चमकला– ते पाय लोखंडी नव्हते. माणसाचे होते ! सारेच गूढ. कोण होता तो ?

चाहूल लागली तशी झटकन् तो जागेवर येऊन बसला. नोकराने गरम कॉफी आणली होती व थोडी बिंकिस्टे. तो म्हणाला–

'मालक आता इतक्यात येतील. थंडीचं जरा लौकर झोपतात ते. मी उठवलं आहे. अन् तसं जेवणाचं पण लवकरच करतो. घ्या कॉफी. छोटे धनी, पप्पूराव– '

'पप्पू नाही, बापू मी. तुझं नाव ?'

'मला महादू म्हणतात. अंघोळ करायची असेल तर पाणी ठेवतो तापत.'

'नको महादबा, इतका लांबचा प्रवास, खूप दमलोत आम्ही. दोन घास खाऊन केव्हा अंथरुण गाठतोसं झालंय.' किसनचे डोळे पेंगुळल्या-सारखे दिसत होते. तो जड स्वरात म्हणाला व नोकर चालता झाला.

बापू कुरकुरू लागला– 'खरं म्हणजे आईनं सांगितलं होतं की, नाना आजोबांचा मी अतिशय लाडका एकुलता एक नातू ! मला पाहिल्यावर ते बुरुजातूनसुद्धा लंगडत पण धावून येतील. 'भारी पोरांचं वेड त्यांना बघ, बापू.' अन् इथं पाहावं तर सगळाच थंडा कारभार !'

'मलाही सारं काही ठीक वाटत नाहीच आहे इथं. एवढी मोठी हवेली अन् एकच नोकर ? गेटवर गुरखा पण नाही ?'

'खरं म्हणजे पाच-सहा नोकर होतेसं आठवतंय् मला. त्यावेळी घर

गजबजलेलं असायचं अन् होय, गुरखा पण होता. मी त्या पठाणाला घाबरून पळायचो–'

'चूप चूप! नाना आजोबा आलेले दिसतात.'

एक वृद्ध माणूस डाव्या पायाने लंगडत थंडपणे आत आला. किसन-कडे पाहत तो उद्गारला– 'अरे! बाप्या, किती मोठा दिसू लागलास रे या दोनतीन वर्षांत? हाच का तुझा मित्र?'

बापूने नमस्कार करीत म्हटले,

'आजोबा, बापू मी. तो नाही. तो माझा मित्र, किसन काटे. ओळखलंच नाही का मला नाना तुम्ही?'

'अरे, खरंच की! आता मोतीबिंदू येताहेत ना आमच्या दोन्ही डोळ्यांत? जरा मंद दिसतं बाप्या.' अन् मग त्या वृद्धाने त्याला छातीशी घट्ट धरले व म्हटले,

'छान छान! बरं झालं तीन वर्षांनी भेटायला आलास ते. बरं चला आता जेवण करायला. आमचा महादू झकास जिन्नस करतो. भुकेलेले असाल. आई बरी आहे ना?'

'चांगली आहे, नाना.' बापूने त्रोटक उत्तर दिले व किसनकडे पाहिले.

त्याच्या कपाळावर एक त्रासिक आठी उमटली होती. चेहरा गंभीर झाला होता!

माडीवर कोपऱ्यातल्या एका छोट्याशा खोलीत नोकराने त्यांना आणून पोचवले व म्हटले, 'इथं आराम करा, छोटे मालक. बिछाने घातले आहेत मी. अन् सकाळी मालक पहाटे उठून दूर फिरायला जातात. तुम्ही लवकर उठलात, तर ही घंटा वाजवा. मी नास्त्याचं आणून देईन. अन् चहा, दूध —काय हवं, तेही देऊ.' मग थोडा वेळ खोलीत सामसूम.

दार घट्ट लावून घेत बापू म्हणाला,

'किशा, मला बरंच चमत्कारिक वाटतंय् बाबा इथं. आजोबांच्यात

बराच फरक पडला आहे. अरे, मघाशी मी त्यांच्या खोलीवरून गेलो जेवणघरात, तर ते लावणी म्हणत होते–'

'यात काय चमत्कारिक? म्हातारपण झालं म्हणून काय, एखादं आवडतं गाणं गुणगुणूच नये की काय माणसानं?'

'किशा, ऐक आधी नीट. अरे, दोन गोष्टी ध्यानात घे. आजोबांना भजनंच म्हणायचं वेड होतं, लावण्या नाही! अन् दुसरं त्यांचा आवाज? किती सुरेल आवाजात गाणं म्हणायचे तेही मला आता आठवतंय्. आणि आता आजोबांचा आवाज अगदीच भसाडा झालाय. त्यात गोडवा नाही काडीचा! हे कसं? आणखी एक–'

'बापू, तुझंही निरीक्षण चांगलं टवटवीत होत चाललं आहे अलीकडं. धन्यवाद. आणखी काय म्हणत होतास?'

'आणखी असं– करवंदी गाव कुठंशी आहे?' म्हणून त्या महाद्यानं विचारलं! अरे, माझी आई नानांची एकुलती एक मुलगी. माझे वडील करवंदीचे कुळवंत पाटील होते. ते या नोकराला कसं माहीत नाही? मागं तर दरेक गडी-नोकर 'ताईसाब! आम्हांला न्या की तुमच्या करवंदीला करवदं खाया!' म्हणून म्हणायचा. 'करवंदीचं छोटे बापूराजे, परत कवा येनार?' म्हणून अगत्यानं, मायेनं विचारायचा. अन् हा उर्मट म्हाद्या म्हणतो– 'करवंदी कुठंशी?' कमाल आहे!'

'अरे, नवा असेल महादू! नसेल त्याला ठाऊक. पण आजोबा तर मायेनं बोलले ना? तुला त्यांनी मिठी घातली. बस्, आणखी काय हवं? अन् हळू बोल जरा. महाद्याची नजर अन् कान इकडच असायची शक्यता आहे बापूराव!'

बापू चिडून म्हणाला, 'मिठी! तेही चमत्कारिक वाटतं आहेच. आजोबा म्हातारे अन् वाळके, दुबळे होते तेव्हा. आता त्यांची छाती मला चांगली मजबूत, भरलेली सशक्त माणसासारखी वाटली. आणखी

एक–ते नुसतं म्हणाले– बरी आहे ना आई म्हणून ?'

'मग ? आता त्यांचं यात काय चुकलं बाबा ?'

'अरे, आईला ते नेहमी 'आमची सोनाक्का' म्हणतात. पत्रांतूनसुद्धा हेच नाव लिहितात. भारी माया त्यांची आईवर. तिथं फक्त एक रुक्ष प्रश्न तिच्याबद्दल– बरी आहे ना आई ? फारच विचित्र ! वाटतं, ही हवेली तीच आहे खरी; पण हे लोक कुणी आपले नाहीत !–' बापूने डोके घट्ट दाबून धरीत म्हटले.

'बापू, कुठलाही निर्णय अशा घाईनं घेणं ठीक नाही, बेटा ! तुझ्या-प्रमाणं मलाही काही संशयास्पद गोष्टी लक्षात आल्या आहेत. पण आधी आपण नीट सावध राहावं, त्यांची बोलणी ऐकावी–अन् मगच मत ठरवावं हे बरं, खरं ना ? झोपूया आता. कालचं जागरण आहे रात्रभरचं.'

'ठीक, तुझंही खरं ! अरेच्या, हे काय ? कोपऱ्यात उभं पुरुषभर उंचीचं भिंतीत कपाट ? तेही एवढं अरुंद ?' बापू तेथल्या खिडकीत ठेवलेला पाण्याचा चंबू उचलताना उद्गारला.

'अहो, संशयस्वामी ! आता कपाटातही काही विचित्र दिसलं काय ? साधं हे कपाटही आपलं नाही असं तर नाही वाटलं बापूराजांना ?'

'हं ! चेष्टा बापूराजांना पसंत नाही. पण खरं सांगू ? उलटं, हे कपाटच मला अगदी आपलं आहे असं वाटतंय बघ. कारण अरे, हीच आमची खेळायची खोली होती अन् यातून तळघरात जिना होता. बातमी-दार, आता बोला.'

'बापरे ! नक्की आठवतंय का तुम्हाला राजे ?'

'खबरदार, राजे म्हटलंस तर ! 'बाप्या' हाकच जास्त प्रेमाची, महा-राजे. खरं सांगू ? अरे, इतकं आठवत नव्हतं पण हे कपाट पाहताच आठवलं. सगळं जाऊन पाहायचं का या जिन्यानं ?' 'आता डोळे मिटताहेत, बाबा ! दमलोत आपण.'

रात्रीचे बाराचे टोल वाजले. माडीवर एक मोठे क्लॉक पलीकडच्या रुंद दालनात कुठेतरी भिंतीला लावलेले होते. त्याचे ते ठोके ऐकून किसनची सावध झोप उडाली. त्याने हलवून बापूला जागे केले व अगदी हळू स्वरात म्हटले, 'बापू, चल. गुप्त जिन्यानं तळघरात आता. सगळं घर शांत दिसतं आहे. ऊठ.'

बापू कुरकुरत उठला कारण किसनचे सगळे काही तो ऐकत असे. मोठ्या आज्ञाधारकपणाने. जसा त्याचा पाठचा भाऊच! हातात टॉर्च घेऊन बापूने कपाट उघडले. धूळ माती खूप होती. बहुधा कितीक दिवसात ते कपाट कुणी उघडलेच नसावे! आतल्या फळ्या त्याने दोन बाजूस सरकविल्या तर खरेच एक दगडी पायऱ्यांचा अरुंद जिना त्यांना दिसला. ते निघाले टॉर्चच्या उजेडात. न जाणो, पडीक वाट, विंचू काटा असायचा! हलके उतरत उतरत ते एका शेल्फाशी तळघरात थांबले. याही दारात एक फळ्यांचे कपाट होते, पण त्याला दारे नव्हती. बहुधा मोडली असावीत. कपाटाच्या फळ्या जुन्या झालेल्या, मुंग्यांनी कोरून भोके पाडलेल्या होत्या. त्याला डोळे लावून ते पाहात राहिले काय नवल? सारे घर झोपले असले तरी तळघर जागे होते! महादा व आजोबा दोघे खुर्च्यांवर समोर बसलेले होते. टेबलावर दारूची बाटली व दोन ग्लास होते. ग्लासातले पेय मधूनमधून घेत ते बोलत होते. हळू बोलण्याची जरूर काय? गुप्त तळघरात रात्रीचे कोण यायला बसले इथे? झक्क उजेड होता तेथे. क्लिक्: क्लिक्! दोन अगदी नाजूक आवाज जिन्यात उठले. शेल्फाच्या मागल्या फळीला चांगले रुपयाएवढे भोक पडलेले होते, तेथे कॅमेऱ्याचे लेन्स चिकटवून किसनने दोन फोटो घेतले देखील. तो नाजूक आवाज त्यांना ऐकू गेला असावा. ते बोलू लागले.

'आँ? कसला आवाज महादार?'

'तू उगीच घाबरतो आहेस, मोऱ्या!' अरे, तळघर जुनं, तीनशे

वर्षांचं. उंदीर खूप असतात अशा जागी. करतात, की–की, ची–ची. आणखी पेग घे बघू. '

'काही असो, फार दिवस इथं निभावायचे नाहीत आपले महादार. लोक ओळखणारच ! '

'कोण लोक ? इथं काळं कुत्रंसुद्धा नाही फिरकत. गावातलं थोरल्या पहिल्या शितोळे सरदारांचं पत्र्याचं भूत तर खूपजणांनी बागेत हिंडताना बघितलंच आहे. तेव्हापासून दिवस बुडाला की इकडं यायला टांगेवाले, सायकलवाले पण घाबरतात, मोरे. ध्यानात घे ! ' ते दोघे मजेने हसले.

'घेतलं ध्यानात, महादार ! मूर्खा, तरीही ही कोण दोन कारटी आलीच ना इथं ? '

'त्यातलं एक पोरगं तर भारी चलाख वाटलं. ' मोरे उद्गारला.

'हूँ ! असत्यात काही पोरं माझ्यावाणी चलाख. मोरे, आणि एक पेग घे, म्हणजे सारी भीती जाईल तुझ्या डोक्यातली. क्षुद्र गुडघ्याएवढी पोरं ती काय ! वर पडली आहेत, कोपऱ्यातल्या खोलीत घोरत. त्यांना काय घाबरतोस रे ? '

'ते जाऊदे. आपलं काम लवकर आवरलं पाहिजे अन् इथून चंबू-गबाळं लौकर आवरलं पाहिजे, एवढं मला समजतं. अजून का हा दौल्या माने आला नाही ? मला काळजीच वाटते. बोलून चालून गुंड माणूस. त्यातून तुरुंगातून नुकताच सुटलेला. आणखी बरोबर म्हणे– 'माल' घेऊन येणार ! कुठं राहाणारय तो ? '

'वा ! त्याला राहायला आसरा हवा, म्हणून तर हे सारं नाटक आपण रचलं. हे तळघर त्याला राहायला कसं सोईचं आहे यार ! दौलती माने आपला साथीदारच होता. त्याला साह्य आपणच केलं पाहिजे, मोरे. कळत नाही का तुला ? '

'ते खरं रे, पण वेळ होऊन गेली त्यानं दिलेली. वाट पाहात

काय पहाटेपर्यंत बसायचं ? की पहाटे त्या थेरड्याचं भजन ऐकायला जायचं ?'

'नाही नाही. आता झोपूया. मी कधीही आलो तरी रात्री बारापर्यंत येईन असा निरोप आहे. उद्या येईल दौलतराव दौलत घेऊन इथं. चल, मोरे' आजोबा उठले व चालू लागले. पण आता ते लंगडत नव्हते मुळीच ! आणि मग दिवा मालवला गेला. तेथे सामसूम. जिन्यातही सामसूम झाली !

बापू लवकरच झोपी गेला, पण किसनला कुठली झोप ? त्याचे शोधक मन टक्क जागे होऊन बसले. तळघरातली बोलणी त्याच्या कानांत गुंजन करीत होती. पहिल्यांदा त्यांना नाना आजोबांच्या खरेपणाचा संशय आला होता, तो संशय अगदी रास्त होता. ते खरे आजोबा नव्हतेच हे सांगायला आता कुणी होराभूषण ज्योतिषी थोडाच आवश्यक होता ? दोघांनाही ते त्या बोलण्यतून समजले होते. पण या कपटाचा उद्देश ? किसनला त्या बोलण्यातले काही महत्वाचे शब्द परत परत आठवू लागले. एखादी फोनोची रेकॉर्ड पिचते, तिला चीर पडली की कशी एकाच शब्दावर परत-परत गरगरत राहाते ती ! तसाच हा प्रकार. तेच ते शब्द परत त्याच्या कानाशी घणाणत होते—

'फार दिवस निभायचे नाहीत इथं—'

'पहिल्या थोरल्या शितोळे सरदारांचं भूत बागेत हिंडतं !'

'दौल्या माने आपला साथीदारच. साह्य केलं पाहिजे. तो उद्या येईल.'

'बरोबर माल घेऊन येणार !'

'पहाटे त्या थेरड्याचं भजन ऐकायला जायचं का ?'

हेच शब्द. किसनची चलाख बुद्धिमत्ता हे शब्दकोडे जुळवीत राहिली. मधेमधे शब्द सोडलेल्या घड्यांचे कोडे 'आज' मधल्या 'बालविभागात'

दर रविवारी येई, तसे हे शब्द, काही मधली वाक्ये सोडलेले असे होते. ती साखळी त्याच्या मनात जुळत राहिली.

पहाटे चारचे टोल मोठ्या क्लॉकने दिले, दूर कुठेतरी कोंबड्याचे आरवणे ऐकू आले व जरा वेळाने अस्पष्ट पण मधुर स्वराचे गायन त्याच्या कानी येऊ लागले. कोण गात होते यावेळी ? अन् कुठे ? किसनने जास्त ध्यान देऊन ऐकण्याचा प्रयत्न केला. गाणे फार दुरून आलेसे वाटले पण ते रेडिओ अगर फोनोवरचे नव्हते. कारण गाण्याला कुठल्याही वाद्याची साथ नव्हती. किसनजवळ उत्तम दुर्बीण होती. ऑफिसची. तिने दूरचे देखावे स्पष्ट दिसत. तशी एखादी 'दूरध्वनिका' असायला पाहिजे होती दूरचे शब्द ऐकविणारी ! तो मनात विचार करीत राहिला व एकदम त्या गीतातले उंच स्वरातले दोन–तीन शब्द त्याला ऐकू आले—

'मीरा कहे प्रभू, गिरिधर नागर—'

'अरे, हे तर भजन आहे. भजन ? म्हणजे खात्रीनं नाना आजोबांचं !

'पहाटे त्या थेरड्यांचं भजन ऐकायला जायचं का ?' म्हणाला होता तो मोरे नाही ? पण कोठून येतात हे स्वर ? खोलीतून ? खाली तळघराला आणखी एखादी खोली असेल काय ? पण छे, हा आवाज जमिनीच्या तळातून येणारा नव्हे. डाव्या हाताकडून येतो. आणि डाव्या हाताला काय आहे बरं ?'

त्याने खिडकीतून डोकावून पाहिले. उंच बुरजाची आकाशाच्या पडद्यावर जणू सिल्हूटच्या चित्रासारखी काळसर रंगाची आकृती ! जणू हिरव्या हवेलीने एक हातच उंच धरला होता आपला. खात्रीने तो आवाज बुरजातून येत होता—मंदच पण सुरेल गीतांचा —

किसनने झोपाळू बापूला उठविले व त्याच्या कानाशी म्हटले—

'ऊठ, आपल्याला एक साहस करायचं आहे अन् ते आत्ताच !'

'अरे, अंधार किती आहे ? साहस करावं रे, पण या साखरझोपेच्या

वेळी ?’

‘साखरगोष्टी बोलायची ही वेळ नाही गोपूबाळ ! सत्कार्याला कोणतीही वेळ शुभच समजावी. ऊठ, जायचंय् बाहेर !’

‘बाहेर ? कुठं ? कसं ? दारं बंद आहेत हवेलीची महाराज, झोपा बघू !’

‘मी झोपणार नाही अन् तुलाही नाही झोपू देणार आळशासारखा. चल. म्हणे, दार बंद ! बाप्या, विसरलास का ? करवंदीला आपण सूरपारंब्यांचा खेळ खेळताना किती उंच उड्या घेत होतो ते ? या उघड्या खिडकीतून गच्चीवर चल. ते बघ केवढं मोठं झाड, फांद्यांचे हात पसरून झेलायला तयार आहे आपल्याला. चलो जल्दी !’ त्याने त्याला उभे करीत म्हटले व मग बापू एकदाचा तयार झाला.

खिडकीतून गच्चीवर व तेथून वडाच्या फांदीवर ते अलगद उतरले. तेथून त्यांनी मागल्या पडीक जागेत उड्या घेतल्या. मऊ हिरवळ होती. आवाज झाला नाही. मग बॅटरीच्या झोताने हलकेच रस्ता पाहात ते निघाले. बापूने अखेर विचारले—

‘प्लीज, आपण कुठं जातो आहोत, ते तरी सांगा बातमीदार.’

‘बुरजाकडं. तो बघ एक दिवा लुकलुकतोय बारीक. कालही पाहिला होता आपण तो. दुसऱ्या मजल्यावर, तिथं !’

‘परत दुसरा मजला ? बापरे, चढणार कसा तो आपण ?’

‘अहो मित्रटसिंग, काल दुर्बिणीतून मी पाहिलं होत. बुरजाला एक वाटोळा जिना दिसला होता मला वर जायला. पण बोलायचं नाही आता. चालायचं !’

खरोखरच बुरजात एक मिणमिणता दिवा, दुसऱ्या मजल्यावरच्या एकाच खिडकीतून दिसत होता. त्या अति अरुंद पायऱ्या बेताने चढत दोघेही चोरपावलांनी त्या खिडकीजवळ आले. खिडकी कसली ती ? तो

एक वीतभर रुंद व दोन विती उंच असा छोटा झरोकाच होता. तेथून भजनाचे शब्द ऐकू आले–

'नदीया गहेरी, नाव पुराणी, बुडत जहाज तराव, प्रभुजी, नाव किनारे लगाव. मीरा कहे प्रभु, गिरिधर नागर ऽऽऽ —'

बापू एकदम म्हणाला– 'किशा, हा नक्की आजोबांचाच आवाज– होय, नानांचाच!' मग त्याला राहवेनाच. त्या झरोक्याला चेहरा चिकटवीत तो ओरडला–

'नानाआजोबा! मी आलोय, तुमचा नातू बापू तुम्हाला भेटायला.'

एकदम त्या खोलीतले सूर थांबले. एक दुबळा वृद्ध त्या झरोक्याशी आतून येऊन उभा राहिला व म्हणाला–

'का ऽ य? आमच्या सोनाक्काचा बापूबाळ? इथं आलास तू? अरे, किती सात-आठ वर्षांनी आलास बेटा अन् मी यावेळी असा–कोंडलेला, इथल्या माझ्याच लायब्ररीच्या गॅलरीत! काय योगायोग पोरा, तुला जवळही घेता येत नाही रे. प्रभूची मर्जी!'

'पण का? तुम्हाला कुणी, का, कसं कोंडलं इथं?' किसनने विचारले.

नानांनी हळूहळू सारे काही सांगितले. मग किसनने हलकेच एक लहानसा पुडा झरोक्यातून आत सरकविला व गोपूला 'तू बोल!' म्हणून खुणावले.

बापू म्हणाला– 'नाना आजोबा, आईनं तुमच्यासाठी ओल्या नारळाच्या वारंज्या भरून दिल्या त्या या पुड्यात आहेत. घ्या, नरम आहेत—'

आजोबांना बोलवेना. डोळ्यांतन अश्रू आलेले चमकले. किसन हळुवारपणे म्हणाला–

'मी किसन, बापूचा मित्र. वडीलभाऊच म्हणाना! आणि आता चिंता

नको, नाना. फक्त उद्यापर्यंतच ही कैद सोसा. मी सगळं पाहतो ते.'

गडद अंधारात दोघे चुपचाप उतरले. परत वडाचे झाड, फांद्यांचे हात, गच्चीचा कठडा, मग ती कोपऱ्यातली खोली! खिडक्या बंद करून मग मात्र ते आरामात झोपले.

दुसऱ्या दिवशी आठ वाजता महादू उठवायला आला तर पोरे अगदी डाराडूर झोपा काढताहेत. तो कुचेष्टेने हसला व पुटपुटला, 'भोळी पोरं, दमली होती प्रवासात बापडी. अजून झोपा उघडत नाहीयेत!'

त्या 'नानासाहेब' म्हणवून घेणाऱ्याला सकाळी किसनने नम्रतेने विचारले– 'नानाआजोबा, या गावात माझा एक मित्र राहतो, कागलकर म्हणून. आम्ही जरा भेटून येऊ का? जेवायला परत येतो. त्याला त्याच्या आईनं फराळाचं दिलंय ते पोचतं करतो –'

'घर सापडेल का?'

'सापडेल की. एवढंसं तर तळहातासारखं गाव, आजोबा.' बापू पुटपुटला व 'काय वावळट पोरटी!' असे मनात म्हणत तोतया नाना आजोबांनी परवानगी दिली. हिंडेनात का दिवसभर? गुडघ्याएवढी कारटी, ती काय करतात?

पण बापू अन् किसन काही निराळ्याच कामाला गेले होते व परत आले तेव्हा हसतच होते. आवडले होते त्यांना हे गाव बहुतेक. अन् दुसऱ्या दिवशीची पहाट उजाडली ती अगदीच वेगळी!

त्या प्रशस्त दिवाणखान्यात आज कालच्याहून अगदी वेगळाच देखावा दिसत होता. कृश आणि वृद्ध कैदी–खरे नानासाहेब शितोळे – एका आरामखुर्चीवर बसले होते. समोर कोचावर पोलीस इन्स्पेक्टर मि. राजे, व किसनबापूची जोडी मिस्कीलपणे हसत असलेली! राजे उद्गारले –

'शितोळेसाहेब, या तुमच्या छोट्या पाहुण्यांनी केवढी कामगिरी बजाविली, ते ऐका. अहो, हा मोरे, पूर्वी एका नाटकमंडळीत नटव्यांचा

सुरेख मेकप करीत असे. हळूहळू या महादारनं त्याला घेरलं. महादार व दौल्या माने त्या कंपनीत पडदे ओढायच्या कामावर होते. त्यांची बुद्धी फिरली. नाटकातील प्रमुख व संपत्तिमान नटी मिस् प्रभाशालिनी हिच्या घरातच यांनी मोठी चोरी करून तिच्या दागिन्यांचं मूल्यवान डबोलं पळविलं होतं. आम्ही लगेच तपास केला व ह्या दौल्याला पकडलं. पण महादार अन् मोरे कुठं पळाले होते, ते सापडत नव्हते. आज मिळाले.'

नानासाहेब म्हणाले—

'आश्चर्य आहे, पण माझ्या घरात शिरून मला कशासाठी कोंडलं या लोकांनी? इथं चोरी करण्यासारखं काहीच घरी ठेवीत नाही मी! बँकेत ठेवतो पैसाअडका अन् शेते, मळे, घर? कुणाला ही इस्टेट चोरता येत नाही. तरी, इथं माझ्यावर यांची वक्र नजर फिरावी? अजबच—'

राजे इन्स्पेक्टर मुलांनी तयार केलेल्या चहावर व त्यांनीच दिलेल्या फराळाच्या पदार्थांवर खूष झाले होते. ते उद्गारले, 'वा वा! तुमचं घर चोरता आलं नाही, तरी पण तुमचं नाव, व्यक्तिमत्त्व तर चोरता आलंना त्या मोरेला? अहो, दौल्यानं आम्ही त्याला पकडण्यापूर्वीच प्रभाशालिनीचं जडजवाहिर कुठं अज्ञात ठिकाणी पुरून ठेवलं होतं! तो सुटल्याची वार्ता कळताच त्याला अज्ञातवासात काही दिवस इकडं राहायला तुमचं हे किल्लेवजा घर किती सोईचं, गावापासून दूर, एकीकडं! जवळपास शेजार नाही व फिरून तळघर व बुरुज असलेलं! ते दागिनेही लपवायला ही फारच उत्तम, सुरक्षित जागा.'

किसन हसला अन् म्हणाला, 'दागिने मिळाले का पण साहेब, या रात्रीच्या आपल्या पोलीस-हल्ल्यात?'

'तर? ते दोघे तळघरात दागिन्यांची वाटणी करीत साडेबाराला बसले होते. आपला मोरे तर जुनं चिलखत घालूनच तळघरात पहारा करीत होता मधूनमधून! आम्ही तुमच्या त्या चोरजिन्यात छपून बसलो

होतो व तो जिनाही तुम्हीच दाखविला. तिथून कपाटाचं शेल्फ मोडून आत शिरलो व आम्ही रेडहँडेड पकडले चोर तिघंही. धन्यवाद ! बहादुर मुलगे आहेत तुमचे नानासाहेब ! '

किसन डोळे मिचकावीत म्हणाला– ' पण साहेब, त्या मोरेनं आजोबां-सारखा ' मेकप ' काय मस्त केला होता नाही ? आम्हांला त्या तिघांचा छानसा फोटो घेऊ देता का एक ? '

' बाय् ऑल मीन्स ! पोरा, तूच तर डोकं चालवून एका दिवसात या मोठ्या गुन्हेगारांचा पत्ता लावलास. तुला पाहिजे तेवढे फोटो घे ! '

इन्स्पेक्टरांनी निरोप घेतला.

नाना आजोबांना गहिवरून आले. ते म्हणाले,

' किसन, बेटा आजपासून तूही तुझं हे आजोळच समज व मीही मला आता एकाऐवजी दोन नातू आहेत, असं मानतो. ही हिरवी हवेली नेहमी तुझ्या येण्याची वाट पाहील. केव्हाही ये, बापूसारखा मला भेटायला पोरा ! हे घर तुझंच समज. '

' हिरव्या हवेलीचे रहस्य ! ' हे शब्द वाचताच ' आज'चे मॅनेजर ताडकन् उठलेच, व ते फोटो व त्यावरची झकास खरी रहस्यकथा पाहा-ताच त्यांच्या ओठांत रुंद हास्य पसरले. खुषी-खुषीने ते उद्गारले,

' मास्टर काटे, तुम्ही वातमीदाराच्या कामाला अगदी योग्य व लायक आहात. धन्यवाद ! तुमचा सर्व प्रवासखर्च ' आज 'च्या ऑफिसातून दिला जाईल. मस्त चहा घ्या माझ्या बरोबर अन् सायंकाळच्या ' आज 'मधे ' हिरव्या हवेली ' च्या रहस्याची बातमी द्या आधी. '

किसन खुषीने हसत होता. शाबासकीचे ते शब्द अमृताहून मधुर नव्हते काय ?

बाल वाङ्मय विभाग
बां. क्र. .......... दिनांक ......
विषय क्र.. ........

# ३

# म्यूझियममधील चोरीचे गुपित !


पुण्याहून सुटलेली एक्स्प्रेस वेगाने धावत होती. बापूला फर्स्टक्लासच्या त्या डब्यामध्ये दोन पारशी गृहस्थांखेरीज कोणी दिसले नाही. त्याने एकवार आपल्या उंची अपटुडेट सुटाकडे पाहिले. 'आज आपल्याला श्रीमंत घरंदाज पाटील बनवून घाईघाईने किसन कुठं घेऊन चालला आहे ? काहीसुद्धा बोलला नाही गृहस्थ ! म्हणे, ' नवा होल्डॉल, चकचकीत स्टेनलेसचा टिफीन, जोधपूरचा रोषणाईचा थर्मास आणि एकदम न्यू ब्रॅंड सूटकेस घे !'

छान ! सुदैवानं, माझ्या बाबांचं हे सारं सामान होतं घरात. ते फार हौशी अन् श्रीमत होते म्हणून तर मिळालं सारं सामान चटकन् घरात हे निराळं. पण स्वतः पाहा कसा बावळट कारकुनाचा वेष करून अदबीनं बसला आहे समोर ! हे काय आहे सारं ? कुठं कशाला जातो आहोत ? काही सांगणंही नाही. तो ओरडला,

' किशा ! आतातरी सांगतोस की नाही आपण कुठं अन् का जातोय ते ? का टाकू उडी धावत्या गाडीतून ? हा काय चावटपणा !'

किसन कारकुनाच्या नम्रतेने एकदम उठून म्हणाला,

' हां हां ! धनी, असं बोलणं पाटील-साहेबांना बरं दिसत नाही. खरंतर मी ते आता सारं सांगणारच होतो....पण मला नीट जुळणी करू दे मनात सारी. मग सांगतो, जरा धीर धरावा-'



‘ धनी, तुम्ही त्या कुंपणाआड उभे राहून माळीबुवांचं नि त्या मुलीचं बोलणं ऐका. ’

मग किसन काटेने खिडकीबाहेर टक लावली. हिरव्यागार रानाचा प्रदेश दिसत होता, त्यावर रंगलेला देशमुख साहेबांच्या ऑफिसातला तो संपूर्ण देखावा त्याला परत यावेळी नजरेसमोर दिसला. ते भाषण परत ऐकू येऊ लागले. तो, ते सारे मनात साठवू



लागला.

देशमुख मॅनेजरांच्या समोर, त्यांच्याच वयाचे एक सधन गृहस्थ बसलेले होते.

चर्या चिंताक्रांत, बोटात हिऱ्याची अंगठी, घड्याळही एकदम लेटेस्ट व उंची; सूट या सर्वाला शोभेलसा भारी कापडाचा.

देशमुख म्हणाले–

'बसा काटे, तुम्हाला मुद्दाम बोलवलंय् मी. यांची ओळख करून देतो. हे सारंगपूरचे जहागीरदार, मि. सरंजामे, माझे बालमित्र. सध्या फार काळजीत आहेत हे–'

'ते मी त्यांच्या दृष्टीवरून ओळखलं साहेब, आल्याबरोबर.'

'बरोबर! तर मी तुम्हाला यांच्याच काही कामासाठी खास बोलावून घेतलं आहे. जाल का सारंगपूरला?'

'आपली आज्ञा होत असेल अन् रजा दिली तर, अवश्य जाईन. आपल्या कामाला मी केव्हातरी नाही म्हटलंय का आजपर्यंत? बरं, कशा प्रकारचं काम आहे?'

'एका शोधाचं! साध्या नव्हे, कठीण शोधाचं. अन् तुम्ही ते करू शकालसं मला वाटतं. हे काम तुमच्याजोगं आहे, काटे.'

'थँक्स साहेब. सांगावं काम आपण, सरंजामेसाहेब–'

सरंजामे म्हणाले–

'प्रथम, मला तुम्ही अण्णासाहेब म्हणावं, असं मी सुचवतो. सारंगपूरला सर्व मला या नावानं ओळखतात–'

किसनने मान लववली. मग अण्णासाहेब पुढे म्हणाले–

'काटे, मला पुराणवस्तू जमवण्याचा छंद कधीपासून होताच. या वस्तू खूपशा जमल्यावर मी त्यांचं सारंगपूरला एक झकास म्यूझियम बनवलं. त्याचं नाव 'राजस म्यूझियम–'

एकदम काटे वर पाहात म्हणाला–

'हां हां, म्हणजे टाइम्समध्ये, ज्या म्यूझियममध्ये अद्भुत कुसरीची, सात घोड्यांच्या रथावरची सूर्यप्रतिमा ठेवल्याची माहिती तीन महिन्यांपूर्वी

आली होती ते? त्यातच अलिकडं गुणाढ्याच्या कथासरित्सागर ग्रंथाची दुर्मिळ, हातीव प्रतही ठेवल्याचं मी वाचलं होतं, तेच का?'

'वा! एक्सलंट! देशमुख, तुझा हा बातमीदार खरोखरच चौफेर नजरेनं पाहणारा व माहिती मिळविणारा आहे ह.'

सरंजामे मित्राला म्हणाले. मग काटेला सांगू लागले 'पण काटे, कोठून या बातम्या प्रसिद्ध करायला मी परवानगी दिली, असं मला झालं आहे. ती कथासरित्सागराची पोथी त्यावेळच्या सातवाहन राजानं सोनेरी अक्षरांत लिहवून घेतलेली, त्यात त्याकाळची चित्रंही काढलेली, तीही रंगीत अशी होती. अक्षरांभोवती दरेक पानात शाईची वेगवेगळी वेलबुट्टी होती. अन् ती पोथीच आता चोरीला गेली आहे म्यूझियममधून— नुकतीच!'

'बापरे! तिचं मोल परदेशी प्रवाश्यांनी एक लाख रुपयांपर्यंत केलं होतं ना? तीच नाहीशी झाली? पण ही गोष्ट आली नाही अजून वर्तमानपत्रात कुठं—'

'नाही आलेली. अन् तुम्हीही ती देऊ नका एवढ्यात, 'आज'मधे बातमी म्हणून! कारण चोर सावध होतो त्यामुळं. काटे. काय सांगू? पोथी हे त्यातलं मोठं कलम, पण बारीकसारीक मूर्ती, जुनी नाणी व आकारानं छोट्या पण मोलानं अधिक, अशा वस्तू नेमक्या हळूहळू दिसेनाशा होत आहेत. म्यूझियमला गळती लागली आहे जशी. मी चिंतेत आहे अगदी.'

'पोलिसांत वर्दी दिली नाही का अजून?'

'नाही दिली, कारण वस्तू नुकत्याच चोरीस जाऊ लागल्या आहेत, अन् खरं म्हणजे माझ्या एका जवळच्या आप्ताचा मला संशय आहे याबद्दल. म्हणून मी हे चोरीचं वर्तमान गुप्त ठेवलं आहे. केस पोलिसात दिली की, आमच्या घराण्याच्या इज्जतीचा बोभाटा होईल ही भीती!

ते जाऊदे. केव्हा येता सारंगपूरला ? गाडी पाठवू ? '

'नको साहेब, गाडी नको. थँक्स ! मी अन् माझा एक मित्र असे उद्या रात्रीच्या जेवणाला आपल्या घरी येऊ.'

'राहायला, उतरायला माझ्याकडंच या, आपण दोघं. होईल तो खर्च माझा, काटे !' अण्णासाहेब म्हणाले तशी गडबडीने देशमुख म्हणाले—

'छे छे ! तसं कशाला ? अरे सरंजामे, काटे 'आज'ला बातमी मिळवायलाच येताहेत तिकडं. तेव्हा खर्च आमचं ऑफीस देईल. काटे, यशस्वी होऊन या. विश्वासानं पाठवतोय मी !'

आता गाडीत हलक्या आवाजात हे सर्व प्रकरण बापूला खुलासेवार समजावून देत काटेने म्हटले, 'धनी, ध्यानात ठेवा नीट. आता तुम्ही श्रीमंत बापूसाहेब इनामदार पाटील ! तुम्हालाही पुराणवस्तू जमवण्याचा, विकत घेण्याचा छंद फार, म्हणून म्यूझियम पाहायाला जाता आहात धनी तुम्ही तिथं'—

'असं का ? अन् तू कोण ? धनी, धनी काय लावलंय सारखं ?'

'मी तुमचा आश्रित अन् कारकून आहे. म्हणायला नको तुम्हाला मग 'धनी ?' मी तुमच्यासाठी त्या पुराणवस्तूंची माहिती, किमती वगैरे टिपणं करायला बरोबर येतो आहेना तुमच्या ? ध्यानात ठेवा मालक, नाहीतर चुकून माझ्या पाठीवर थाप देत म्हणाल— 'मित्रा ! गड्या न्याहरी भरपूर हवी आधी म्हणून !'

दोघेही मजेने हसू लागले.

सारंगपूर स्टेशन लहानच होते. बापू स्पष्टपणे म्हणाला—

'हे काय ? जहागीरदारांची गाडी नाही आली स्टेशनवर ? वा रे व्यवस्था !'

'अरे, मीच नको म्हटलं. बापू आधी आपण एखाद्या गरीब खानावळीतच उतरू. तिथं जायला कशाला गाडी ? हा बघ टांगा ठरवलाय

मी. टांगेवाले, चांगल्याशा खानावळीकडं घ्या टांगा. मात्र जवळपास मस्त पानाचं दुकान हवं. आपल्याला येता-जाता पान लागतं.'

'मग गोविंदभवनातच उतरा साहेब. समोरच पानपट्टीचं फार झक्कास दुकान आहे. अगदी बनारसी पान ताजं लावून मिळतं. बेस्ट आहे. खूप गर्दी असते तिथं—'

'छान, चल तर, त्या गोविंदभुवनाकडंच जाऊ दे टांगा.'

'गोविंदभुवन' गरिबांसाठी होते. अन्न घरगुती पण स्वादिष्ट होते. भपका नव्हता की, रेस्टॉरंटमधला पोऱ्यांचा ओरडाही नाही!

जाड कपबशीतून चहाचे घुटके घेत बापू रागाने म्हणाला—

'बातमीदार, जहागीरदारांच्या घरची ग्रेट मेजवानी मिळेल म्हणून, मनोरथ करीत आलो मी. पण इथं हा रद्दी चहा अन् भिकार चार बिस्किटं! ती मेजवानी नाहीच का मिळायची?'

'ते मनचे मांडे रात्रीपर्यंत मनातच खा, बापूसाहेब. रात्रीची मेजवानी त्यांच्याकडंच आहे ना. मग रुबाब आहे की नाही धनी?'

'अहारे पाटलांचा रुबाब! काही धड फराळालाही नाही. अरे, आपण कशासाठी या भिकार खानावळीत आलोय किशा?'

'बनारसी पानासाठी! ते घेऊन येतो मी, तोवर आराम कर तू अन् वाटलं तर बरोबर मी खूप खाद्य घेतलंय् तो डबा उघडून फराळ कर—'

तो गेला व बापूने खरेच फराळाचा कार्यक्रम सुरू केला.

अर्ध्या-पाऊण तासाने किसन परत आला. रागावून बापू म्हणाला,

'पानाला इतका वेळ? कुठाय बनारसी पान? तुझंही तोंड रंगलं नाही ते?'

'बाप्या, तुझ्या काहीच कसं ध्यानी येत नाहीरे? हे बघ, पानपट्टीचं दुकान, चावडी, देवळाचा पार— ही स्थळं म्हणजे लहान गावातल्या सर्व-सामान्य लोकांचं गप्पा मारायचं ठिकाणच असतं सार्वजनिक! आठवतं

तुला ? आपण करवंदीला पारावर बसूनच त्या पांढऱ्या भुताच्या अफव ऐकल्या होत्या. तसंच हे स्थळ. बनारसी पानं मी पाचसात ताजी लावून घेतली, त्या वेळात पूसतपास सहज केली मी, तर किती माहिती मिळाली. रागावतोस काय ? लहान गावात बहुधा लोकचर्चेचा विषय श्रीमंतांच्या घरचाच निघतो. तसंच झालं ! ही घे ऊनऊन जिलबी. तोवर मी ऐक-लेल्या माहितीच्या नोट्स घेतो. मला थोडी ठेव हां जिलबी. आता तर झालं ? '

तो भराभर नोट्स घेऊ लागला व तो कागद त्याने बापूला दिला. बापू आश्चर्याने वाचू लागला–

' गावात तीन मजली दोन अगदी सारख्या उंचीच्या, सारख्या रंगा-रूपाच्या इमारती आहेत– ' जोडबंगले ' नाव आहे त्यांना. एक सरंजामे जहागीरदारांची; दुसरी त्यांच्या धाकट्या भावाची. हा भाऊ हयात नाही. पण पुतण्या अमेरिकेतून नुकताच येऊन येथे राहू लागला आहे. काका-पुतण्याचं फारसं सख्य नाही. त्याच्या बंगल्यात सगळा अपटुडेट थाट तर सरंजाम्यांच्या बंगल्यात, जुन्या कलाकुसरीचं फर्निचर, गादी-तक्क्याची बैठक, असा विरोध आहे. इकडची माणसं तिकडं फिरकतही नाहीत कधी ! विळ्याभोपळ्या एवढं सख्य आहे. मोठ्या घरच्या गोष्टी. पैशापायी वितुष्ट आलं म्हणतात. '

काटेने विचारले– ' किती महत्त्वाची माहिती मिळवली की नाही ? '

' पण ही भारूडभरती आपल्याला कशाला हवी होती ? म्यूझियमची तरी माहिती घ्यायची. निदान ? त्याचं नावच नाही—'

' अरेरे ! श्रीमंतांना गरीब चाकराचा दृष्टीकोनच कळत नाही हे पाहून कष्ट होतात मनाला. बरं जाऊद्या. फराळाचा डबा पुरता रिकामा केला नसला तर मला काहीतरी दे बघू थोडंसं. परत थोडं बाहेर भटकून यावं म्हणतो. येणार का ? '

'आता कुठं ?'

'ते जोडबंगले पाहून येऊया. आपलं कार्यक्षेत्रच ते. तिथं राहिल्या-नंतर मग आपल्याला या चौकशा जमणं कठीण. त्या संशयास्पद ठरतील. खरं ना ?'

'तू म्हणशील ते खरं, पण खरं विचारशील तर फराळ जास्त झाला वाटतं. सुस्ती आली आहे. फिरायला कशाला आत्ताच ?'

'वा ! अन्नपचनाला फिरण्याचा व्यायामच उत्तम अन् आता आपण दोघं कॉलेजचे विद्यार्थी. सफरीला आलेलो, तेव्हा श्रीमंत पाटील नको तुला बनायला. चल कपडे कर. सुस्ती कसली ? दोन मैल फिरुन येऊ. ऊठ.' अन् मग आपला कॅमेरा खांद्यावर टाकून, त्याला घेऊन किसन बाहेर पडला. जोडबंगल्याला चार फेऱ्या घातल्या त्यांनी चौफेर. जरूर तेथे फोटो घेतले. बंगल्याची मागची बाजू दाट झाडीची होती, तीही निरखून पाहिली. काही विशेष गोष्टी ध्यानात ठेवून मग स्वाऱ्या परतल्या. रात्रीच्या जेवणाला मात्र सरंजाम्यांचे शाही भोजन बापूला मिळाले. झोपायला एक सुंदर दालन सजवलेले दिसले. तो राजेशाही थाट बघून बापू तृप्त झाला व सुखाने त्याने ती मखमलीची दुलई ओढून घेतली. किसनने मात्र आपल्या नोटबुकात नवी नोंद केली— 'फिरताना सहज ऐकू आलं · शेजारच्या बंगल्यातला माळी व त्याची मुलगी ही शुद्ध इंग्रजी-तच बोलत होती. हे कसं ? हे लोक ख्रिश्चन आहेतसं वाटतं !'

सकाळचा नाश्ता जहागीरदारांच्या घरी शोभेल असा म्हणजे पाच पदार्थांचा होता. तऱ्हेतऱ्हेची बिस्किटे, मस्त चहा, केक्स, उन्हून सांजा, व अनरसे—हे बघून बापू पाटील खूपच खूष झाले. किसनने हसत आपली योजना सरंजाम्यांना समजावून सांगितली. सरंजाम उद्गारले,

'ठीक, म्हणजे तुम्ही पाटलांचे आश्रित व पाटील बापूराव, माझ्या-कडं काही पुराणवस्तू हव्यात, त्याची चौकशी करायला आलेत, असंच

समजायचं ना ? आश्रित होऊन कोणतं काम, कसं कराल तुम्ही ?'

'खरं माझं काम फक्त निरीक्षणाचं. म्यूझियममध्ये कोण लोक येतात, जातात, आपसात काय बोलतात ते ऐकायचं, व कोठल्या वस्तूजवळ जास्त कोण, का रेंगाळतं हे बघायचं. हातात एक वही व पेन! मधूनमधून जिनसांबद्दलची टिपणं घेणार आहे. बरं, आपण म्यूझियम केव्हा दाखवाल ?'

'उद्या. आज सुटी असते.'

'वा! सुटी असेल तर फारच चांगलं. आपणाजवळ जोडकिल्ल्या असतीलच ? म्यूझियमची इमारत मला नीट हिंडून पाहायला हवी अण्णासाहेब एकदा.'

'जरुर! पण इमारतीत चोराला प्रवेश करायला तसं साधन आहेसं वाटत नाही. सगळ्या खिडक्यांना तारेच्या जाळ्या व गज आहेत व हॉलला तळमजल्यावर एकच पण मोठं प्रवेशद्वार आहे. त्यावर दोन सशस्त्र गुरखे पहारेकरी असतात. रात्रंदिवस.'

'छान– तर मी इमारत पाहतो नीट. आज दाखवण्याची व्यवस्था करावी आपण.'

'ठीक. माझी ही कन्या राधिका आपल्याबरोबर येईल. तिला सर्व वस्तूंची खडान्‌खडा माहिती आहे आणि हे पाहा, तुम्ही प्रथम भेटलात, त्यावेळी मोरावरच्या सरस्वतीचा उल्लेख केला होता ना मी ? तर मी पुण्याहून आलो तेवढ्या दोन–तीन दिवसांत ती छोटी मूर्तीही हरवली आहे म्यूझियममधून, काटे. सगळी कड्या-कुलपं शाबूत असून. खिडक्या–दारांच्या गजांना; जाळीलाही कुठं धक्का नाही लागलेला....मी अत्यंत चिंतेत आहे. बातमीदार, अशी सारखी गळती लागली तर माझा हा अमूल्य संग्रह पाहाता पाहाता नष्ट होईल.... ते मरणाहून मोठं दुःख आहे... काय बोलावं ?' ते स्तब्ध झाले. किसन हळुवार शब्दांत म्हणाला,

'आपण चिंता करू नका. मी शक्यतेवढे प्रयत्न करतोच–'

'ठीक. राधिका अकरा वाजता हे सारं म्यूझियम तुम्हाला दाखवील. तिलाही फार नाद आहे रहस्य शोधण्याचा; पण रहस्यच कुठं फारसं नाही सापडत तिच्याजोगं!' ते हसले. मग 'प्रभातफेरी' करायला ते दोघे मित्र बाहेर पडले. कोणतीतरी नवी वस्तू किसनच्या पिशवीत होती यावेळी. जोड बंगल्याच्या बाहेर उंच मेंदीचे कुंपण बागेला होते. आत नळाजवळ मध्यमवयीन माळी रोपे रुजवीत होता व एक तरुण मुलगी बोलतबोलत त्याला मदत करीत होती.

बापूला किसनने सांगितले–

'धनी! तुमचं काम हे की, त्या कुंपणाआड उभे राहा. तेथे त्या दोघांचं बोलणं ऐकू येतंय. ते इंग्रजीत आहे, धनी! ते नीट ऐकून घ्या व मग मला सांगा. मी बंगल्याच्या पिछाडीस जाऊन शोध घेऊन येतो– पंधरावीस मिनिटांत आलोच.'

'अन् कुणी विचारलं मला– इथं काय काम उभं राहाण्याचं तर?'

'तर द्या थाप ठोकून. म्हणावं, माझी मैत्रीण येथे भेटायला येणार आहे म्हणून थांबलो आहे मिस्टर! रस्ता सर्वांचाच असतो ना?'

दोघेही हसले व तासाभराने परतले.

राधिका खूपच स्मार्ट अन् बोलकी होती. तिने सर्व वस्तूंचे छापील पत्रकच त्याला दिले. त्यांत सगळ्यांची माहिती होती व काही छोटे फोटोही होते. ती म्हणाली,

'ती सरस्वतीची मयुरावर बसलेली मूर्ती होती ना, या छोट्या काचेच्या कपाटात? तिचा हा फोटो. मला ती फार फार आवडायची, पण बाबांनी मला हातही लावू दिला नाही तिला– अन् आता पाहा, तीच हरवलीय! हेच कपाट तिचं!' किसनने ते रिकामे काचेचे कपाट नीट तपासून पाहिले. काच तर शाबूत होतीच पण त्याने ते उघडताच

काच नुस्तीच फ्रेममधे सुटी अडकवलेली त्याला आढळली. चोरी करणारा भारीच हुशार व बुद्धिमान होता. मूर्तीची किंमत तेव्हा पाच हजार रुपयांपर्यंत होती व ती मौर्य वंशात पूजली जाणारी प्राचीन देवता होती! आता या मूर्तीला परदेशात दसपट किंमत येते हे किसन जाणून होता.

म्यूझियमचे तीन मजले होते. मधे मोकळी जागा व चारी बाजूंनी तिन्ही मजल्यांवर रुंद गॅलऱ्या होत्या. वरच्या मजल्यावर दारे नव्हती. तिन्ही मजले संपल्यावर मात्र एका कोपऱ्यात एक मळकट छोटे दार होते. त्याला बाहेरून कुलूप होते गंजलेले!

'हे कसलं दार ?' किसनने विचारले.

'ते होय ? त्यात विशेष काही नाही, काटे. तिन्ही मजल्यांवर मोठी व सुरेख गच्ची आहे. पण इकड पाऊस फार, म्हणून गच्चीवर आमचे बाबा ताडपत्र्या किंवा पत्रेबित्रे झाकण घालतात. गच्चीला भेगा पडून गळू नये म्हणून सामान एका लहान खोलीत आहे. बस्! वर्षावर्षात खरंतर आम्ही हे या खोलीचं दार उघडत नाही, पावसाळ्याखेरीज.'

'ठीक. ताईसाहेब, या कुलपाची किल्ली द्या. मी वर जाऊन एकदा पाहून येतो.'

'पाहाणारच ? बरं. ही घ्या किल्ली, पण मी नाही येत बाई! फार कचरा आहे त्या खोलीत. धूळ पण आहे. मी अन् पाटीलसाहेब खाली जाऊन थांबतो. चालेल ना ?' ते दोघे दुसऱ्या मजल्याकडे निघाले. मग तोच एकटा वर निघाला. कुलपाला हात लावतो, तर काय! ते नुसतेच अडकवलेले. लागलेले मुळी नव्हतेच! दार उघडून किसन गच्चीवर गेला तेथे त्याने अर्धा तास घालवला. खोलीतल्या काही छोट्या वस्तू गोळा केल्या त्या घाणेरड्या जागी पडलेल्या. तो परतला तेव्हा त्याची मुद्रा खूपच प्रसन्न दिसत होती.

बापूने ओळखले, शोधाचे काही सूत्र नक्की किसनच्या हाती लागलेले

दिसते अन् खांद्यावरची वस्तूही आता पिशवीत दिसत नव्हती.

पुढचे दोन दिवस सायंकाळपर्यंत एका बावळट, गरीब विद्यार्थ्याचा वेष घेऊन तो म्यूझियम पाहात टिपणे घेत बसला होता– एक उत्तम कारकून दिसत होता काटे यावेळी. मधेमधे गाईडशी बोलत होता. ह्या खास वस्तूंची माहिती देण्यासाठी अण्णासाहेबांनी नेमलेला त्यांचा एक वृद्ध व इमानी सेवक होता. त्याच्याजवळ 'बनारसी पान' काटेने जमवले व मोकळ्या वेळात गप्पा सुरू केल्या. येणारे–जाणारे लोकही तो बारीक नजरेने पाहात होता. त्याने मधेच विचारले–

'युरोपियन लोकही इथं येतात वाटतं? ते कोण साहेब? केव्हाचे मूर्ती, नाणी बघताहेत? कालही दिसले मला.हे–'

'ते साहेबांच्या शेजारच्या जोडबंगल्यातले कुणी पाव्हणे आहेत. त्यांना ह्या वस्तूंचा फार नाद आहे. रोज येथे खेप आहे त्यांची! पलिकडच्या बंगल्यात अमेरिकन–युरोपियन पाव्हणेच असतात सदा. पोरा, धन्याचा पुतण्या तिकडं जाऊन आलाय ना? अरे, त्यांना नोकरही आपले देशी चालत न्हाईत! लई रुबाब त्येंचा.'

ते गृहस्थ दर वस्तूशी उभे राहात होते. ही संधी साधून चटकन छोट्या कॅमेऱ्याने त्याने त्यांचा फोटो घेतला, ते त्यावेळी गर्दीमुळे कुणाच्याच ध्यानी आले नाही.

दुसऱ्या दिवशी उजाडताच बापूला घेऊन तो गावात गेला व टॅक्सी-स्टँडवरून टॅक्सी करून निघाला. यावेळी दोघेही उत्तम सूटमधे होते.

'आपण कुठं जातो आहोत व का?'

बापूने विचारले तशी गंभीरपणे तो म्हणाला–

'पलिकडच्या बंगल्याची आतून पाहणी करायला कॉंट्रॅक्टर्स म्हणून जातो आहोत. थेट गच्चीपर्यंत पाहणी करणं, मोजमाप घेणं वगैरे करू. धनी, तुम्हालाच बहीणभावांसाठी जोडबंगले बांधून द्यायचेत असले!'

'अन् तो अण्णासाहेबांशी वाकडं असलेला त्यांचा पुतण्या, पाहू देईल बंगला तुला म्हणतोस?'

'अरे, पण ते कोणी नाहीत आज घरी. जॉली ट्रिपला गेलीत मंडळी! गाईड रामजीनं सांगितलं. त्याचा भाऊच तेथे व्यवस्थापक आहे. चला धनी.' त्यांचे पाहणीचे काम छान जमले. तेथले काही फोटोही त्याने पाहिले. मग थेट तिसऱ्या मजल्यापर्यंत त्याने कॉन्ट्रॅक्टर या नात्याने पाहणी केली. लखुभाऊशी गच्चीवरच्या फुलझाडांबाबत बोलत बापूने त्याला गच्चीच्या दुसऱ्या टोकाला नेले व फुलझाडे पाहिली. तोवर किसनने थेट येथल्याही 'पावसाळी' खोलीत जाऊन काहीसे परत आणले व तो साळसूद चेहरा करून पलिकडच्या गच्चीकडे बघत राहिला. फार-तर सहा फूट अंतर असेल दोन्ही गच्च्यांच्या कठड्यात!

परत येताना किसन म्हणाला, 'उद्या रात्रीचं रिझर्वेशन केलंय धनी मी आपलं पूना मेलचं!'

'म्हणजे? शोधाचं काम?'

'ते जवळजवळ पुरं झालंय धनी!'

खुषीनं हसत किसनने उत्तर दिले.

ते या छोट्या ट्रिपवरून घरी आले तर अण्णासाहेब अत्यंत चिंताग्रस्त मन:स्थितीत होते. ते म्हणाले–

'काटे, मला वाटतं....आता थांबण्यात काही राम नाही. पोलीस-इन्स्पेक्टरांची भेट घेऊन सारी केस त्यांच्या हाती द्यावी. कसं?'

'मी तेच म्हणणार होतो आता. आपण आताच जाऊया तिकडं! पण नव्यानं आपण चिंताग्रस्त का बरं झालाहात?'

'मी विकत घेतलेल्या समुद्रगुप्तकालीन दहा नाण्यांपैकी काल रात्री सात नाणी नाहीशी झालीयत! शिवाय कालीची एक बोटभर उंचीची ताम्रप्रतिमा–शिवाप्रमाणं तिला तिसरा डोळा, गळ्यात नाग आहेत अशी–

नाहीशी झालीय. आता हे नुकसान फार होतंय्! बरं, कुठलंही कुलूप फुटलेलं नाही की काचा फोडलेल्या नाहीत! पैशाचं नुकसान मी सहन करीन एक वेळ, पण या अमोल वस्तू जीवापलीकडं प्रिय होत्या मला, त्या गेल्या. नाणीतर फार दुर्मिळ मोलाची होती, नुकतीच मिळवलेली मी—'

'मला वाटतं, तुमची काही नाणी मला शोधता आली आहेत. हीच का ती? पाहा!'

एक कळकट पुरचुंडी किसनने त्यासमोर उघडून ठेवली. रुमालावर नाव विणले होते–

'जेनी'. पुरचुंडीत जुनी नाणी होती.

ताडकन उठून अण्णासाहेब म्हणाले–

'होय! हीच ती, हीच ती! कुठं मिळाली?'

'तुमच्या गच्चीवरच्या खोलीत, पत्र्यांच्या खाली. कचरापेटीत होती तळाशी अन् हा पुरावा. टेप ऐका ही जरा. बस्! आणि मग आपण इन्स्पेक्टरांकडं जाऊ. पुढचं काम त्यांचंच!'

आणि केवढे आश्चर्य! दुसऱ्या दिवशी माळी जॉन, त्याची मुलगी जेनी आणि म्यूझियम रोज बघणारे जेम्स पीअर्सन साहेब, यांना अटक झाली. पीअर्सनचा मुक्काम पंचतारांकित हॉटेल राजभवन येथे होता. त्यांच्या समोरच त्यांच्या रूमची पोलिसांनी झडती घेऊन तपासणी केली. त्यात चोरीस गेलेल्या सर्व मूर्तींचे व पोथ्यांचे एक पार्सल अर्धवट बांधून तयार झालेले सापडले. जेनीने सर्व कबूल केले होते. किसनला पाहून पोलीस इन्स्पेक्टर राजे म्हणाले,

'वा! काटे, तुम्ही? करवंदीच्या केसच्याच वेळी मी तुम्हांला आमच्या खात्यात या म्हटलं होतं! पण तुम्ही स्वतंत्र डिटेक्टिव एजन्सी सुरू केली वाटतं?'

'नाही साहेब. एजन्सी कुठली काढतो? मी 'आज'चा बातमीदारच आहे, आजही!' त्याने उत्तर दिले.

इन्स्पेक्टर खुषीने म्हणाले–

'आणि आमच्या हातच्या केसेस आधीच हाती घेऊन सोडवताहा बातमीदार असून? छान, आतातरी सरळ आपले माझ्या खात्यात या, काटे. तुमची खरी जागा तीच आहे–'

'नाही साहेब. मी हाडाचा लेखक आहे. शोध घेतो ते गोष्टी लिहिण्या-साठी. पण आपण केव्हाही आपला समजून हाक मारा. मी येऊन सेवा करीन. मला गुन्हे शोधण्यातही आनंद वाटतोच–'

अण्णासाहेब म्हणाले–'आता आम्हालाही तुम्ही तीन दिवसांत शोध केव्हा व कसकसा लावला, त्याची थोडी माहिती ऐकवा ना काटे!'

किसन म्हणाला–'खरं म्हणजे अगदी शेजारी दोन–तीन हात अंतरा-वर गच्च्या चिकटल्यासारखे बंगले पाहून मला संशय आला. मग तुमच्या गच्चीचं दार मला आढळलं ते नुसतं लोटलेलंच. मी गच्चीवर रूममधे गेलो तर तेथे दारूची अर्धी बाटली व दोन ग्लास, पावाचे तुकडे, सिगरे-टची थोटकं व एक सुकलेली फुलांची वेणी इतकं सामान सापडलं–आणि तुमचा विश्वास बसणार नाही– पण ताडपत्री ठेवायच्या लांबरुंद पेटीत एक कांबळंही अंथरलेलं. तेथेच सुकलेली वेणी व ओल्या मातीचे कण. त्यातच गुलाबाची कातलेली पानं चिकटलेली मिळाली. जेनी माळीण फार भडक अत्तर लावते. शेजारच्या बंगल्यात आम्ही शिरल्याबरोबर हा वास मला आला होता, तोच तेथे उशीला! जेनी तरुण व सुरेख मुलगी आहे. ती तेथे झोपायला येते हे मी ओळखलं. सिगारेटची थोटकं एकदम उंची जातीची व दारूची बाटलीही तशीच. तेव्हा जेम्ससाहेबांच्या वस्तीची कल्पना आली. तेथे मी आधीच कोपऱ्यात टेपरेकॉर्डर लावून ठेवला होता, ताईसाहेबांनी म्यूझियम दाखवलं तेव्हा! आज पहाटे तो आणायला मी

वरच्या खोलीत गेलो तर जेनी धावत पलीकडच्या गच्चीत गेली घाईनं! जाताना रात्री चोरलेली नाण्याची पुरचुंडी घाईमध्ये तिनं केराच्या ड्रममधे खुपसली. ती मी शोधून काढली.'

'वा, शाब्बास! मग पुढं?' राजांनी विचारले.

'पुढं काय? काँट्रॅक्टरचा वेष घेऊन मी शेजारच्या बंगल्यात गच्चीपर्यंत गेलो– तर दोरीची शिडी तेथल्या खोलीत!–'

'काय? आमच्या अनंतानं तुम्हाला बंगला तपासू दिला? तो तर इकडचं पाखरूही तिकडं फिरकू देत नाही, हाकलून लावतो. मला त्याचाच तर या चोरीच्या पायांत संशय येत होता आधी इन्स्पेक्टर, म्हणून तर केस मी तुमच्याकडं सोपवली नाही, घराण्याची बेअब्रू होते म्हणून—'

'ठीक! पण अण्णासाहेब, तो संशय मनातून काढून टाका. जेम्स पीअर्सन फक्त त्यांच्या ओळखीनं इथं शेजारी यायचा एवढंच. त्यांचा संबंध नाही यात काही; माळी व जेनी गोव्यातून जेम्सनंच आणलेले लोक होते.'

अण्णासाहेबांनी सुटकेचा निश्वास टाकला व म्हटले,

'आं? ही सारी माहिती कुठं, कशी मिळाली? अनंतानंच सांगितली?'

'नाही, ते आज वैकुंठलेणी पाहायला सगळ्यांना व जेम्स पीअर्सनलाही घेऊन गेले. हा शोध तुमच्या रामजीकडून लागला होता मला. तेथे व्यवस्थापक आहे रामजीचाच भाऊ. त्यांच्या बोलण्यातून मला पीअर्सननं आज रात्री बाराच्या अमेरिकेच्या विमानाचं तिकिट रिझर्व केल्याचंही समजलं तेव्हा घाई केली मी–'

'बस् बस्, आता सगळं ध्यानी आलं. टेपवर जेनी अन् जेम्सचा संवाद मी ऐकलाय. त्यातही मूर्ती पॅक करण्याचा व भारी नाणी विकल्याचा उल्लेख आलाच आहे पण तुमची कमाल आहे. नमस्कार जहागीरदार, मी

तिन्ही कैद्यांना पोलीस–कस्टडीत घेऊन चाललो आहे. तुमचा चोरीस गेलेला सर्व माल तुम्हाला लवकरच देण्यात येईल. अन् काटे, धन्यवाद ! एखादी फार गुंतागुंतीची केस असेल, तर हाक देईन हं कधीकधी तुम्हाला. माझा विश्वासू गुप्तचर म्हणून तेव्हा अवश्य या ! '

इन्स्पेक्टर जाताच आवेगाने अण्णासाहेबांनी काटेला जवळ घेऊन शाबासकी देत सद्गद कंठाने म्हटले—

' काटे, तुमची कामगिरी इतकी मोलाची व इतक्या लौकर तुम्ही हा शोध लावलात की, तुम्हाला बक्षीस काय द्यावं तेच समजेनासं झालं आहे—'

' छे छे ! यात बक्षीस कशाला अण्णासाहेब ? मी तुमच्या मुलासारखाच तर आहे. कृपादृष्टी राहू द्या, बस् ! ' काटे नम्रतेने पुटपुटला; पण जहागीरदारांचा बेत निराळा होता. ते म्हणाले–

' मी एक वेगळीच देणगी देतो छोटीशी ! पुण्याला माझ्या मालकीचं एक छोटंसं दुमजली घर आहे. तूर्त रिकामंच आहे ते. भोवती बाग आहे थोडीशी. ते तुम्हाला आवडेल. हे घराचं कायदेशीर बक्षीसपत्र. अन् पाटीलसाहेब, तुम्हाला हे नवं रिस्टवॉच माझी आठवण म्हणून देतो. '

' अन् मी दोघांकडूनही भाऊबीज घ्यायला दिवाळीत तुमच्या घरी येणार बरं का किसनदादा, ध्यानात ठेवा ! अन् मला शिकवा, गुप्तचर होण्याचं कसब थोडंथोडं ! ' राधिका म्हणाली. त्या दोघांचाही निरोप घेऊन घाईने बापू–किसनने मेल गाठली.

दुसऱ्या दिवशी देशमुख साहेबांच्या ऑफिसच्या दाराशी तो आला, तो साहेब फोनवरून बोलत होते, ते शब्द त्याने ऐकले–

' काय ? आमच्या बातमीदारानं सगळा चोरीचा माल सापडून दिला तीन दिवसांत ? अरेच्या ! तो तसाच आहे गुणी, सरंजामे. अच्छा बाय् !'

मग त्याला पाहाताच देशमुख हर्षाने म्हणाले–

‘या ‘घरंदाज’ काटे! कॉंग्रॅच्युलेशन्स गुप्तचर किसन! पण आता ‘आज’लाही बातमी देण्याचं बघा पाहू. सर्वात आधी ‘आज’मध्ये ताजी बातमी आली पाहिजे प्रत्येक! काय हेडिंग देणार आहा?’

‘आजकडं आधीच बातमी देऊन वर आलोय. दिवाळी अंकाची कथा गाडीत सुरू केलीय अन् हेडिंग आहे बातमीचं –‘म्यूझियममधील चोरीचं रहस्य’. ठीक आहे ना साहेब?–’

‘उत्तम. वास्तुशांतीला बोलवा मला, काटे!’ देशमुखांनी हास्यमुखाने म्हटले व धन्यतेने हसत गुप्तचर बातमीदार काटे दिवाळी कथेची जुळवा-जुळव मनात करीतच तेथून बाहेर पडला. आठवत होते, ते त्याचा पिता तुकाराम याचे आनंदाश्रू व सद्‌गद शब्द—

‘किशा, पोरा! जन्मभर मला एखादं खोपटंसुद्धा बांधता आलं नव्हतं. अन् तू बुद्धीच्या जोरावर एवढं टुमदार बांधलेलं सुंदर घर मिळ-वलंस! शाबास बेटा, असाच तुझा उत्कर्ष होऊदे!’ तो वडिलांचा आशीर्वाद…त्याचे मोल कशाने होऊ शकेल?

म. ग्रं. सं. ठाणें, बालमालय शाखा.
बाल वाङ्मय विभाग.
बा. क्र. 96230 दिनांक 27/5/57
विषय ............ क्र. ............

४


# बातमीदाराची बहादुरी

'आज' या सुप्रसिद्ध दैनिकाच्या ऑफिसात किसन घाईघाईने शिरला. देशमुख मॅनेजरांना नवी गोष्ट दाखवायला तो घेऊन आला होता. त्याच्या ओठावर हसू खेळत होते. एकतर, त्याच्या सत्यकथेवर आधारलेल्या गुन्ह्याच्या सनसनाटी कथा, हे 'आज'च्या साप्ताहिक रविवार अंकाचे खास आकर्षण झाले होते व दुसरे, 'त्या कथा अतिशय सुंदर लिहिल्या गेल्या असून फार आवडल्या!' अशा आशयाची वाचकांची पत्रेही त्याला मॅनेजरांच्या पत्त्यावर येत होती. तरुण, नवोदित कथालेखकाला ह्याहून मोठा आनंद तो कोणता? त्याने ऑफिसचे झुलते दार आवाज न होऊ देता हलकेच उघडले. आणि पाहतो तो काय? देशमुख-साहेब उदासवाणे बसलेले! समोर टपालाचा ढीग, पण ते हातातल्या एका कागदाकडेच टक लावून पाहाताहेत, व त्यांचे डोळेही ओलसर! म्हणजे? हे काय आणखी? देशमुखांसारख्या निग्रही व खंबीर माणसाचे डोळे सहसा भरून आलेले कोणी पाहिलेले नव्हते. निदान त्याला तर कधीच ते उदासवाणे बसलेले आठवत नव्हते अन् आज हे काय?

त्याने हलकेच गंभीरपणे म्हटले—

'सर! कसलं, कोणाचं पत्र आहे ते? आपल्याला मानसिक त्रास देणारी काही प्रायव्हेट बाबत–?'

देशमुखांनी वर पाहिले. त्यांचा चेहरा थोडा टवटवीत झाला. ते



'हां, आता सोनू कोळयाच्या घरी जाऊ या.'

उद्गारले– 'काटे, तुम्ही? बसा, खरोखर यावेळी काही मदत होऊ शकेल, तर ती तुमच्यासारख्यांकडूनच! पाहा हे कात्रण–'

ते वर्तमानपत्राचे कात्रण कोणीतरी पत्रातून देशमुखांना पाठवले होते– अधोरेखीत करून. त्याचे डोळे झर्रकन् त्या मजकुरावरून फिरले.

'इकडचा राजपुरी हा गाव, कोकणातल्या एका खाडीच्या काठी वसलेला आहे. तेथे समुद्रातून वाहत आलेला एक मृत तरुण सापडला. चेहरा अर्थातच ओळखू येत नव्हता, पण पांढरा कोट व निळी चेकची पँट होती. खिशात चामड्याचं एक झिपूचं पाकिट होतं. त्यात पाणी

शिरलेलं नव्हतं. त्यात ‘सुभाष देशमुख’ नाव असलेला छोटा फोटो व पत्ता मिळाला. आपल्या घरी मी मागं आलो होतो, तेव्हा आठवतं, तेथे सुभाष नावाचा एक तरतरीत तरुण मी पाहिला होता. हा फोटो त्याचा असावासं वाटलं. कदाचित हा दुसरा कोणी सुभाष असेल ! तसेच असेल तर देवाची कृपा ! फोटो पोलिसांच्या ताब्यात आहे. बातमी अजून प्रसिद्धीला दिलेली नाही. तथापि, आपणास तावडतोब कळवणं मला आवश्यक वाटलं. असो. तुम्ही इकडं समक्ष याल तर योग्य. मी वाट पाहतो. अधिक सर्व समक्षच. तुमचा वर्गबंधू—गोपाळ काळे.’

देशमुखसाहेब सांगू लागले—

‘वाचलत ? माझा पुतण्या सुभाष, मोठ्या बंधूंचा एकुलता एक मुलगा. त्याचे वडील सध्या आफ्रिकेत आहेत व आता लौकरच येतील. काय करावं ? काही सुचत नाही– !’

‘मला वाटतं, आपण समक्ष जाऊन यावं हेच योग्य–’

‘ते तर मलाही दिसतं आहे, काटे ! पण मला इथून हलणं मुष्कील आहे. त्याची आई, तिचं एक फार मोठं कठीण ऑपरेशन आज सायंकाळी होणार आहे व आमच्या घरी दुसरं मोठं माणूस यावेळी कोणी नाही. वहिनींच्याही जिवावरचाच हा प्रसंग आहे. दादा दूर आहेत. मी या प्रसंगी त्यांना सोडून बाहेरगावी जावं तरी कसं ?’ त्यांनी कपाळाला हात लावला व वेदनेने ओठ घट्ट आवळले.

किसनच्या मनातला उल्हासही मनातच घट्ट आवळला गेला. तो उद्‌गारला–

‘मी कोणत्या तऱ्हेनं मदत करावी हे समजलं तर बरं, सर.’

‘हां, तुम्हीच ते करू शकाल, असं वाटतं आहे पत्र वाचल्यापासून. तुम्ही या सुभाषचा शोध राजपुरीला जाऊन समक्ष घेऊन या, व मला फोन करा. डॉक्टरांची परवानगी मिळाली तर मीही तेथे येतो. ऑपरेशन

झाल्यानंतर दोन दिवसांत पेशंटची परिस्थिती कशी आहे ते पाहून निघतोच मी. ठीक तब्बेत असेल तरच, अर्थात. डॉक्टर म्हणालेत की ' दुखणं वाढलेलं आहे, मी शक्यतेवढे प्रयत्न करतो, त्यातून देवाची मर्जी–' म्हणून आधीच आम्ही मनात घाबरलेलो. त्यात हे संकट–'

त्याने एकदम निश्चयी स्वरात म्हटले–

' ऑल राईट, सर! मी जाईन. बस केव्हा निघते तेथली?'

' एक वाजता. अजून तीन तास आहेत. थांबा, खर्चाला हे पैसे. आणि तुमची कॅज्युअल लीव्ह मी नोंदवून घेतो. गोपू काळेचा पत्ताही देतो. त्याला भेटा व पूर्ण शोध घेऊन या ही दुष्ट वार्ता खरी की खोटी त्याचा. याल ना काटे?'

'अवश्य सर. मला जमेल ते सारं करीन. आपण एवढा विश्वास माझ्यावर ठेवता, त्यासाठी मी झटेन. अगदी जीवप्राणानं. प्रॉमिस! पण आधी मला काही बाबतींची माहिती हवी–'

' कोणकोणत्या?'

' सुभाषरावांचं वय काय होतं? नोकरी करीत होते की अजून शिकत होते? ती नोकरी कुठं? तिकडं ते कुठं व कशासाठी गेले होते? खासगी काम होतं की सरकारी? त्यांची उंची किती होती? काही देहखूण–म्हणजे तुळशीपत्र, अंगावरचं व्हासं, लहानपणच्या जखमेची एखादी खूण असंही मला माहीत हवं. जाऊन किती दिवस झाले होते त्यांना? तेथून त्यांचं एखादं पत्रबित्र आलं होतं का? कधी? तेही पाहावयास हवं सर. त्यांना–म्हणजे कदाचित त्यांचाच तो देह असेल तर त्याला मी कसं ओळखावं? यासाठी जन्मखूण हवी. एक्स्क्यूज मी, सर....पण ही माहिती मला लौकर हवी.'

त्याच्याकडे नवलाने ते पाहात राहिले. इतके सारे या अननुभवी मुलाच्या डोक्यात येते तरी कसे याचे नवल करीत ते म्हणाले, ' थँक्स

काटे, बरं सुचवलंत. बसा. ही सगळी नोंद करून देतो, आत्ता. मुख्य सांगायचं म्हणजे त्याचं काम हे होतं–ध्यानात घ्या, गुप्त होतं काम फार.' त्यांनी एका कागदाच्या चिटोऱ्यावर काही लिहिले व त्याच्याकडे तो कागद सरकवला. ते शब्द वाचून किसन चांगलाच चमकला. पण त्याने ते 'काम' पक्के ध्यानात ठेवले व त्या कागदाचे बारीक तुकडे तुकडे करून साहेबांनी टोपलीत फेकले व त्याच्याकडे खर्चासाठी भरपूर पैसे देऊन ठेवले; त्यापूर्वी त्याच्या प्रश्नांची उत्तरेही दिली.

थोड्या वेळाने काटे तेथून निघाला. तशी देशमुखसाहेब आपुलकीने म्हणाले, 'तुम्हीही जपा स्वतःला, काटे. बातमीदारांनी तही ध्यान ठेवूनच धोक्याच्या जागी जावं नेहमी. तुमच्यावर ही जोखीम मी नाइलाजानं टाकतो आहे.'

'ओ नो सर! माझा पिंडच असा आहे, की अशी शोधांची कामं मला अगत्यानं करावीशी वाटतात. मी माझ्याकडून पराकाष्ठा करीन. शोध करीन सारा.'

'बघा, जमेल तेवढं करून या. मला ट्रंक लावा घरी, सकाळी सहाच्या पुढं व प्रत्यक्ष उल्लेख कोणाचयाही नावाचा नको. ट्रंककॉल, इंग्रजी भाषेत. सकाळनंतर ट्रंक करायचा झाला तर ऑफिसात– जमेल ना?'

'सगळ जमेल. आपण माझी चिंता करू नये. अन् आशा आहे की, या शोधातून काही बरीशी वार्ता मी देऊ शकेन. अच्छा बाय्!'

तो परत घरी आला. तयार कथा खिशातून तशीच परत आणून त्याने बिछान्याकडे न पाहताच फेकली. तोवर बिछान्यातून शब्द आले–

'आँ! आज ही काय लहर आलीया मैत्राला कागद फेकून मारण्याची? लईऽऽ ब्येस! असं अगत्य करतात व्हय आपल्या मैत्राचं?'

'अरे, गोपू? तू कसा न बोलावता बोलावल्यासारखा आलास? फार छान, अगदी उत्तमच झालं! चल, भाकरतुकडा खाऊन घेऊ. आपल्याला

राजपुरीला आत्ता एकच्या बसनं निघायचं आहे.'

'अरे पण का? आल्या आल्या मित्राला हाकलून दुसरीकडं न्यायचं, हे रे काय तुझं? म्हटलं, उद्या जरा सुट्टी आहे. पिक्चर पाहू, मजा करू. तर आपलं–'

'अरे, कुठं ट्रिपला जायचं, हीही मजेदार गोष्ट नव्हे का? चल, खिचडी टाकतो आधी. पोचायला उशीर होईल. कोकणातलं गाव आहे.'

आतून तुकारामाचा शब्द आला–

'बेटा, मी टाकली आहे खिचडी गोपू आल्याबरोबर. दहा मिनिटांत थाळ्या वाढतो. ह्यानं गुळाच्या पोळ्या आणल्या आहेत, आईनं करून दिलेल्या त्या आहेतच.'

'फार छान. चल!'

'चल काय अन् छान काय? मी शेतातून काम करताकरताच निघून आलोय् तसाच. हे मळकट धोतर, ही कोपरी, ह्या कोल्हापुरी जुनगट वहाणा! असाच येऊ का? तुझे बेत सारे ऐत्या वेळचे. काही दुसऱ्याची सोयगैरसोय पाहायची रीत आहे की नाही, काटेसाब?'

'आहे तर? हे बघ, तुझ्यासाठी मी माझेच जरा ढिले होणारे कपडे घेतो आहे. तुला किंचित् टाइट होतील पण चालेल. अरे, वेळ घालवण्या-सारखी ही कामगिरी नाही. लौकर पोचू तेवढे बरेच. बाबा, आमच्या-बरोबर खाद्याचा टिफीन भरून देण्यासाठी समोरच्या मिठाईच्या दुकानातून काही गोड खाद्य आणा–वड्या, लाडू वगैरे. म्हणजे बापूचा राग जाईल बरंका.' तुका हसला व टिफीन भरायच्या तयारीस लागलाच.

राजपुरी हे कोकण-कोल्हापूर बस रस्त्यावरचे कोकणातले एक गाव. येथे समुद्राच्या खाडीचा एक फाटा आला असल्याने राजपुरी छोटे बंदर बनले होते. तेथे बस अगदी दिवेलागणीला पोहोचली. पावसाची रिपरिप या श्रावणात असायचीच. कोकणात तर यावेळी तुफान पाऊस. त्यामुळे

येथे रस्त्यात कोणी दिसत नव्हते. जणू सायंकाळीच राजपुरी कांबळे पांघरून झोपी गेल्यासारखी शांत होती. पण शोध घेत ते अन्नपूर्णा भोजनालयाजवळ आले, तशी बापू म्हणाला—

'हेच का त्या गोपाळराव काळ्यांचं घर?'

'नाही! ज्या खाणावळीतून सुभाषचं पत्र आलं होतं, तिथंच उतरून तपासाला प्रारंभ करायचा असं ठरवलं आहे. खानावळ आहे ही.'

'म्हणजे तो येथूनच नाहीसा झाला की काय? तसेच आपणही कदाचित् स्वर्गालाच—'

'हं हं, शोध करताना हा भित्रेपणा काय कामाचा, राजे? हा सेवक आहे उभा, आपलं रक्षण करायला. चला आत.'

नम्रपणे किसन म्हणाला,

'मॅनेजर, आम्ही विद्यार्थी रत्नागिरीला चाललो आहोत, पण बस आत्ता पंक्चर झालीय्. उद्याच जाऊ. एक रात्र राहायला जागा हवी अन् आत्ता जेवण.'

मॅनेजर मवाळ चर्येचे, पण धूर्त गृहस्थ दिसले. ते उद्गारले—

'माफ करा. दुसरीकडं जा. आम्ही आता राहायला जागा देत नाही.'

'आता नाही, म्हणजे पूर्वी देत होता ना? बसमधे 'राजपुरी समाचार' पत्र घेतलं, त्यात तर तुमच्या लॉजिंगबोर्डिंगची जाहिरात होती, म्हणून तर आलो आम्ही—'

'ती जुनी गोष्ट. या एक तारखेपासून फक्त जेवणाची खानावळ आहे ही. आता वरच्या सगळ्या खोल्या मालकांनी आपल्याकडं घेतल्या आहेत तेव्हा जागा नाही. चालू लागा कसे! सूनर द बेटर!'

'अहो, आम्ही या अनोळखी गावात कुठं जावं रात्रीचं? किती दमलोत आम्ही. दया करा मॅनेजर! वाटल्यास डबल चार्ज घ्या.'

मग मॅनेजर हर्षाने म्हणाले, 'डबल चार्ज देता? छान. पण खोली

माडीवर मागच्या बाजूची अन् मोडकीशी तेवढी आहे शिल्लक! चालेल म्हणता? ठीक, ठीक. अग ए पोरी, मागल्या धाकट्या माडीत दोन बिछाने दे घालून या पोरट्यांना, अन् जेवायला दोन पोरं आहेत म्हणावं गंगाबाईला. जा रे पोरांनो वर!'

चहा सांगायला मॅनेजर आत गेले तशी चटकन् टेबलावरची मेंगचटलेली जुनी वही किसनने उघडून पाहिली. पाच दिवसांपूर्वीच्या पाहुण्याची शेवटची सही होती. ती खाडाखोड करून टाकलेली, पण त्यातूनही काही अक्षरे स्पष्ट झालेली किसनला दिसली....सु...ष...श... ख. खास सुभाष देशमुख! त्याने वही चटकन मिटली व बावळट चेहरा करून उभा राहिला...

पूर्वी ती खोली खरेच अडगळ ठेवण्याची असावी अशी पडकी होतीच. एका तरतरीत तरुण मुलीने चहाचा ट्रे आणला व 'नीट राहा पावणं' एवढे बोलून ती नाहीशी झाली. किसनने कपबशी उचलली, तर त्याखाली एक कागदाची व्यवस्थित घडी केलेली चिठ्ठी, अन् ती इंग्रजीत! ती तो वाचणार, तेवढ्यात मॅनेजरची धप् धप् पावले वाजली, तशी त्याने चिठ्ठी गादीखाली सरकवली. मॅनेजर म्हणाले,

'मुलांनो, सॉरी. इथं फारशी व्यवस्थित खोली तुम्हांला देता आली नाही मला, पण तुमची गरज ओळखून मी ही एवढी तरी सोय केली तर सांगायचं असं की, उद्या पहाटे पाचला चहा मिळेल तुम्हांला तो घेऊन उजाडण्यापूर्वीच तुम्ही चालू लागा इथून. मालक उशिरा उठतात त्यापूर्वीच तुम्ही येथून–'

'पळ काढावा असंच ना? डबल पैसे घेतलेत तरी हेच का?' रागाने बापू उद्गारला. मॅनेजर चालते झाले. तशी किसनने चिठ्ठी उघडली. मजकूर इंग्रजीत होता–

'या धोक्याच्या ठिकाणी कशाला आला आहात? उद्याच्या उद्या

दुसरी जागा पाहणं हिताचं. रात्रीही सावधच राहावं. कॉफी तर मुळीच घेऊ नका. संकट डोक्यावर तरंगतं आहे. सावध! मी उद्या खाडीवर भेटेन. चिठ्ठी फाडून टाका.'

'अक्षर बायकी, खात्रीनं त्या मुलीनंच चिठ्ठी लिहिलेली आहे.' किसन पुटपुटला.

रात्री त्या उन्हून कॉफीचा वास तर फार स्वादिष्ट येत होता. बापूला मोह होत होता, पण किसनने दोन्ही पेले बापूच्या हातून ओढून घेऊन बशीमधे ओतून दिले, व दिवे मालवून, कांबळी डोक्यावर ओढून घेऊन झोपल्यासारखे ते स्वस्थ पडून राहिले. मॅनेजर जरा वेळाने येऊन पाहून गेले. हळू हाका मारूनही पाहिल्या त्यांनी, पण कुणीच ओ दिली नाही.

ते जाताच किसन हळूच उठला. बॅटरी हलकेच लावून पुढच्या सर्व माड्या पाहून आला. व्हरांड्यात एक कपड्यांचे जुने उंच कपाट होते. त्या आड अंग चोरून तो एका अंधाऱ्या कोनाड्यात बसून राहिला. मालकांच्या खोलीत परीटघडीचे अंथरूण होते. टेबलावर मद्याची बाटली व ग्लास होता. नक्की ही मालकाचीच खोली!

मध्यरात्र झाली व दणादण पावले वाजवीत कोणी वर आले. मालकाच्या खोलीतून मोठ्याने आवाज आला—

'धोंडोपंत! इकडं या. हजेरीबुकात 'रामू व लखू ढमाले' नोंद दिसली? कोण हे रामू-लखू? काय म्हणून जागा दिलीत? नको म्हणून बजावलं होतं का नाही? तरी धटिंगण घेतले—'

'हां साहेब, हळू! धटिंगण कुठले? दोन शाळकरी पोरं, कृष्णजन्मोत्सवाची सुट्टी मिळाली म्हणून कोकणात गावी जाऊन येताहेत. अगदीच सीधी पोरं. मला कीव आली बापड्यांची!'

'कीव आली? असं का? तुमची ही कीवच एक दिवस माझ्या गळ्याला फास लावील, फास! तो पोलीसचा माणूस. तो तरणाबांड

पोऱ्या. त्याचीही कीव येऊनच जागा दिलीत तुम्ही, नाही का?'

'ऑं! पोलीसचा माणूस? कोण? तो सुभा–'

'हां चूप! कोणाचं नाव घ्याल तर गळाच दावीन तुमचा. अन् देईन खाडीजवळच्या झाडीत फेकून त्या सुभाष्याप्रमाणं.'

'घ्या! आता कोण नावं घेतंय मोठ्यानं? हॅ हॅ हॅ! पण घ्या खुशाल! ती पोरटी पडलीत घोरत.'

'वा! वा! आपली जायफळवाली 'पेशल' कॉफी दिलीत वाटतं त्या पोरट्यांना त्या हेराप्रमाणं? झक्कास!'

'तो सुभा.. नव्हे नव्हे...तो आधीचा पाहुणा, हेर होता? अरे बापरे! कशाला आला होता?'

'तो आपला कारखाना....तो गिरणीच्या तळघरातला. त्याची बातमी काढायला! उगीच नाही लंबे केला. पण जा आता, मला झोपू द्या. उगीच चऱ्हाट नका लावू.'

'जातो. जातोच, एक विचारून. तो दूर झाडीत टाकलेला मुडदा समुद्रातून अन् खाडीतून कसा आला वर? मेल्यावर उठून जाऊन समुद्रात उडी ठोकून की काय?'

'धोंडोबा, तुम्हालाही विनोद छान करता येतो! पण परत एक जरी अक्षर त्याबद्दल उच्चाराल तर–ध्यानी ठेवा, पिस्तुल आहे मजजवळ.'

'हा निघालोच.' धोंडोपंत परतले पण अंधारात उभा असलेला किसन त्यांना दिसला नाही. कारण ती जागाही आडोशाची होती. परत अंथरुणावर येऊन पडल्यावर किसनचे विचारचक्र सुरू झाले....खरंच! झाडीत टाकलेला मृत माणूस नंतर खाडीतून कसा वाहत आला? तो सुभाष खरंच या लोकांनी ठार केला असेल? अरेरे! मग कसला शोध करू अन् कशाला? देशमुखसाहेबांना काय वाटेल? मी एवढ्या उमेदीनं शोधायला आलो, तो 'सुभाष मृत झाला' हेच वृत्त ऐकायला का? पण

नाही ! उगीच कोणा माणसाला, ठार मारलं तर मारणारेही पकडणं हाही मोठाच शोध आहे. ठरलं, उद्या काळ्यांकडं दुपारी मुक्कामाला जायचं. त्यापूर्वी खाडीकाठी भटकायचं. कोळी लोकांनाही झाडीत कदाचित काही आढळलं असेल तर विचारपूस करायची...दुपारी पोलीससाहेबांनाही भेटायचं.

अरेच्च्या, पण पोलिसात केस द्यायला आपल्याजवळ पुरावा काय आहे ? खरं म्हणजे आज यावेळी एक छोटा टेपरेकॉर्डर हवा होता जवळ. सारं भाषण पोलिसांना ऐकवू शकलो असतो मी. छे ! टेपरेकॉर्डर हवाच शोधाला जाताना ! आता माझ्या सांगण्यावर विश्वास कोण ठेवील ? तरी पण सांगायचंच सारं इन्स्पेक्टरांना. तेवढं तरी करता येईल ना मला ? बस् .

त्याला गुंगी आली व बसूनच त्याने डुलकी घेतली. चारचे ठोके खालच्या घड्याळात वाजलेले त्याने ऐकले तशी उठून गाशा गुंडाळायला सुरुवात केली व सव्वापाचला ते दोघे बाहेर पडले.

किती रम्य होता तो खाडीचा किनारा ! गावापासून दोन मैल दूर असलेला व अगदी शांत ! तेथली सृष्टीशोभा पाहताना किसन आपले कामही क्षणभर विसरला. रात्रीचा तो त्यांचा भयंकर संवादही विसरला. फार काय, मृतदेह—बहुधा सुभाषचाच—या रम्य खाडीतूनच वाहत येऊन फुगून, किनाऱ्यास लागला, हेही क्षणभर विसरला. खाडीचे पात्र समुद्राचे खरेच. होय, समुद्राचाच एक फाटा राजपुरीत हळूच शिरलेला, फक्त लहान, नावा चालतील एवढ्याच रुंदीचा पण खोल. पाणी नदी-सारखेच नीलवर्ण दिसत होते. फाटा दूर डोंगराच्या खिंडीतून इकडे आल्यासारखा वाटत होता. पलीकडे कोळीवाड्याच्या बऱ्याच झोपड्या वसल्या होत्या. काहींतून धुराची वलये उंचउंच चाललेली दिसत होती व कृष्णवर्णाचे उघड्या छातीचे, काही कोळी नावा चालू करण्याच्या तयारीत

होते. सगळे कसे हिरवेगार रान. फारच छान.

'वा, सुंदर ! हे वर्णन मी कथेत घालणार !' एकदम किसन मोठ्याने म्हणाला तशी त्याला एक चिमटा घेत बापू म्हणाला, 'अहो कथालेखक, कल्पनासृष्टीत रमण्यापेक्षा नाश्त्याला कुठं काही मिळतंय का बघा. देखावा नुस्ता पाहण्यापेक्षा नाश्ता उत्तम.'

तोच पाठीमागून मृदू शब्द आले,

'सस्ता नाश्ता चालत असेल तर रस्ता मी दाखवते पाव्हणं ! चहाचं दुकान जवळच आहे. मासळी घ्यायला मी तकडंच निघाले आहे. माशांचं कालवण लागतं मालक शेटजी आले की.'

त्यांनी दचकून वळून पाहिले. खानावळीतली तीच ती हुषार देखणी मुलगी !

'इथं मी मोकळेपणी बोलू शकतो का ताई तुमच्याशी ?' किसन म्हणाला.

'बोला, धोंडोपंतांना खानावळ सोडून यावेळी कुठं जाता येत नाही अन् मालक आठनऊपर्यंत घोरत पडलेले असणार ! खुशाल बोला. माझं नाव चंपा.'

'ठीक. चंपूताई, तू ती गुप्त चिठ्ठी का दिलीस काल आम्हांला ?'

'का म्हणजे ? त्या सुभाषदादासारखा तुमच्यावरही प्रसंग येऊ नये म्हणून. मी जरी तेथली काम करणारी असले तरी, त्यांचं हे दुष्ट व भयंकर वागणं सोसवत नाही, पण करू काय ?'

'मग नोकरी सोड. दुसऱ्या चांगल्या घरी राहावं. कुठंही श्रम करूनच पोटाला मिळवायचं, ते अशा जागीच कशाला ?'

'ते ठीक. मी कुठं जाऊ ! अनाथाश्रमातून त्यांनी पैसे देऊन मला विकत घेतलंय, दादा. मजजवळ ना पैसा ना अडका, अनाथच आहे मी.'

'पण शिक्षण आहे ना इंग्रजी ? तुमची इच्छा असली तर मी करीन मदत.'

‘ खरंच ? अगदी पाठीराखा भाऊच होशील मग तू माझा. ’

‘ बरं, प्रथम सांग, त्या सुभाषनं काय केलं होतं ? त्यावर कसला प्रसंग ? ’

‘ हंऽऽ ! काय केलं त्या बापड्यानं, ते ठाऊक नाही. मला वाटतं, त्या जुन्या पडीक, मोडक्या गिरणीत जाऊन त्यानं काही शोधाशोध केली. धोंडोपंतानं त्या रात्री त्याला कॉफी पाजली त्यात गुंगीचं औषध होतं. मग मालक आले व त्यांनी ओरडून त्याला उठवलं. ते म्हणाले–

‘ हरामखोरा, नोटा पाहायला आलास नाही का ? सगळं कळलंय् मला. नोटा नाही पण हा सोटा घे पाहून ! अन् मग त्यांनी सोट्यानं त्यांना खूप मारलं. खूपच ! अगदी निर्दयपणानं. ’ ती डोळे पुशीत पुढे म्हणाली–

‘ मी दाराआड उभी होते. तो मनुष्य अगदी निपचित झाला.’ धोंडोपंत मग भीतीनं उद्गारले—

‘ मालक–मालक ! काय केलंत हे ? हा मेला बहुतेक ! ’

‘ असं ? अरे बापरे ! धोंडोपंत, खाडीकाठी नेऊन ठेऊया झाडीत याला. आत्ता, आटपा अंधार आहे तोवर....’ अन् मग त्यांनी त्या बापड्याचा देह उचलून जीपमध्ये टाकला, अन् ते गेले. चार वाजले असतील तेव्हा. ’

‘ मला झोप कुठली ? खानावळीत उतरलेल्या माणसावर हा काय प्रसंग ? खानावळीची दारं मोडकी झालेली. सैपाकीणबाईंना मुळीच न उठवता मीही लगेच हळूच मागल्या दारानं बाहेर पडले व झपाझप चालत खाडीकाठच्या झाडीत दुसऱ्या एका जवळच्या वाटेनं गेले. पहाट उजाडू लागली होती व तो पाव्हणा रक्ताळलेल्या स्थितीत पडलेला ! ते निघून गेले होते. ’

‘ खरंच, तुम्ही फार धीराच्या म्हणून तेथे गेलात बरंका. ’– बापू.

‘ अहो, मला संशय होता की तो मेला नसेल, म्हणून तर पाहायला

गेले होते. जमल्यास वाचवावं म्हणून! अन् पाहते तर खरंच त्याचा श्वास चालत होता हळूहळू! मेला नव्हता तो बापडा. मग धावत जाऊन त्या चहाच्या दुकानाच्या बाहेर नळ आहे, तेथून गोडं पाणी मी एका तेथल्याच मडक्यातून आणलं आणि काय? सगळेच श्रम व्यर्थ झाले माझे! काय सांगू?'

'काय? तो मरणच पावला तेवढ्यात?' घाबरून काटेनं प्रश्न केला.

'ते देवाला ठाऊक! मी आले तर त्याचा तो मृत देहच कुठं नव्हता हो! मग काय? उजाडल्यावर मासळी घेऊन घरात शिरले....त्यांना कुणाला मी बाहेर गेल्याचं समजलेलं नव्हतं. लागले कामाला मुकाट्यानं.'

तिने मान खाली घातली व दोन अश्रू ओघळले तिच्या डोळ्यांतून. किसन काटे सहानुभूतीने म्हणाला –

'हे बघ चंपूताई, पोलिसांनी विचारलं तर हे सारं सांगशील?'

'एक अटीवर. परत खानावळीत पाय ठेवणार नाही मी! तशी सोय आधी व्हायला हवी. नाहीतर उद्या मलाच सोट्यांचा मार मरेपर्यंत बसेल.'

'ठीक ठीक. तू फार मदत केलीस, ताई. मीही मदत करीन तुला. चल, चहाचं दुकान दाखव. सस्ता नास्ताही हवाय. आता प्रेशर आलंय मनावर भारी. धन्यवाद चंपूताई. एक सांग, इतकं चांगलं इंग्रजी तुला कसं येतं?'

'अनाथाश्रमात एक शिकलेल्या बाई होत्या. त्यांनी शिकवलं. फार माया करायच्या माझ्यावर.'

ते दोघे नाश्त्याला बसले.

प्रसंग कोणताही असो, लोकांचे बोलणे काय चालले आहे इकडे किसनचे तिखट कान सदैव लक्ष द्यायला असत. तेथल्या अशाच एका संभाषणातले अक्षर अन् अक्षर तो मनात साठवून घेऊ लागला. एका वृद्ध

कोळ्याने पाव व भजी घेतली व दोन पाव बांधून घेतले होते. त्याला दुकानदार म्हणाला,

'काय सोनूबाबा, भाच्याला जरा बरं वाटलं का न्हाय अजून?'

'गाडीला लई मोट्ठा अपघात झाला होता अन् काय घाटात! त्यात सापडलेलं माझं ल्येकरू खरं तर मरायचंच! पर देवबाबानं वाचविलं. कीर्पा त्येची. आत्ता बोलाया लागलाय. तापबी न्हाई. पर भलता अशक्त-पना हाय्–'

'राजापूरहून काय शक्तीची आवशिदं आनाया होवी तर सांगा, सोनूबाबा. उद्या जातुया मी बशीतून तिथं.'

'असं? मग आना ताकदीची काही आवशिदं. उपकार होतील.'

हे सारे शब्द त्याच्या कानांवर पडले. सोनू बाहेर पडू लागला तशी त्याने नजर टाकली. म्हातारा, साठी उलटलेला, पण असा कष्टानी कमा-वलेला देह की बस्स्! जणू काळ्या पाषाणाचा बांधेसूद दगडी पुतळाच! तो जाताच दुकानदार इतरांना सांगू लागला,

'मंडळी, या सोनूबाबाची धन्य हाय बा! अजून भल्याफाटं चार वाजायच्या वक्ताला जाळं खांद्यावर घेऊन जातूया मच्छी पकडाया. तरन्या मानसाच्यानं बी हुईना, असं कष्ट करतुया म्हातारा.'

पाठोपाठ नाश्ता अर्धाच टाकून काटेही उठला व बापूलाही अन्नावरून उठवून, पैसे मॅनेजरला झटपट देऊन तो घाईने बाहेर पडला. बापू म्हणाला– 'अरे कुठं?'

'हां, बोलायला वेळ नाही. सोनू कोळ्याच्या घरी चलायचंय!'

'का? मासळी घ्यायचा बेत?'

'नाही. आपण जेवायला गोपाळराव काळ्यांकडं जायचं आहे!'

'मग इकडं का? कशाला?'

'आली आहे आपली मनात एक शंका. तेवढी फेडून घ्यावी म्हणून

जायचं चौकशीला. चल.' अन् ते निघालेच....

देशमुखांच्या मनात अनेक विचार गर्दी करत होते.

अधीर मनाने एखाद्या चातकासारखी राजपुरीच्या ट्रंककॉलची देशमुख वाट पाहात होते. जी जमेल ती सारी जिवापाड मेहनत करणारा आहे आपला किसन! तो आपण पाठवला आहे. पाच रुपयांच्या खोट्या नोटांचा कोकणात अलीकडं फार सुळसुळाट झाल्याच्या तक्रारी होत्या म्हणून पोलीसखात्यात नोकरीला लागलेल्या आपल्या पुतण्यानं — सुभाषनं — ही कामगिरी स्वीकारली होती. किती उमेदीनं! पण पहिल्याच पावलाला ठेच लागली अन् सुभाष मरण पावला. अरेरे, दादांचा एकुलता एक मुलगा अन् माझाही किती लाडका. त्यावर हा काय प्रसंग ओढवला?

काटे अति सावधान हुशार तरुण आहे. पण सुभाषची हत्याच झाली असेल तर तो तरी काय बापडा करणार? अजून का फोन नाही? चौथा दिवस उगवला आजचा! का कुठंच पत्ता लागत नाहीये काट्यांना त्याचा! अखेर चौथ्या दिवशी सकाळी आठला फोनची घंटा वाजली — कर्रर्र टन्टन्....! धावत ते फोनजवळ गेले. होय, किसनचाच फोन होता. राजपुरीच्या पोलीस चौकीतून केलेला ट्रंक–तो घाईने काही सांगत होता–! त्याचे ते शब्द ऐकताच साहेबांचा चेहरा एकदम उजळला.

'काय? तो जिवंत आहे? तुम्ही शोधलंत काटे? धन्यवाद. वा, वा, शाब्बास काटे! ठीक ठीक. मी लगेच कारनं निघतो तासाभरात. होय, मोठी कार आणतो, मित्राची—काटे, आता समक्षच सारं!'

पत्नीला घाईने सारे सांगून व दोन घास खाऊन ते निघालेच. त्या वेगवान गाडीला राजपुरीला पोचायला जास्त वेळ लागला नाही. पोलीस-चौकीतच गाडी खडी केली त्यांनी. केव्हा एकदा आपला, तो मृत्युमुखातून परत आलेला सुभाष पाहतो असे झाले होते त्यांना.

गोपाळराव काळे तेथेच होते. ऑफिसात काटे व बापूही होते, व ती

चंपू, व सोनूबाबाही होते. आणि कोपऱ्यातल्या कॉटवर, जखमांवर जागोजाग पट्ट्या मारलेला, फार आजारी सुभाषही होता! देशमुखसाहेबांनी त्याला पाहताच धाव घेतली व त्यांच्या डोळ्यांतून अश्रूच आले– अर्थात आनंदाचे!

जरा वेळाने मग पोलीस–इन्स्पेक्टरांनी सगळा खुलासा केला. ते म्हणाले–

'देशमुखसाहेब, आमच्या पुण्याच्या खात्यातर्फे सुभाष देशमुख यांना गुप्तपणे खास कामगिरीवर इथं पाठवण्यात आलं. त्यांना शोध लागला, थोडाबहुत! येथल्या, गावाबाहेरच्या मोडक्या गिरणीत एक तळघर आहे, तेथे काही भानगड आहे म्हणून. व त्या तेथे खानावळीचे मालक मि. कोल्हे जा–ये करतात असंही समजलं. इतकंच नव्हे तर रात्री उशिरा फराळाचे डबेही खानावळीतून तिकडं अंधारात जातात, हेही लक्षात आलं सुभाषच्या. त्याचा तपास जास्त करायला ते खानावळीत मुक्कामाला आले, तर त्या रात्री श्री. कोल्ह्यांनीही त्यांची बातमी काढून त्यांना सोट्यांनी घावावर घाव घालून ठार केलं आणि खाडीकाठच्या झाडीत फेकलं–!– पण

'काळ आला, पण वेळ नव्हती आली सुभाषच्या मरणाची! तो मेला नव्हता, पण फार जखमी व बेशुद्ध झाला होता. झाडीतून खानावळवाल्या कोल्ह्यांची जीप परत फिरली त्यानंतर तासाभरानं एका भुरट्या चोरानं त्या मृतवत् माणसाचे उंची कपडे पाहिले व ते सारे काढून घेऊन फक्त आतले कपडे राहू दिले. त्याचा चांगला लग्गाच साधला म्हणाना! बेशुद्ध सुभाषच्या कोटाच्या खिशातलं पैशाचं पाकीट, घड्याळ सगळं कोटासह त्याला मिळालं व उंची पँटही घालून तो नावेत बसून निघून गेला. मग आला हा सोनू कोळी तिथं! त्यानं यांच्यात धुगधुगी आहे, पण कपडे जवळजवळ नाहीतच असं बघून घरी नेलं जाळ्यातूनच; तोवर

उजाडलेलंही नव्हतं. मग त्यांनी आपला भाचा मोटर-अपघातात सापडून आजारी झाला असं सगळ्यांना सांगितलं व त्याची जिवापाड शुश्रूषा करून त्याला वाचवलं. तर अशी सुभाषरावांच्या आयुष्याची ही विलक्षण कहाणी! घ्या ना साहेब, चहा तरी घ्या ना स्वस्थपणानं. आता वाचलेत तुमचे पुतणे–'

अत्यंत क्षीण स्वरात सुभाष म्हणाला,

'पण मला खरं सोनूबाबांनी वाचवलं, अन् किसनरावांनी परत तुमची भेट घडवली खरे गुन्हेगार हुडकून! त्यांना दोघांनाही मोठं श्रेय द्यायला हवं आहे काका!'

गोपाळराव उद्गारले, 'त्या चोरालाही परस्पर शिक्षा कोणी केली, कोण जाणे! पाण्यात पडून खाडीतून मरून परत इथं आला!'

इन्स्पेक्टर म्हणाले, 'त्यांनाही शत्रू असतातच काळे! गाठलं असेल त्या चोरालाही एखाद्या समुद्री चाच्यानं! आता त्या शोधाला लागलं आहे आमचं खातं.'

'पण काही असो, तुमचे हे काटे फार तल्लख बुद्धीचे व बहादुर आहेत. बेकार अशा त्या रद्दी खानावळीत हे असले जीवघेणे प्रकार घडत असतील, हे आम्हा कुणाच्याही ध्यानीमनी आलेलं नव्हतं. धीरानं तेथे राहून ह्यांनी हा शोध लावला सगळा! या मुलीनही साह्य केलंय् या शोधात अन् सोनूबाबांनी तर बापाप्रमाणं यांची शुश्रूषा केली. या दोघांनाही मी बक्षिसं देणारच आहे. काट्यांनाही मिळेल! एक मोठा खोट्या नोटांचा कारखाना काढणारे गुन्हेगार यांनीच सापडून दिले. काटे, आता आमच्या खात्यात या तुम्ही. असे चलाख अन् निर्भय तरुण हवेत आम्हांला.'

देशमुख साहेबांची मोटार सुरू होणार, तोवर काटे म्हणाला,

'साहेब, या सगळ्यात मला खूप मदत केली ती मुख्यतः या माझ्या मानलेल्या बहिणीनं. हिलाही न्यायचंय पुण्याला! फार गुणी अन् हुशार

आहे.’

‘असं का? बैस मुली गाडीत. काटे, आता तुम्ही काही सांगितलंत, तर ते मोडण्याची माझी छाती नाही. मी एक ठरवलं आहे. तुम्हाला बक्षीस द्यायचं मोठ्ठं– चांगलंसं!’

सुभाष क्षीण स्वराने म्हणाला–

‘तर मग, काका! माझ्या या मित्राला एक टेपरेकॉर्डर बक्षीस द्यावा आपण, कारण तो त्याला अशा वेळी फार उपयोगी पडेल. किती उपकार आहेत त्याचे माझ्यावर.’

किसन उद्गारला, ‘कसचं कसचं? पण एक करा साहेब. या मुलीला प्रेसमधे नोकरी द्या. इंग्रजी तिला येतं, चांगलं–’

‘दिली! अन् टेपरेकॉर्डर पण उद्याच देतो पाठवून काटे मी तुम्हाला!’

काटे धन्यतेने हसला. या ट्रिपमधे त्याला एक बहीणही मिळाली होती व भाऊबीजही जवळच आली नव्हती का? अन् एवढे मोठे यश!

खुषीने त्याचा चेहरा उमलला होता व बापूही आनंदाने त्याकडे पाहात होता.

## ५

# मगराने गिळलेली माणके

दाराशी उभा राहून किसन म्हणाला,

'बापू, आटोपलं की नाही ? उशीर होतोय, लवकर चल.'

'अरे, आईनं खमंग धिरडी केली आहेत बेसनाची, तेवढी खाऊन मग निघूच.'

घरातूनच बापूचे शब्द आले तशी किसनला मनापासून हसू आले. 'काहीही परिस्थिती असू दे, माणसाचा स्वभाव कधी बदलत नसतो. या बाप्याचा खादाडपणाच फार ! कितीही महत्त्वाचं काम असो, घरी भरपूर नाश्ता किंवा निदान दोन गरम वाफेच्या भाकरी खाल्ल्यावाचून याचं पाऊल पुढं पडणं कठीण. पण एवढी एक बाजू वजा केली तर स्नेहाला फारच चांगला अन् जिवाला जीव देणारा आहे माझा मित्र.'

त्याचे विचार चालले होते तोवर बापू बाहेर आला. हातात दोन डिशेस्, त्यावर खमंग धिरडी, चटणी व लोण्याचा चेंडू ! 'फार छान लागतात रे. कशी खमंग आहेत, बघ तरी.' बापू म्हणाला.

'ते सांगायला नको, बापूराजे ! दाराबाहेर धिरड्यांचा अतिखमंग वास आला, तेव्हाच ओळखलं मी, की बाप्या आता वेळेवर बाहेर येत नाही म्हणून– ! ठीक अकराची वेळ सुभाषनं दिली आहे, ती तरी आठवण आहे की नाही ?'

'मग ? सुभाष पोलिसांत आहेत खरे, पण ते काय जरा उशीर झाला

तर शिक्षा करतील का मला ? कुठंही जायचं तर, दोन घास खाऊन निघावं, असं माझं–नव्हे नव्हे–आईचं म्हणणं आहे. '

' अहो, पण विसराळू बापूराव ! त्यांनी चहाफराळालाच बोलावलं आहे. विसरलात का ? फराळाला जातानासुद्धा घरी फराळ करायचा आधी ? कमाल आहे तुमची ! '

बापू वरमून म्हणाला–

' पण पोटभर फराळ नाहीच की रे हा. उगीच दोनचार घिरडी– '

' बस्स्, दोन बस्स. उशीर होतोय्.'

' किशा ! तू माझ्या तोंडाचा घास ओढून घ्यायला बघतोस नेहमी हे चांगलं नाही बरंका ! ' बापूने रागाने म्हटले, पण हसत हात धुतले व म्हटले, ' त्यांनी आज आपल्याला चहाफराळाला बोलावलं हे जरा नवलच आहे, नाही का ? '

' नवल फारसं नाही. त्यांना त्यांच्या खात्यात बढती मिळाली आहे, म्हणून देशमुखसाहेबही त्यांच्या घरी येणारच आहेत पार्टीला. '

' हां ! तरीच तुझं खाण्यात लक्ष नव्हतं. इतकी टेस्टी घिरडी असून–'

' आता घिरड्याचं बोलणं काढलंस तर पाठीचं घिरडंच करीन चांगलं बाप्या, लवकर चल ! आई, येतो हं. '


ते दोघे वेगाने सायकलीवरून निघालेच.

देशमुख, संपादक–'आज' यांच्या हातात फराळ करतानाही वर्तमानपत्र होतेच. सुभाषचे वडील हे देशमुखसाहेबांचे मोठे भाऊ. ते आफ्रिकेहून आले होते व नवसह्याद्रि सोसायटीत पुण्यासच त्यांनी एक टुमदार घर बांधून घेतले होते. सुभाषची आई ताराबाई हीही दुखण्यातून चांगली बरी झाली होती. तिला सुभाषच्या राजपुरीच्या ट्रिपचे सारे वर्तमान कळलेले होते. ती म्हणाली,

' किसनराव, तुम्ही होता म्हणून माझा सुभाष मला परत दिसतो आहे

त्या संकटातून वाचून. त्याला तुमचा मोठा भाऊच समजा !'

'अन् या भावाच्या घरी केव्हाही हक्कानं राहायला येत जा भाऊ म्हणून ! कसं ? नाहीतरी असल्या दिवसभराच्या कटकटीच्या नोकरीतून या 'आज'च्या संपादकांना व तुम्हालाही थोडं निवांतपण व विश्रांती जरूर मिळायला हवी. ती आमच्याकडं जरूर मिळेल. काय रे रत्नाकर ? अहो संपादक, तुम्हालाच म्हणतोय् मी. इथं फराळ करतानाही हातात कशाला वर्तमानपत्र बाबा ? काय म्हटलं मी– ?'



'मावशी, अनाथ लेकरावर दया करा.'

देशमुख दचकून वर पाहात म्हणाले,

'काय म्हटलंत दादा? वर्तमानपत्राची– 'आज'ची तारीफ करीत होतात ना? आहेच आमची बाजू तशी भक्कम–अपटुडेट बातम्यांची!'

सगळ्यांच्याच ओठांवर हास्य उमटले. देशमुखांचे तिकडे लक्ष नव्हते. ते म्हणाले– 'खरं म्हणजे मला या अपहरण प्रकरणांचा उलगडाच होत नाहीये! आता पाहा, इंडियन एक्स्प्रेसमधे ही बातमी...संगम सस्थानच्या श्रीमंत राणीसाहेब सुशीलाराजे.... यांची सारी इटेस्ट त्यांच्या नातीला मिळणार आहे तर तिचा पत्ताच नाही लागत आहे– आणि लहानपणीच तिचं अपहरण झालंय म्हणे— '

'रत्ना, आता त्या अपहरणाच्या दूरच्या गोष्टी दूर ठेव बघू जरा. तुझ्या वहिनींचे चिरोटे किती खुसखुशीत झालेत, ते बघ आधी. त्याबद्दल प्रशंसा ऐकण्यासाठी ती वाट बघतेय. लक्ष दे कसं!'

'पुरे बाई! मी स्तुती ऐकण्यासाठी नाही काही थांबले. आणखी गरम चकल्या आणू का, हे विचारण्यासाठी थांबलेय् बरंका!'

आता मात्र सर्वांनाच मनापासून हसू आले. पण मग 'अपहरण' हाच विषय निघाला गप्पांना. वहिनी म्हणाल्या,

'आताशा आपलं ज्याचंत्याचं अपहरण! परवा सावित्रीबाईंना नात झाली. तर तीन दिवसांची पोर, दवाखान्यातूनच कुणी अपहरण केलं तिचं. चाललीय शोधाशोध! तरुण मुलींची तर कितीक अपहरणं!'

सुभाषचे वडील म्हणाले.

'अन् माझे जुने मित्र, सांगलीचे गोरे. त्यांचा बारा वर्षांचा मुलगा असाच कोणी अपहरण करून नेलाय्. त्याचं नाव काय बरं –? हां हां. संतोष! त्याचा शोध लागला पाहिजे. एकुलता एक मुलगा! कसं?'

एकदम देशमुख वर मान करून म्हणाले– 'अरे! तर मग हाच. हाच तो संतोष! बघा आमच्या 'आज' मध्ये आज, 'हरवल्याचा शोध'-

मध्ये त्याचा फोटो व 'शोध लावून पोचवणाऱ्यास सातशे रुपये इनाम' असा मजकूर आला आहे खरा! रोज अशा कितीक जाहिराती येतात. मला वाटतं, काटे! या कामगिरीवर तुम्हाला नेमलं तर बरं होईल!'

'मी? नाही सर, मी डिटेक्टिव्ह नाही होणार. फक्त बातमीदारच अन् तोही 'आज'चाच– राहणार आहे, साधा!'

'पण साधा नव्हे–गुन्ह्याचा शोध लावणारा बातमीदार! अन् तोही फक्त 'आज'चाच!' बापूने धीराने मधे शब्द उच्चारले. 'अरे हां! मी ते सांगायला विसरतच होतो. हा आमचा फोन नंबर ठेवा घरचा, अन् हा ऑफीसचा. माझी मदत केव्हाही तत्परतेनं मिळेल तुमच्या संशोधनात–' सुभाषने कृतज्ञतेने सांगितले.

'अन् यांची मदत म्हणजे एका गुप्त पोलिसाची! विसरू नका, काटे!'

देशमुख हसत पुढे म्हणाले– 'खरंच, या अपहरण विषयावर काटे, तुम्ही एक सनसनाटी कथा लिहून द्या. वर्षारंभ खास अंक, महिन्यानं निघेल आपला– त्यात ठीक होईल नाही?'

'सर, कथा लिहीन; पण आधी सनसनाटी बातमी हवी त्याबद्दलची. अन् मग कथा त्याची. आधी फूल हवं, मग फ्लॉवर पॉट! काय काकासाहेब, कसं?'

आपला 'कसं?' हा वाक्याच्या शेवटी नेहमी येणारा शब्द त्याच लकबीत ऐकून काकासाहेब खुषीत म्हणाले,

'अगदी जशास तसं. पण काटे, तुम्ही आमच्या मुलासाठी एवढं जिवावरचं साहस केलं त्याचं बक्षीस–'

'नाही नाही! बक्षीस वेगळं नको. देशमुखसाहेबांनी मला आधीच दिलं आहे ते– टेपरेकॉर्डर! किती उपयोगाची वस्तू आहे ती!'

'ते खरं, पण मी तुमची एक आणखी सोय करणार आहे. अर्थात्

कोणती ते आत्ता नाही सांगत! सप्राईज भेट देईन मी एक–छोटीशी–'

'नको, काकासाहेब – ! नको. मला गरिबाला आपला परिचय झाला हीच मोठी मोलाची भेट वाटतेय अन् संपादक देशमुखसाहेबांसाठी मी त्यांनी सांगितलेली कोणतीही सेवा करीन. त्यांनी मला आवडता व्यवसाय दिला आहे– '

किसन मधेच म्हणाला. बापूही म्हणाला,

'अन् सुभाषदादासारखा सी. आय्. डी. तला तरुण भाऊ मिळाला हा तर केवढा मोठा लाभ, आयुष्यातला सर!'

मग परत येताना ते खुषीखुषीत रमत गमत येत होते. एकदम किसनला आठवले. तो म्हणाला,

'बापू, बाबांना तलम धोतरजोडी घ्यायची आहे रे. चल कापडाचं दुकान समोरच आहे. ते कधी मागणार नाहीत, तुला माहीतच आहे. तेव्हा आपण जाणूनच करावं लागतं हे सारं.'

'पण पाच मिनिटं थांब. तो बायकांचा लोंढा दुकानातून येतो आहे बाहेर, तो जाऊदे. माझा जीव घाबरतो!'

मग ते दोघे 'मोहक वस्त्रभांडार'जवळ रस्त्यावर गप्पा करीत जरा उभे राहिले तोवर दोन अगदी गरीब मुले–एक सात वर्षांचा, एक दहा वर्षांचा -असे तेथे आले. बरोबर एक अगदी चांगल्या पोशाखाचा–टेरलिन शर्ट व निळी पँट घातलेला–तरतरीत, हसतमुख असा तरुण होता. तरुणाने त्या मुलांना सांगितले,—

'जा! दोन बाजूंला, तुमच्या वह्या घेऊन. जो जास्त वर्गणी जमवील त्याला आज पेढे मिळतील हां! एका तासात मी येतोच काही शर्टींग घेऊन–तोवर इथंच दाराशी उभे राहा येऊन.'

एक पोर म्हणाले,– 'मास्तर माझी विजार फाटली आहे. मला विजारीला कापड घ्याना.'

'ठेवलंय् कापड तुझ्या बापानं ! साली कार्टी उर्मट किती ! चल धर्मशाळेत मग दाखवतो. विजार मागतो. दहा छड्या देईन दहा ! निघा—'

'छानदार' मास्तर खेकसले. दुसरा भीतभीत म्हणाला—

'मास्तर, आज आम्हाला नाश्ता पण नाही दिला, गुरुजींनी ! आम्हाला काही खायला, थोडंतरी आणा– भूक लागलीय फार—' हा बोलणारा तर केवळ सात वर्षांचा पोर होता. पण त्याचा कान इतक्या जोराने त्या मास्तराने पिरगळला की पोराच्या डोळ्यांतून पाणीच आले ! मग मास्तर म्हणाला,

'पुरे ? पुरे खाऊ ? की, देऊ धम्मक लाडू, चापटपोळ्या ? वाटेत खायला मागतो ?' पोर हुंदका आवरीत म्हणाले,– 'नको, मला काही नको–नको !'

'ठीक ! ही कार्टी जीव किती खातात माझा ? जा, लवकर या. जो जास्त पैसे जमा करील त्याला मग हॉटेलात नेईन. पोरांनो पळा. मग इथंच या एका तासानं बरंका !'

किसन व बापू दोघे जरा दूर होते, तरी ह्यातला शब्दन् शब्द त्यांना ऐकू आला. दोघेही स्तब्ध झाले होते. विशेषतः बापू तर फार अस्वस्थ झाला होता. तो म्हणाला,

'किशा, तू हसशील–पण....तो दहा वर्षांचा, नवी चड्डी मागणारा मुलगा मला खूप पाहिल्यासारखा वाटतो आहे रे—'

'आँ ऽ ? ! प्रकरण मलाही साधं वाटत नाहीये थांब, ते दोघं इकडंच वह्या घेऊन काही वर्गणी मागायला निघालेत. जरा ऐकूया त्यांचं बोलणं.'

दुकानातून एक श्रीमंत बाई मखमलीची महाग पर्स हेलकावीत ऐटीत बाहेर आली. हातात एक कापडाचे पार्सल. ती आपल्या मोटारीकडे निघाली. तिला अडवून तो दशवर्षीय कुमार म्हणाला—

' मावशी ! आम्ही अनाथ आहोत. आईबाप मरून गेलेत आमचे. आमच्या अनाथाश्रमाला पाच-दहा रुपये वर्गणी द्या. पावती देतो मी. अनाथ लेकरांवर दया करा, मायबाई–'

ती बाई खेकसली,– ' सदा मेल्या या मांगतेकऱ्यांची कटकट. तुमचे आईबाप मेले त्याला मी काय करू ? '

तो लहान पोर म्हणाला– ' असं करा मावशी, एक रुपया तरी द्या. आई नाही–बाप नाही–म्हणून मागतो ताई–'

' अरे जा ! खूप पाहिलेत असे मागणारे ! ड्रायव्हर, इन्हे धक्का मारकर बाजू करना– ! चलो–'

ड्रायव्हर मालकिणीहून ज्यादा उग्र. त्याने बखोटीला धरून पोरे दूर ढकलली, व मोटार चालू लागली.

मोठ्या पोराने डोळे टिपले व धीराने धाकल्याला जवळ घेत म्हटले,

–' चल बंडू ! त्या समोरच्या शेटजींकडं. शेटजी लोक देतील वर्गणी. ' केविलवाणे होऊन धाकट्याने विचारले,

' ह्यांनीही नाही दिली तर, परत उपास आजही, गुंडूदादा ? '

' हं ! उपासच नव्हे. मारही वर मिळेल. थांब, आधी ह्या दोन सायकलवाल्यांकडं मागून पाहूया. बाळ. '

केव्हाचा बापू या दहा वर्षांच्या पोराकडे पाहात काहीतरी आठव-ण्याचा प्रयत्न करीत होता. त्याच्या डोक्यातली ट्यूब आत्ता लागली जशी आठवणीची. तो एकदम मोठ्याने हाक मारीत म्हणाला,

' प्रताप ! अरे ए प्रताप चव्हाण ! इकडं ये– इकडे ये–'

तो मोठा मुलगा वळून पाहू लागला. एकदम त्याच्या डोळ्यांत भेदरट भावना उमटली व तो रस्ता ओलांडून दुसऱ्या दिशेने धाकट्याला घेऊन धावू लागला. मग बापू धावला व त्याने त्या पोरट्याचा दंड खसदिशी ओढला. मुलगा विव्हळून ' स्स-हाय् ' म्हणाला. धाकटा घाबरला होता.

तो रडू लागला.

बापू म्हणाला– 'अरे घाबरतोस काय प्रताप? इंदूरला मी आलो होतो साळुंके सावकारांकडं पाहुणा. तर तुझं घर शेजारीच तर होतं. तुझे वडील भाऊसाहेब चव्हाण, आई शांताकाकी–'

मोठा मुलगा सावरला होता एव्हाना. तो म्हणाला—

'कोण चव्हाण? अन् कुठलं इंदूर! मला तर आईबाप नाहीत. अहो मी गुंडू आणि हा बंडू. दया करा, देणगी द्या आमच्या अनाथाश्रमाला. बस्स्!' ते धाकटे पोर पाठ केलेली वाक्ये म्हणू लागले–

'दादा– अण्णा, आम्ही अनाथाश्रमात राहातो. अनाथ लेकरांवर दया करा. आमच्यासारखी तिथं आणिक मुलं आहेत. मदत करा माबाप गरिबाला!'

गंभीरपणे किसन म्हणाला,

'किती पैसे गोळा होतात तुमचे रोज?'

मोठा म्हणाला–' दोघांत मिळून पंचवीस रुपये तरी हवेतच, दादा! निक्षून बजावलंय चालकांनी.'

'अन् जमले नाहीत एवढे तर?'

'तर मग- मग डाग देतात तापलेल्या उलथन्यानं–मांडीवर, दंडावर.' ते धाकटे पोर हुंदके आवरीत म्हणाले.

'बंड्या, तोंड आवर! का देऊ मुस्कटात एक?' तो मोठा पोर ओरडला. किसनने धाकट्याला जवळ घेतले व त्याच्या पाठीवरून हात फिरवीत म्हटले,– 'बंडू, मी तुला पोटभर नाश्ता देणार आहे. बाळ, तू मला सारं सांग. मग मी पैसेही देईन मदत म्हणून. सांगतोस?'

नाश्त्याची गोष्ट व तीही पोटभर नाश्त्याची गोष्ट ऐकताच ते भुकेले पोर एकदम हसले व म्हणाले–' विचारा दादा. सांगेन मी '

तो मोठा मुलगा घाबरून म्हणाला,

‘नको, नको बंडू. शपथ आहे तुला. गुरूजी आपल्याला चाबकानं मारतील, कळत नाही का वेड्या ? अहो, तुम्ही मदतही देऊ नका हवी–तर पण आम्हाला सोडा. आम्ही जातो कसे ! ’

किसन समजुतीच्या स्वरात म्हणाला,

‘गुंडू, आम्ही त्या मारकट गुरूजींच्या हातून तुम्हाला सोडवणार आहोत. बंड्या लहान, त्याला एक नाही कळत. तुला तर समजतं ना ? तू खरा अनाथ नाहीस हे मी ओळखलं. मला मोठा भाऊच समज तू. चल, सगळं सांग. कुठून आलास तू ? ’

‘खरंच ? खरंच सोडवाल ? का तुम्हीही मारहाण कराल, उपाशी ठेवून ? ’

विचारताना गुंडूचे ओठ थरथरत होते. डोळे पाण्याने भरले होते.

तो म्हणाला–

‘दादा, मी सांगतो, पण मास्तर ? त्यानं पाहिलं तर जीव घ्यायला उठेल तो आमचा. हे बघा– अशी शिक्षा करतो. ’

त्याने फाटक्या शर्टाची बाही उचलून हळूच दाखवली. रुपयाएवढा भाजल्याचा डाग !–अगदी ताजीच जखम होती.

बापू कळवळून म्हणाला– ‘आणि मी हीच बाही धरून ओढलं की रे तुला प्रताप ! तू विव्हळलास. माझ्या ध्यानात आलं रे. माफ कर. ’

‘किती लाडका, एकुलता एक मुलगा तू चव्हाणांचा. अन् हे काय आलं बेटा तुझ्या नशिबी ? ’

‘आता बोलायला वेळ नाही, बापू. या दोघांना ते कोपऱ्यात अगदी साधं ‘अन्नपूर्णा भोजनालय ’ आहे ना,–अरे त्या माडीवर ? तेथे तयार साधं जेवण त्या अन्नपूर्णाबाई देतात. मीही डबा येथून नेतो कधीकधी. तर पोरांना तेथे घेऊन जा. जेवण घाल. तोवर मी बाकीची सारी व्यवस्था करतो. फोन तळमजल्यावर रेडिओच्या दुकानातच आहे.’

‘ व्यवस्था ?’

‘ अरे आपला नवा मित्र सुभाष ? त्याच्याशी बोलतो थोडंसं. पोरांनो, जेवण झटपट आवरायचं हं ! वर्गणीचं एक त्या अनाथाश्रमाचं पुस्तक दे माझ्याकडं गुंडू—’

‘ पण मास्तर—’

‘ मास्तर गेला खड्ड्यात आता ! ’ बापू ओरडला व त्याने पोरांना ओढून जेवायला नेले देखील. तेथे पानावर बसल्यावर छोटा बंडू खुदकन हसलासुद्धा.

अर्ध्या तासानंतर सुभाष जीप व दोन पोलीस घेऊन कापड दुकानाच्या दाराजवळ घुटमळत होता, साध्या पोशाखात. अन् पोरेही होतीच. त्यांना सारे नीट पढवले होते किसनने, मास्तरशी कसे कसे बोलायचे ते ! तो जरा दूर उभा होता. बापू ठोसे मारण्याच्या अगदी तयारीत होता. मास्तरला चांगले चार दोन सणसणीत गुद्दे देण्यासाठी त्याचे हात शिवशिवत होते नुसते. राक्षस कुठला !

थोड्याच वेळात मास्तर रद्दी कापडाचे एक बंडल व खादीचे जाड शर्टींग—अगदी स्वस्ताईचे—असे घेऊन बाहेर आले. किसनने सुभाषला ‘ हेच ते ’ अशी डोळ्याने खूण केली. पोरे रडवे चेहरे करून उभी होती दाराशी. ती जवळ आली तशी मास्तर खेकसला— ‘ किती पैसे आले रे कार्ट्यांनो ? ’

छोट्या बंडूनेही उत्तम नाटक केले यावेळी. तो म्हणाला,

‘ कुन्नी देत नाही मदत मास्तर. एकच रुपया मिळाला—’

‘ एकच ? थांब. आता घरी चल. सालडीच काढतो तुझी. बावळट कार्टं ! अन् तू रे गधड्या ? किती मिळवलेस ? ’ आवाज हळू पण अगदी कमालीची चीड आल्यासारखा.

‘ मास्तर, खरंच कोणी देत नाही आताशा मदत. ‘ महागाई वाढलीय.

तुमची कशाला कटकट ?' म्हणतात. वही फेकून दिली एकानं तर–'

'हां, चऱ्हाट नको लावू. पैसे, पैसे किती आणलेस, ते बोल आधी !'

'फक्त दोन रुपये मास्तर. काय करू ? देतच नाहीत कुणी.'

ताडकन् त्याच्या गालावर पाची बोटे उमटतील एवढ्या जोराने मास्तरने मारले व तो म्हणाला– 'मदत नाही तर जेवण नाही. उपाशी मरा खुशाल–!' गुंडूच्या डोळ्यांत या गालफडातल्या थपडेने खरेच पाणी आले. रस्त्यातले एकदोघे वळून पाहून पुढे गेले. भरगर्दीत नेहमीच असले प्रकार दिसतात. कोण लक्ष देतेय तिकडे ! जो तो आपल्या घाईतच असतो रस्त्यात. पण नाही ! रस्त्यातल्या काहीजणांचे लक्ष या 'मास्तरकी'-वर जरूर होते.

झेप घेऊन सुभाषने मास्तरचा हात घट्ट पकडला व म्हटले,

'मिस्टर, या लहान मुलाला इतकं काय म्हणून मारता ? यांचे कोण तुम्ही ?'

'अबे, दूर हटो. मी यांचा बाप ! समजलं ? माझ्या पोरांना धाक लावायला मी त्यांना मारीन–झोडीन ! तुझ्या बापाचं काय जातंरे ?'

सुभाष ओरडला–

'होहो ! खुश्शाल मारा पण स्वतःच्या पोरांना ! ही तुमची मुलं थोडीच आहेत ? हा माझा धाकटा भाऊ–प्रताप चव्हाण आणि हा माझ्या बहिणीचा मुलगा संजीव शिंदे ! यांच्यावर हात उचलता ? कोणत्या अधिकारानं ?'

ती दटावणी ऐकताच मास्तर गांगरले. घाबरले. कारण पोरांची खरी नावे तीच होती ना ! तरीही ते तत–पप करीत म्हणाले,

'हे काय भलतंच कुभांड ? मी या पोरांचा बाप आहे. चला घरी पोरांनो, मिठाई देणार आहे बरंका–'

गुंडू म्हणाला– ‘ आँ ? मिठाई ? म्हणजे गुरुजींकडं गेल्यावर उलथ-न्यानं डाग देणार आहात, तीच ना ? येत नाही जा ! तुम्ही आमचे बाप नाही. मी गुंडू नव्हे; प्रताप चव्हाण आहे.’

छोटा बंडू म्हणाला,– ‘ तुम्ही आमचे कुन्नी कुन्नी नाही ! माझे बाबा गुलाबराव शिंदे इंजीनिअर आहेत.’

आता मास्तर पुरतेच घाबरले व पळू लागले पण सुभाषने खूण करताच पोलिसांनी त्यांना पकडून जीपमध्ये घातले. सुभाष म्हणाला,

‘ मास्तर, चला पोलीस–चौकीवर ! मी पोलीस–अधिकारी आहे. तुमच्या धर्मशाळेतल्या गुरुजींची माहिती द्या. नाहीतर हा पोलीशी दंडुका पाहून ठेवा ! ’

त्या रविवारी सकाळी तुकाराम बागेत नवी फुलझाडे रुजवीत होता. तोवर एक टॅक्सी दारात येऊन खडी झाली. ऐटबाज पोशाखात अतिशय स्मार्ट दिसणारा एक हसरा मुलगा आत डोकावीत म्हणाला–

‘ काटे किसनदादांच घर हेच ना ? ’

‘ हेच हेच ! या, अरे प्रताप तू अन् बरोबर भाऊसाहेब चव्हाण, अन् शांताकाकू देखील ? या या, मला ओळखलंत ना ? मी बापू, किसनचा मित्र.’

‘ ओळखलं तर ! पण हा बघा कोण अनाथाश्रमातला एक भिकारी मुलगा माझ्याबरोबर आलाय् मागं लागून ! त्याला ओळखलंत की नाही किसनराव ? ’ चव्हाणसाहेब थट्टेखोर स्वरात म्हणाले.

किसन नुकताच स्नान करून आला होता. त्याच्याजवळ जात तो लहान मुलगा लाडाने म्हणाला– ‘ मी गुंडू तुमचा. दादा, भेटायला आलोय्. बाबा पण आलेत. आईही आलीय् बघा. आई, यांना मी मामाच म्हणणार आहे ग यापुढं–’

‘ होय बाळ, मामासारखाच हा धावून आला अन् त्यानं हरणीचं

चुकलेलं पाडस तिला भेटवलं. किसनराव, या मोठ्या बहिणीच्या घरी भाऊबीजेला दरवर्षी यायचं बरंका! मला भाऊ नव्हताच, आज तो मिळाला–'

गुंडूच्या आईने ओले डोळे पुशीत म्हटले. त्या दोघांनी उंची सूटचे कापड दोघांनाही (होय–बापूलासुद्धा–!) दिले व कृतज्ञतापूर्वक त्यांचा निरोप घेतला. अर्थात् चहा-फराळ केल्यावाचून मंजूने त्यांना जाऊ दिले नाही.

थोडक्याच वेळात एक पोलीस जीप दाराशी उभी राहिली. त्यातून सुभाष व एक गृहस्थ उतरले. पाठोपाठ एक अतिशय तरतरीत मुलगा–बारा वर्षांचा–उतरला. किसनने त्याला ताबडतोब ओळखले. तो संतोष गोरे होता. ह्याचाच फोटो 'आज 'मध्ये ७–८ दिवसांपूर्वी आला नव्हता काय? मग हे खात्रीने गोरे पतीपत्नीच! सुभाष बरोबर होताच. तो म्हणाला,

'गोरे काका, या अपहरणकेसचा मूळ तपास याच आमच्या खास मित्रांनी लावून दिलाय. हे किसन काटे. नाव काटे पण चातुर्य मोठं आहे यांचं. अन् हे बापूराव.'

संतोष गोरे, बारा वर्षांचा चटकन् किसनला नमस्कार करीत म्हणाला,

'किसनदादा, मी सतोष. मला किनाई मी शाळेतून येतायेता दोघांनी रुमालाचा वास देऊन बेशुद्ध केलं. सावध झालो तर एका भिकारड्या घरात! 'अनाथाश्रम–कळकगाव' (मध्य प्रदेश) अशी पाटी त्या घरावर दिसली मलाही अनाथाश्रमासाठी मदतीची भीक मागायला जुलमानं पाठवण्यात आलं. आणि नाही मदत आणली तर, प्रोप्रायटर षण्मुखम्, सांडसानं भाजून डाग द्यायचे. ते खरेच षण्मुखम! सहा शहरात त्यांच्या ह्या भिकाराश्रमाच्या अशाच सहा शाखा आहेत. मला यातून सोडवल ते या सुभाष दादांनी. ते पोलीसपार्टी घेऊनच आले होते मला शोधायला.'

सुभाष म्हणाला–' अरे संतोष, खरा तुम्हाला मुक्त करणारा हा किसन काटेच. मी नव्हे दगडू !–हसू नका काटे. या संतोषचं नाव तिथं दगडूच ठेवलं होतं व वीस पळवलेली पोरं–डागलेली, भाजलेली तेथे होती. साऱ्यांची नावं धोंडू, कोंडू, पांडू, सुकडू, लुकडू अशीच ठेवली होती–'

' त्या षण्मुखंडूनं ! ' स्मार्ट संतोष उद्गारला. सर्वांच्या ओठांवर हसू उमटले. सुभाष म्हणाला,

' किसन काटे, भारी हुषार, बुद्धिमान मुलगा आहे हा, बरंका गोरे-काकांचा ! सदा पहिला नंबर वर्गात. यानंच, षण्मुखम् बदमाशाच्या, पोरं पळवून चालवलेल्या सहा शाखा गावात होत्या व त्यात १५० मुलं एकूण होती, ती सगळी पत्रव्यवहाराची फाईलच चोरून वाचली व आम्हाला दिली ! थेट जबलपूर-नागपूरपर्यंत आमचे इन्स्पेक्टरसाहेबही बरोबर आले व सर्व मुलं मुक्त केली आम्ही आणि सर्वांचे मुख्य प्रोप्रायटर षण्मुखम ! याची मुलं पळवणारी फार मोठी टोळी सापडली.'

' मग मला नाही खरं श्रेय, सुभाष ! तुम्हालाच आहे या केसचं. धन्यवाद ! ' किसन उद्गारला.

आतून मंजू म्हणाली,–' चहा, नाश्ता तयार आहे, किसनदादा. या बापूरावांनी धावत जाऊन किती तऱ्हेची मिठाई आणून ठेवली आहे. बघता का ? या सगळे. दगडू, ये बेटा. ' मंजूच्या ' दगडू ' हाकेने खुदकन् संतोषही हसला. मंजू वरमलीच जरा. फराळ झाल्यावर गोरे-काकांनी किसन नको नको म्हणत असतानाही आग्रहाने बक्षिसाचा ' सातशे रुपयांचा ' चेक त्याच्या हाती दिला व ते म्हणाले–

' नाही म्हणू नका, किसनराव ! तुम्ही माझा हा लाडका संतोष परत मिळवून दिलात. मगरानं गिळलेलं माणिकच जणू परत आणून दिलंत. त्याबद्दल ही अल्प भेट आहे–'

किसन हसत म्हणाला–

चुकलेलं पाडस तिला भेटवलं. किसनराव, या मोठ्या बहिणीच्या घरी भाऊबीजेला दरवर्षी यायचं बरं का! मला भाऊ नव्हताच, आज तो मिळाला–'

गुंडूच्या आईने ओले डोळे पुशीत म्हटले. त्या दोघांनी उंची सूटचे कापड दोघांनाही ( होय–बापूलासुद्धा–! ) दिले व कृतज्ञतापूर्वक त्यांचा निरोप घेतला. अर्थात् चहा-फराळ केल्यावाचून मंजूने त्यांना जाऊ दिले नाही.

थोडक्याच वेळात एक पोलीस जीप दाराशी उभी राहिली. त्यातून सुभाष व एक गृहस्थ उतरले. पाठोपाठ एक अतिशय तरतरीत मुलगा–बारा वर्षांचा–उतरला. किसनने त्याला ताबडतोब ओळखले. तो संतोष गोरे होता. ह्याचाच फोटो ' आज 'मध्ये ७–८ दिवसांपूर्वी आला नव्हता काय? मग हे खात्रीने गोरे पतीपत्नीच! सुभाष बरोबर होताच. तो म्हणाला,

' गोरे काका, या अपहरणकेसचा मूळ तपास याच आमच्या खास मित्रांनी लावून दिलाय. हे किसन काटे. नाव काटे पण चातुर्य मोठं आहे यांचं. अन् हे बापूराव.'

संतोष गोरे, बारा वर्षांचा चटकन् किसनला नमस्कार करीत म्हणाला,

' किसनदादा, मी सतोष. मला किनाई मी शाळेतून येतायेता दोघांनी रुमालाचा वास देऊन बेशुद्ध केलं. सावध झालो तर एका भिकारड्या घरात! ' अनाथाश्रम–कळकगाव ' ( मध्य प्रदेश ) अशी पाटी त्या घरावर दिसली मलाही अनाथाश्रमासाठी मदतीची भीक मागायला जुलमानं पाठवण्यात आलं. आणि नाही मदत आणली तर, प्रोप्रायटर षण्मुखम्, सांडसानं भाजून डाग द्यायचे. ते खरेच षण्मुखम! सहा शहरात त्यांच्या ह्या भिकाराश्रमाच्या अशाच सहा शाखा आहेत. मला यातून सोडवल ते या सुभाष दादांनी. ते पोलीसपार्टी घेऊनच आले होते मला शोधायला.'

सुभाष म्हणाला—' अरे संतोष, खरा तुम्हाला मुक्त करणारा हा किसन काटेच. मी नव्हे दगडू !—हसू नका काटे. या संतोषचं नाव तिथं दगडूच ठेवलं होतं व बीस पळवलेली पोरं—डागलेली, भाजलेली तेथे होती. साऱ्यांची नावं धोंडू, कोंडू, पांडू, सुकडू, लुकडू अशीच ठेवली होती—'

' त्या षण्मुखंडूनं ! ' स्मार्ट संतोष उद्गारला. सर्वांच्या ओठांवर हसू उमटले. सुभाष म्हणाला,

' किसन काटे, भारी हुषार, बुद्धिमान मुलगा आहे हा, बरंका गोरे-काकांचा ! सदा पहिला नंबर वर्गात. यानंच, षण्मुखम् बदमाशाच्या, पोरं पळवून चालवलेल्या सहा शाखा गावात होत्या व त्यात १५० मुलं एकूण होती, ती सगळी पत्रव्यवहाराची फाईलच चोरून वाचली व आम्हाला दिली ! थेट जबलपूर-नागपूरपर्यंत आमचे इन्स्पेक्टरसाहेबही बरोबर आले व सर्व मुलं मुक्त केली आम्ही आणि सर्वांचे मुख्य प्रोप्रायटर षण्मुखम ! याची मुलं पळवणारी फार मोठी टोळी सापडली.'

' मग मला नाही खरं श्रेय, सुभाष ! तुम्हालाच आहे या केसचं. धन्यवाद ! ' किसन उद्गारला.

आतून मंजू म्हणाली,—' चहा, नाश्ता तयार आहे, किसनदादा. या बापूरावांनी धावत जाऊन किती तऱ्हेची मिठाई आणून ठेवली आहे. बघता का ? या सगळे. दगडू, ये बेटा. ' मंजूच्या ' दगडू ' हाकेने खुदकन् संतोषही हसला. मंजू वरमलीच जरा. फराळ झाल्यावर गोरे-काकांनी किसन नको नको म्हणत असतानाही आग्रहाने बक्षिसाचा ' सातशे रुपयांचा ' चेक त्याच्या हाती दिला व ते म्हणाले—

' नाही म्हणू नका, किसनराव ! तुम्ही माझा हा लाडका संतोष परत मिळवून दिलात. मगरानं गिळलेलं माणिकच जणू परत आणून दिलंत. त्याबद्दल ही अल्प भेट आहे—'

किसन हसत म्हणाला—

'थँक्स् ! मात्र यातली अर्धी 'भेट रक्कम' सुभाष देशमुखांना मी देणार हां, गोरेकाका ! यांच्या मदतीवाचून एकटा मी काय करणार होतो? तेव्हा–सुभाष–आपण ही भेट–'

'हां हां ! मी बक्षिसी घेणारा पोलीस अधिकारी नाही म्हटलं !!'

सुभाषच्या या वाक्यावर सारेच हसले. गोरे म्हणाले–

'गुड्बाय काटे ! आता, केव्हाही माझी गरज भासेल, मदत हवी असेल तेव्हा कळवा. हा गोरे वकील तुमच्या साह्याला धाव घेऊन येईल !'

आणि सोमवारीच एक बडे पार्सल किसनच्या नावावर कोल्हापूरहून आले–'शिंदे इंजीनिअरिंग वर्क्स' मधून बंडू उर्फ संजूच्या वडिलांनी एक टेबलफॅन व एक सीलिंग फॅन असे दोन कोरे पंखे त्याला भेट म्हणून पाठवले होते व सोबत त्यांचे पत्रही होते. ते असे–

'काटेसाहेब ! मी फ्लूनं आजारी आहे. समक्ष येता आलं नाही मला माझ्या संजूला न्यायला, पण माझे सेक्रेटरी त्याला घेऊन आले व संजूनं सारं काही आम्हांला सांगितलं. माझ्या नाजूक लहान लेकराच्या अंगावर बारा ठिकाणी भाजल्याचे डाग आहेत ! आणि आम्ही घरंदाज सरदार घराण्याचे तर आमचं पोर भीक मागत होतं. अन्नासाठी वणवणत होतं, उपाशी राहात होतं. त्या राक्षसांच्या तावडीतून तुम्ही त्याला सोडवलंत, हे उपकार कधीही फिटण्याजोगे नाहीत. पण केवळ कृतज्ञता म्हणून एक अल्पभेट पाठवली आहे, स्वीकार करावा !...समक्ष पुण्याला येईन तेव्हा संजीवकुमारला घेऊन अवश्य भेटायला येईन. तुमचा स्नेह मला अतिशय मोलाचा वाटेल, एवढंच तूर्त लिहितो.

आपला स्नेहाकांक्षी,
गुलाबराव शिंदे.

मंजू हसत म्हणाली,–'किसनदादा, नवं घर आपोआप सजवण्याचे

झकास उद्योग चाललेत तुमचे ! खरं ना बावा ? '

तुकाराम उद्गारला– ' पोराचं हे यश पाहायला त्याची आई हवी होती ! '

ऑफिसात देशमुख साहेबांच्या समोर तो येऊन उभा राहाताच ते रोषाने म्हणाले,

' हंऽ ! बरेच पाहुणे आले होते तुम्हांकडं म्हणे काल ? झालंऽऽ ! आता कुठली सनसनाटी बातमी ताजी अन् कसली त्याबद्दलची कथा ? वेळ नको का आमच्या खास बातमीदाराला कथा लिहायला ? पाहुणे, चहा, आभार, फराळ स्तुती यातच तुम्ही गर्क असणार—! '

एकदम काटे हास्यमुखाने उत्तरला– ' सर, ही सनसनाटी बातमी आत्ता ' आज 'च्या अंकातच जातेय छापायला. अन् ही बातमीहून नवलपूर्ण कहाणी, मुलं अपहरण करणाऱ्या टोळीच्या सहा केंद्रांची. हेच मी हेडिंग दिलंय्– ' षण्मुखमच्या सहा अजब संस्था. ' काल रात्रभर जागून ही कथा लिहिलीय् मी. गरिबावर रोष नसावा साहेब–'

लेखाची ती गुंडाळी उलगडून वाचीत देशमुख प्रसन्नतेने हसले व म्हणाले– ' ओहो ! बातमीदार असावा तर असाच ! या महिन्यापासून तुम्हाला पगारात वाढ देण्यात येणार आहे बरीच, काटे ! धन्यवाद, सुंदर कथेबद्दल ! '

बातमीदार काटे ! खुषीखुषीचे हास्य त्याच्या दळदार ओठांवर लहरत होते.

( सत्य कथेवर आधारित )

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय ठाणे.
बाल वाङ्मय विभाग
बा. क्र 98230 दिनांक 27/8/12
विषय क्र.........
BVBK-0401630